दैनिक अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक

# राष्ट्र सह्याद्री

गायकवाड हॉस्पिटल
मान,पाठ,कंबर,गुडघे,मणके,हाडांची तपासणी व शस्त्रक्रिया सवलतीच्या दरात केली जाईल.
MBBS, DNB, ORTHO, FIJR, FIJA, MNAMS
Ex registrar breach candy mumbai,
Ex consultant ananrishiji ahmednagar
Ex consultant shree sainath shridi
डॉ. गायकवाड प्रविण
अस्थिविकार व सांधेरोपण तज्ञ
✆7709031130
पहिला मजला,राजपाल क्लॉथ स्टोअर शेजारी,कॉटज कॉर्नर, सावेडी,नगर-मनमाड रोड,अहिल्यानगर-४१४ ००३,फोन - ०२४१-२९९५५८८

● संपादक : काकासाहेब नवले ● RNI No. MAHMAR /2019/82605 ● वर्ष ६ वे ● अंक २४० ● मंगळवार, १० जून २०२५ ● www.rashtrasahyadri.com ● पाने ८ ● मूल्य रु. ४.००

## झापुक | zupuk

सरडे संकटांनुसार
रंग बदलतात
तर सापही संकटात
फुत्कारतात
कलियुगात लोक वेळ
निघून गेली की रंग बदलतात
संकटात ज्यांनी मदत
केली त्यांनाच दंश करतात

**नवनाथ कुताळ,**
**9422231825**

## महत्वाचे...

### मोबाईलच्या हट्टापायी १४ वर्षीय मुलीची आत्महत्या

**मुंबई** : १४ वर्षांच्या मुलीने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना मुंबईत घडली. आई-वडिलांनी मोबाईल घेऊन दिला नाही म्हणून मुलीने गळफास घेऊन आत्महत्या केली. गोरेगाव पोलिसांनी अपघाती मृत्यूची नोंद केली आहे. या प्रकरणाचा तपास पोलिस करत आहेत. मुंबईतील आरे पोलिस ठाण्याच्या हद्दीत ही धक्कादायक घटना घडली. १४ वर्षीय शाळकरी मुलीने राहत्या घरी गळफास लावून आत्महत्या केली.आई-वडिलांकडे या मुलीने मोबाइलसाठी हट्ट केला. मोबाइल न दिल्यामुळे मुलीचे आई-वडिलांशी भांडण केले. गेल्या दोन ते तीन दिवसांपासून ही मुलगी आई-वडिलांकडे सातत्याने मोबाइलची मागणी करत होती. आई-वडील कामानिमित्त बाहेर गेले असता दुपारी दोन वाजता या मुलीने गळफास लावून आत्महत्या केली. मुलीचा मृतदेह ताब्यात घेऊन पोलिसांनी शवविच्छेदनासाठी सरकारी रुग्णालयात पाठवला.

### अवैध पार्सल वाहतूक करणाऱ्या ट्रॅव्हल्सच्या तपासणीची मागणी

**अमरावती** : युवक काँग्रेसचे पदाधिकारी तथा जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा ग्राहक परिषदेचे सदस्य जवंजाळ यांनी ट्रॅव्हल्सच्या प्रत्येक थांब्यावर संबंधित गाडीच्या तपासणीची मागणी केली आहे. अलीकडेच एका ट्रॅव्हल्समधून गुजरातेतून आलेले प्रतिबंधित बियाणे नागपूरला नेण्यात येत होते. परंतु कृषी विभागाच्या सतर्कतेमुळे ते अमरावतीच्या थांब्यावर पकडले गेले. याच जप्ती कारवाईच्या पार्श्वभूमीवर ही मागणी पुढे आली आहे. त्यांच्यामते संबंधित विभाग व पोलिस कारवाई करतातच. परंतु आरटीओच्या अधिकाऱ्यांनी ही बाब नियमितपणे केली पाहिजे. त्याशिवाय नागरिक, शासनाची फसवणूक थांबणार नाही. शहरातील वेलकम पॉइंट येथे नुकत्याच झालेल्या एका कारवाईदरम्यान गुजरातमधील अहमदाबाद येथून नागपूरकडे जाणाऱ्या एका खासगी प्रवासी बसमधून प्रतिबंधित व अनधिकृत एचटीबीटी कापूस असलेल्या या बियाणांची किंमत सुमारे २५ लाख रुपये आहे. ही कारवाई जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्या पथकाने केली होती.अशा घटनांवर अंकुश लावण्यासाठी वेलकम पॉइंटसह इतर प्रमुख स्थानकावर आरटीओ विभागामार्फत नियमित तपासणी मोहीम राबवावी.

# दोन भरधाव रेल्वेचे प्रवासी एकमेकांवर आदळले; चौघे मृत्युमुखी; ९ जखमी

## पायरीवर उभे राहून प्रवास करणाऱ्यांच्या बॅगा एकमेकांमध्ये अडकून अपघात झाल्याचा संशय



## रक्तरंजीत लोकल

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई** : मुंब्रा रेल्वेस्थानकाजवळ दोन भरधाव लोकल रेल्वे मधील प्रवासी एकमेकांवर आढळल्याने भयंकर रेल्वे दुर्घटना घडली. मुंब्रा रेल्वे स्थानकादरम्यान सोमवारी (९ जून) सकाळी ९.३० वाजताच्या सुमारास घडलेल्या या अपघातात १३ जण रेल्वेमधून पडले. त्यात चार जणांचा मृत्यू झाला. कसाऱ्याहून सीएसएमटीला जाणाऱ्या लोकलमध्ये प्रवासी लटकून जात होते. त्याचवेळी सीएसएमटीवरुन निघालेली दुसरी लोकल प्रवाशांना घासल्याने हा अपघात झाला.

ठाण्याचे नायब तहसीलदार दिनेश पैठणकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, जखमींवर कळवा आणि मुंब्र्यातील रुग्णालयात उपचार सुरु आहेत. १० जखमींपैकी एकाचा मृत्यू झाल्याची माहिती कळवा रुग्णालयाने दिली. तर कळव्यातील काही जखमींना ठाण्याच्या ज्युपिटर रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सदर अपघात झाला तेव्हा सुरुवातीला पुष्पक एक्सप्रेसमधून प्रवासी खाली पडल्याची माहिती सांगण्यात येत होती. मात्र पुष्पक एक्सप्रेसचा काहीही संबंध नसल्याची माहिती मध्य रेल्वेचे माहिती अधिकारी स्वप्नील निला यांनी दिली.

लोकलमधून प्रवासी फूटओव्हरवरुन प्रवास करत होते. एका ट्रॅकवरुन सीएसएमटीकडे लोकल जात होती. तर दुसऱ्या ट्रॅकवरुन कसाराच्या दिशेने लोकल जात होती. यावेळी दोन्ही लोकलमधील दरवाजावरील प्रवाशांची बॅग एकमेकांना घासली गेली. सकाळी ९.३० वाजता ही दुर्घटना घडली आणि ९.५० पर्यंत म्युबलन्स दाखल झाल्या आहेत आणि रुग्णालयात उपचारांसाठी दाखल करण्यात आलेली आहे, अशी माहिती स्वप्नील निला यांनी दिली. मुंब्रा आणि दिवा दरम्यान ही घटना घडली. अप आणि डाऊन दरम्यानच्या लोकल दरम्यान प्रवासी फूटओव्हरवरुन प्रवास करत होते. अशात त्यांची टक्कर झाली किंवा बॅग लागला आणि धक्का लागला त्यामुळे ही ८ लोकं खाली पडलीत. रेल्वेने उपाययोजना करण्यासंदर्भातच नव्या लाईनचे नियोजन केले आहेत. ठाणे ते सीएसएमटी **(पान ४ वर)**

### ■ अपघाताचे खापर प्रवाशांवरच फोडू नका : शरद पवार

सर्व निष्पाप प्रवाशांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. तसेच, काही प्रवाशांवर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. त्यांच्याही प्रकृतीत लवकरात लवकर सुधारणा होवो, अशी प्रार्थना करतो. मध्य रेल्वेवर दररोज सरासरी ६ ते ७ प्रवाशांचा लोकलमधून पडून मृत्यू होतो. लोकल ट्रेन्समधील वाढती गर्दी याचं मुख्य कारण असल्याचं सर्वज्ञात आहे. तरीही, असे अपघात घडल्यानंतर प्रवाशांवरच त्यांच्या मृत्यूचे खापर फोडून चालणार नाही. केंद्रीय रेल्वे प्रशासनाने या दुर्दैवी घटनेची गांभीर्याने दखल घ्यायला हवी. मध्य रेल्वेनेही वेळेचं उत्तम नियोजन करून त्यानुसार महत्वांच्या मार्गांवर लोकल फेऱ्या वाढवणं गरजेचं आहे. प्रवाशांच्या सुरक्षेसाठी आवश्यक त्या उपाययोजना तातडीने राबवाव्यात.

**मृतांची नावे** : **१ ) राहुल संतोष गुप्ता (२८ ) रा. दिवा, २) सरोज केतन (२३ ) रा. उल्हासनगर ३) मयूर शाह (४४ ) ४) मच्छीद्र मधुकर गोतरणे, वय-३१ (पोलीस कॉन्स्टेबल).**

### ■ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी वाहिली श्रद्धांजली

दिवा-मुंब्रा स्थानकादरम्यान लोकलमधून १३ प्रवासी खाली पडून झालेल्या दुर्घटनेत काही जणांचा मृत्यू झाल्याची घटना अतिशय दुर्दैवी आहे. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. जखमींना तातडीने शिवाजी हॉस्पिटल आणि ठाणे सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. स्थानिक प्रशासन समन्वय साधून आहे. जखमींना लवकर आराम मिळावा, अशी मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो. ही घटना नेमकी कशामुळे घडली, याची चौकशी रेल्वे विभागाने सुरू केली आहे.

■ मुंबईतील रेल्वे अपघाताची घटना दुर्दैवी आहे. या देशात माणसांची किंमत नाही. मुंबईतील रेल्वे कशी चालते हेच जगाला आश्चर्य आहे. मुंबईत नीट रस्ते नाहीत, पार्कींग व्यवस्था नाही. केवळ रेल्वेपुरता हा विषय नसून शहरांचा विचका झाला आहे. मुंबईसह मेट्रो शहरात उंच इमारती उभ्या राहत आहेत, रस्ते नाहीत, लोकं वाढल्याने पार्किंगची व्यवस्था नाही. आग लागली तर बंब जायला वेळ नाही, बाहेरून येणारे लोंढे आहेत. कोण येतंय, कोण जातंय हे कळत नाही. मुंबईत मोनोरेल, मेट्रो आहे. कोण काय वापरताय हे कोणी बघत नाही. शहर म्हणून कोणी बघायला नाही. त्यामुळे, केंद्र सरकारने रेल्वेच्या स्थितीकडे लक्ष दिलं पाहिजे. **- राज ठाकरे**

# पीओपी गणेश मूर्तीवरील बंदी उठवली



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणे** : राज्यातील गणेश मंडळांना मुंबई उच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या गणेश मूर्तींवरील बंदी उठवण्यात आली आहे. मूर्ती बनवणे आणि विक्री करण्यावरील बंदी उठवली आहे. पण, या मूर्तींचे विसर्जन हे नैसर्गिक **(पान ४ वर)**

# अपघातात दोन ठार ११ जखमी

## हायवेववरील स्पीड ब्रेकर ठरला कर्दनकाळ



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : तालुक्यातील उस्थळ दुमाला शिवारात सोमवारी दि.९ जून रोजी पहाटे ५.१५ वाजण्याच्या च्या सुमारास झालेल्या क्रुझर व ट्रक अपघातात २ जण ठार तर इतर ११ जण जखमी झाले.

जखमी प्रथमेश योगेश तेली वय १४ वर्षे रा.बोदवड ता. बोदवड जिल्हा जळगाव हा उपचार दरम्यान मयत झाला तर वृषभ बबन सोनवणे वय १६ वर्षे यास पुढील उपचारासाठी अहिल्यानगर येथे खाजगी रुग्णालयात हलविले असता तो ही मयत झाला असल्याची माहिती पोलिस निरीक्षक धनंजय जाधव यांनी दिली.हायवेववरील स्पीड ब्रेकर हा अपघाताला कारणीभूत असल्याचे व घटनेतील कर्दनकाळ ठरला असल्याचे परिसरातील नागरिकांनी सांगितले. जळगाव जिल्ह्यातील बोदवड येथील केसरी स्पोर्ट अकॅडमीतील १३ मुले एमपीएल (एम पी एल) क्रिकेट पाहण्यासाठी गहुंजे (पुणे) येथे गेले होते.बोदवड कडे माघारी परतत असताना अहिल्यानगर ते संभाजीनगर महामार्गावर नेवासा तालुक्यातील उस्थळ दुमाला गावच्या हद्दीत पहाटे सव्वा पाच वाजण्याच्या सुमारास क्रुझर गाडीने ट्रकवर पाठीमागील बाजुस डॅश दिल्याने क्रुझर गाडीमधील प्रथमेश तेली नावाचा एक मुलगा जागेवरच ठार झाला आहे तर यातील गंभीर जखमी असलेला वृषभ सोनवणे यास उपचारासाठी नगर येथील खाजगी हॉस्पिटलमध्ये दाखल केले असता तो तेथेच मयत झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले

या अपघातात क्रीडा प्रशिक्षक उज्वल उर्फ भुषण सुभाष भोई,अक्षय संजय माळी वय २६ वर्षे, विद्यार्थी चिन्मय गजानन भोई वय १० वर्षे, कुश योगेश घाटे वय ११वर्षे, प्रदुम्न अनिकेत कुलकर्णी वय १० वर्षे, आरव विजय शेळके वय १२ वर्षे, प्रतिक विठोबा धुमक वय १५ वर्षे, हर्षल भगवान महाजन वय १४ वर्षे, आगम धरमचंद खिवसरा वय १४ वर्षे, वंश ओमप्रकाश अग्रवाल वय १२ वर्षे, रोहन अंकित बेगाने वय १२ वर्षे, साई गुलाब जाट वय १५ वर्षे, उदय मोहन कोल्हे वय १४ वर्षे,सर्व रा. बोदवड ता. बोदवड जिल्हा जळगाव हे जखमी झाले असून खाजगी रुग्णालयात ते उपचार घेत असल्याचे पोलिसांनी सांगितले. प्रशिक्षकांसह जखमी मुलांवर नेवासा फाटा येथे उपचार **(पान ४ वर)**

# शिवप्रेमींच्या उत्साहात न्हाऊन निघाला रायगड

## तिथीप्रमाणे ३५२ शिवराज्याभिषेक दिन सोहळा उत्साहात







**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**रायगड** : राज सदरेवरील वेदघोष आणि मंत्रघोष, छत्रपती शिवरायांच्या उत्सव मूर्तीवरील दुग्ध व जलाभिषेक, रायगडच्या कड्याकपारीत दुमदुमणारा शंखनाद, तुतारीची ललकारी आणि सोबतीला असलेले भगवे फेटे परिधान केलेले हजारो मावळे अशा मंगलमय वातावरणात रायगड किल्ल्यावर सोमवारी तिथीनुसार शिवराज्याभिषेक दिन सोहळा साजरा करण्यात आला. या वेळी संपूर्ण रायगड शिवप्रेमींच्या उत्साहात न्हाऊन गेला होता.

शिवराज्याभिषेक दिनोत्सव समिती दुर्गराज रायगड, कोकण कडा मित्रमंडळ आणि रायगड जिल्हा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड किल्ल्यावर सोमवारी (दि. ९) ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी तिथीप्रमाणे ३५२ शिवराज्याभिषेक दिन सोहळा पार पडला. राज सदरेवर सजविलेल्या मेघडंबरीसमोर शिवराज्याभिषेक दिन सोहळा पार पडला. रविवारी **(पान ४ वर)**

### ■ नव्या पिढीने अनुभवला अनुपम सोहळा

राज सदरेवर छत्रपती शिवरायांची चांदीची उत्सवमूर्ती आणण्यात आली. या उत्सवमूर्तीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते जल आणि दुग्धाभिषेक करण्यात आला. उपस्थित असलेल्या सर्व मान्यवरांच्या हस्ते अभिषेक करण्यात आला.'जय भवानी', 'हर हर महादेव'चा जयघोष राज दरबारात दुमदुमला. शिवराज्याभिषेकाचा पहिला सोहळा पाहू न शकलेल्या आजच्या पिढीला याचि देही याचि डोळा हा सोहळा पुन्हा पाहता आल्याचा आनंद शिवप्रेमींच्या चेहऱ्यावर दिसत होता. या सोहळ्यानंतर रायगड पोलिसांच्या वतीने छत्रपती शिवरायांना शासकीय मानवंदना देण्यात आली.

### ■ शाही शोभायात्रा आणि सांस्कृतिक कार्यक्रम

मुख्य सोहळ्यापूर्वी रायगडावर होळीच्या माळावर दांडपट्टा, लाठीकाठी, तलवारबाजी असे मर्दानी खेळ; तर शाहिरी पोवाडे, कलगी-तुरा, गोंधळ असे विविध सांस्कृतिक कार्यक्रम पार पडले. आमदार मंगेश चव्हाण यांच्या संकल्पनेतून पाच वर्षांपासून हजारो तरुण शिवप्रेमी शिवराज्याभिषेक दिनासाठी चाळीसगाव ते रायगड अशी रायगड मोहीम राबवत असतात. दरवर्षी नवीन तरुणांना रायगड दर्शन घडविणाऱ्या आमदार मंगेश चव्हाण यांचादेखील सन्मान करण्यात आला. शिवराज्याभिषेकाच्या मुख्य सोहळ्यानंतर ढोल-ताशे, लेझीम, हलगी व मृदुंगाच्या वाद्यात छत्रपती शिवाजी महाराजांची शाही शोभायात्रा मंदिराकडे नेण्यात आली.

# सर्व शासकीय कार्यालये सौर ऊर्जेवर

## 'महाऊर्जा'च्या नवीन प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणे** : राज्यातील सर्व शासकीय कार्यालये यंदा डिसेंबरअखेर सौरऊर्जेवर आणण्यासाठी गती देऊ. प्रधानमंत्री सूर्यघर योजना यशस्वी झाल्याने या योजनेशी पूरक योजना राबवण्याचा राज्य सरकारचा निर्धार आहे.

या अंतर्गत पहिल्या टप्प्यात १०० आणि दुसऱ्या टप्प्यात ३०० युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांना सौरऊर्जेवर आणले जाईल,'' अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरणाच्या (महाऊर्जा) नवीन प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन करताना ते बोलत होते. यावेळी विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, अपारंपरिक ऊर्जामंत्री अतुल सावे, महाऊर्जाच्या महासंचालक डॉ. कादंबरी बलकवडे आणि इतर नेते व अधिकारी उपस्थित होते.

फडणवीस म्हणाले, ''हरित इमारतीसाठी असलेली सर्व मानके पूर्ण करणारी, निसर्गाचा पूर्णपणे उपयोग करणारी, ऊर्जेची बचत करणारी आणि आवश्यक असणारी ऊर्जा १०० टक्के निर्माण करणारी महाऊर्जाची ही नवी इमारत हरित इमारतीचा उत्तम नमुना आहे. ऊर्जा बचतीच्या क्षेत्रात आणि अपारंपरिक ऊर्जेच्या क्षेत्रात, महाराष्ट्राने चांगली कामगिरी केली आहे. गेल्या दोन वर्षांत देशभरात चार लाख कृषी पंप बसविण्यात आले. हेच राज्याने अपारंपरिक ऊर्जेच्या वापरला प्रोत्साहन देत पाच लाख सौर कृषिपंप बसविले. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनीच्या माध्यमातून १६ हजार मेगावॉट क्षमतेचे फीडर २०२६ पर्यंत सौरऊर्जेवर परिवर्तित करण्यात येणार आहेत. त्याचे काम वेगाने सुरू आहे. आशियातील हा सर्वांत मोठा प्रकल्प आहे. सौर, पवन आणि हायड्रोजन क्षेत्रातही राज्याने भरारी घेतली आहे.''

शासकीय इमारतींमध्ये सौरऊर्जेचा वापर करण्यावर भर असल्याचे सांगताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी या वर्षी डिसेंबरपर्यंत सर्व शासकीय कार्यालयांना सौर ऊर्जेद्वारेच वीजपुरवठा होण्यासाठी कामाला गती आणणार असल्याचे सांगितले. तसेच, तीनशे युनिटपर्यंत वीजवापर **(पान ४ वर)**

- ✻ प्रधानमंत्री सूर्यघर योजना राज्यात आणखी प्रभावीपणे राबविणार
- ✻ राज्यातील ५२ टक्के वीज २०३० पर्यंत अपारंपरिक स्रोतांतून निर्माण करणार
- ✻ सौरऊर्जा निर्मितीतील अडचणी दूर करण्यास प्राधान्य
- ✻ थोरियमपासून ऊर्जानिर्मितीसाठी रशियन शासकीय कंपनीसोबत महत्त्वाचा करार, ऊर्जा क्षेत्रात क्रांतिकारक बदल घडविणार
- ✻ ऊर्जा निर्मितीतील बदल पर्यावरण संरक्षणालाही चालना देणारा ठरणार

### सौरऊर्जेमुळे विजेचे दर कमी करणार

सौरऊर्जानिर्मितीत आपण अग्रेसर आहोत. कुसुम योजनेच्या अंमलबजावणीतही महाराष्ट्र पुढे आहे. २०२६ च्या डिसेंबरपर्यंत कृषी क्षेत्राची विजेची संपूर्ण मागणी सौरऊर्जेवर परिवर्तित करता येईल. गेल्या २० वर्षांत दरवर्षी विजेचे दर नऊ टक्क्यांनी वाढत आहेत; पण २०२५ ते २०३० मध्ये विजेचे दर कमी करणार आहोत,' असेही फडणवीस म्हणाले.

# संपादकीय

## राजकीय पर्यटनाचा हिशेब

'ऑपरेशन सिंदूर'नंतर भारताच्या न्याय्य भूमिकेस पाश्चात्त्य देश, माध्यमे यांनी योग्य तो न्याय दिला नाही, अशी एक सर्वसाधारण भावना आपल्याकडे व्यक्त झाली. आपल्यावर दहशतवाद लादणाऱ्या पाकिस्तानला इतरांनी आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करून जितके खडसावयाला हवे होते तितके त्यांनी केले नाही. त्यात भारत-पाकिस्तान संघर्षात आपणच शस्त्रसंधी घडवून आणला असे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एकदा नव्हे तर तीन वा चार वेळा सांगून आपणावर अन्याय केला. सबब आपल्या सत्ताधीशांच्या मनात पाश्चात्त्य माध्यमे, विचारवंत, राज्यकर्ते इत्यादींबाबत एक अढी असते. म्हणून या सगळ्यांस आपण भीक का घालावी असा एक प्रश्न सतत आपल्या राज्यकर्त्यांकडून प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे विचारला जात असतो. तो योग्य. पण तरी जगास आपली भूमिका समजावून सांगण्यासाठी सर्वपक्षीय खासदार शिष्टमंडळे पाठवण्याचा 'मास्टरस्ट्रोक' निर्णय आपल्या शासकांनी घेतला. त्यानुसार ५९ खासदार ३२ देशांची सैर करून आले. डेमॉक्रॅटिक रिपब्लिक ऑफ कांगो, सिएरा लिओन, लायबेरिया, गयाना, ब्राझील, पनामा, कोलंबिया, स्लोवेनिया, अल्जेरिया, बहारीन, इथियोपिया, डेन्मार्क आदींसह अमेरिका, जपान, इंग्लंड, दक्षिण आफ्रिका, इटली अशा देशांस या खासदार-मंडळांनी भेटी दिल्या. या दौऱ्यात या सर्वांनी मिळून ७२ निवेदने प्रसृत केली. खासगी क्षेत्रात जेव्हा एखाद्या कर्मचाऱ्यास कंपनीखर्चाने परदेशी पाठवले जाते तेव्हा आल्यावर त्याने काय साध्य केले त्याचा आढावा घेतला जातो. भारत सरकारही तितक्याच कार्यक्षमतेने काम करत असल्याने या दौऱ्यांचा जमाखर्च मांडण्याच्या प्रयत्नाचे स्वागतच होईल. तो मांडण्याआधी एक प्रश्न. एका बाजूने या परदेशीयांची पत्रास आपण ठेवायची गरजच काय, असे मत व्यक्त केले जात असताना त्यांच्या समोर आपण आपली बाजू मांडायला मुळात गेलोच का? यातील पाश्चात्त्य देश, विचारवंत, माध्यमे भारतद्वेष्टी आहेत, भारताची प्रगती त्यांस बघवत नाही, भारत मोठा झालेला त्यांस नको आहे इत्यादी इत्यादी भावना सत्ताधीशांठायी असताना 'आम्ही किती चांगले आणि पाकिस्तान किती वाईट' अशी स्वसमर्थनाची गरज आपणास का वाटावी? दुसरे असे की यातील कित्येक देशांचे प्रमुख हे आपल्या पंतप्रधानांचे जीवश्चकंठश्च मित्र तरी आहेत किंवा त्यांचे मोठे चाहते तरी आहेत. उदाहरणार्थ अनुक्रमे अमेरिका आणि इटली. असे असताना मित्रांसमोर आपली बाजू मांडण्याची आवश्यकता काय? बरे, ती आहे असे मानले तर निदान त्या देशाच्या सर्वोच्च नेत्यांनी-म्हणजे आपल्या पंतप्रधानांच्या मित्र/चाहत्यांनी- आपल्या शिष्टमंडळांचे स्वागत करून त्यांचे ऐकून घ्यायला हवे. तेव्हा अमेरिकेत अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि इटलीत पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांनी आपल्या शिष्टमंडळांचे आदरातिथ्य करून त्यांस सन्मानाने वागवणे अपेक्षित होते. कारण ज्या प्रमाणे ट्रम्प आपल्या पंतप्रधानांचे मित्र आहेत त्याच प्रमाणे मेलोनी या आपल्या पंतप्रधानांच्या निस्सीम चाहत्या आहेत. तेव्हा या उभयतांकडून अशी अपेक्षा करणे गैर नाही. परंतु तसे झाल्याचे दिसत नाही. अमेरिकेत उपाध्यक्ष जेडी व्हान्स हे आपल्या शिष्टमंडळास भेटले आणि इटलीत तेथील प्रतिनिधीगृहाच्या फुटकळ समिती प्रमुखांपलीकडे कोणी अन्य आपल्या शिष्टमंडळास सामोरे गेल्याचे दिसत नाही. भारत-पाक संघर्षात अमेरिकेचे उपाध्यक्ष व्हान्स यांनी 'भारत आणि पाकिस्तान त्यांचे त्यांचे काय ते बघून घेतील' अशा अर्थाचे विधान केले होते, त्याचे स्मरण या प्रसंगी अनुचित ठरणार नाही. ही शिष्टमंडळे आपण पाठवली कारण पाश्चात्त्य माध्यमांनी 'ऑपरेशन सिंदूर', ते सुरू करण्यामागील आपली अपरिहार्यता आणि या मोहिमेतील आपले भव्य यश यांची दखल घेतली नाही, असे एक समर्थन या संदर्भात केले गेले. त्यातील तथ्याबाबत दुमत नाही.

त्यामुळे पुढील प्रश्न असा की या ३२ देशांतील किती प्रमुख प्रमुख माध्यमांनी या भारतीय लोकप्रतिनिधी भेटीस विस्तृत प्रसिद्धी देत त्यावर संपादकीय भाष्य अथवा टिप्पणी केली? सिएरा लिओन, कांगो, पनामा अशा देशांत आपल्या खासदार दौऱ्यास भरपूर प्रसिद्धी दिली असे एक वेळ मान्य करता येईलही. कारण दृष्टीआड सृष्टी. पण जे दृष्टीसमोर आहे त्यांचे काय? म्हणजे लंडनचा 'द फायनान्शियल टाइम्स', 'द टाइम्स', 'गार्डियन', जपानमधील 'असाई शिंबून', 'द जपान टाइम्स', फ्रान्समधील 'ले मॉंद' वा 'ले फिगारो', अमेरिकेतील 'द न्यूयॉर्क टाइम्स', 'द वॉशिंग्टन पोस्ट' ही वर्तमानपत्रे आणि 'बीबीसी', 'सीएनएन', 'फॉक्स' आदी प्रमुख वृत्तवाहिन्यांनी या आपल्या 'मास्टरस्ट्रोक'ला किती महत्त्व दिले? याचे सर्वसमावेशक उत्तर शून्य असे देता येईल. नाही म्हणायला साऊथ आफ्रिकेत तेथील प्रमुख वर्तमपत्र 'द स्टार'ने सुप्रिया सुळे यांची सविस्तर मुलाखत छापली. पण त्यामागे त्यांचे वडील जे की शरद पवार यांचा हात असणार असा संशय सत्ताधाऱ्यांतील काही वा त्यांच्या समर्थकांतील बहुतेक सर्व घेतीलच. तसा तो घेण्यास जागा आहे कारण दक्षिण आफ्रिकेच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व सुळे यांच्याकडे होते. त्यामुळे आपले पंतप्रधान आणि शरद पवार यांचे सौहार्दाचे संबंध लक्षात घेता अन्य काही देशांच्या शिष्टमंडळांचे नेतृत्वही सुळे यांच्याकडे दिले गेले असते तर या दौऱ्यांस अधिक प्रसिद्धी मिळती असेही काहींचे म्हणणे असेल. तेही रास्तच. अन्यत्र कुवेत, बहारीन, सौदी अरेबिया इत्यादी देशांत नाही म्हणायला तेथील माध्यमांनी आपल्या खासदार दौऱ्याची दखल घेतली. पण या देशातील सत्ताधाऱ्यांकडेच त्यांच्या माध्यमांची मालकी असल्याने त्यास किती महत्त्व द्यावे, हा प्रश्न. बाकीच्या ठिकाणी परिस्थिती तशी दयनीयच म्हणायची. कारण फ्रान्ससारख्या महत्त्वाच्या देशात तर आपल्या शिष्टमंडळास भारत-फ्रान्स मैत्री संघांतील सरकारी पदाधिकाऱ्यांव्यतिरिक्त कोणी ज्येष्ठ भेटल्याचे उपलब्ध माहितीवरून तरी दिसत नाही. अन्य देशांत तेथील ज्येष्ठ पत्रकार, संपादक, विचारगट वगैरेंनी आपल्या प्रतिनिधींशी संवाद साधला, भारताची बाजू समजावून घेतली, त्यावर भाष्य करणारी टिपणे लिहिली असे काही अद्याप तरी समोर आलेले नाही. त्यातल्या त्यात आनंद रशियाने दिला असे म्हणता येईल. द्रमुकच्या खासदार कनिमोळी यांच्या अध्यक्षतेखालील समितीस 'रशियन टेलिव्हिजन' (आरटी) या सरकारी वाहिनीने तशी बरी प्रसिद्धी दिली. पण उपमंत्र्यांपेक्षा कोणी वरिष्ठ आपल्या लोकप्रतिनिधींस भेटला असे दिसत नाही.या दौऱ्यात सर्वात उजवी ठरली ती शशी थरूर यांची कामगिरी. त्यांच्या बौद्धिक चातुर्यामुळे कोलंबियाने पाकिस्तान संदर्भात केलेला ठराव मागे घेतला. जागतिक अर्थकारण, राजकारण आदींत कोलंबिया या देशाचे स्थान लक्षात घेतल्यास या विजयाचा आनंददेखील कमी नाही. बाकी या दौऱ्याचा फायदा भारतास किती झाला, किती नाही याची चर्चा अहमहमिकेने अनेक करतील. पण एक मुद्दा या दौऱ्याबाबत निर्विवाद दिसतो. तो म्हणजे शशी थरूर यांची उजळलेली प्रतिमा. सत्ताधीशांस एके काळी हे थरूर किती नकोसे होते, त्यांच्या विषयी काय काय बोलले गेले हा ताजा इतिहास. पण देशहितास नेहमीच प्राधान्य देणाऱ्या सत्ताधीशांनी या इतिहासाकडे दुर्लक्ष केले आणि तितक्याच देशाभिमानी थरूर यांनी देशाबरोबर स्वत:ची प्रतिमा उजळवण्याच्या या संधीचे सोने केले. आता पंचाईत ही की त्यांची प्रतिमा इतकी उजळली की परराष्ट्रमंत्री जयशंकर यांच्यापेक्षा थरूर हेच बरे असे आता सत्ताधाऱ्यांस वाटू लागेल की काय असा प्रश्न पडतो. कदाचित आपल्याकडेही असा चमकदार थरूर का नाही, असे त्या विचारधारेतील काहींस वाटू शकेल. अशा वेळी आयात हा सिद्धहस्त पर्याय आहेच. तेव्हा परराष्ट्रमंत्रीपद मिळत असल्यास थरूर यांनीही ते जरूर स्वीकारावे आणि काँग्रेसनेही उदार अंत:करणाने त्यांस भाजपस उसने द्यावे . आता या सर्वांकडून आपले दौरे कसे अत्यंत यशस्वी झाले त्याचे दावे केले जातील आणि सत्ताधीश आपल्या मास्टरस्ट्रोकच्या आत्मस्तुतीत मग्न होतील. तथापि या मास्टरस्ट्रोकचे मर्दन अनेक देशांत सुरू असतानाच संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या दहशतवादविरोधी समितीच्या सहप्रमुखपदी पाकिस्तानची निवड झाली या वृत्ताकडे दुर्लक्ष केलेले बरे. शेवटी वाईट पाहिले नाही तर वाईट दिसत नाही या उक्तीनुसार हे सर्व दौरे यशस्वी झाले असे मान्य केले की त्यांचे अपयश लक्षात घेण्याचा प्रश्नच येत नाही. सबब या राजनैतिक पर्यटनाचा हिशेब हवा कोणास?

# बोपदेव घाट बलात्कार प्रकरणातील तिसरा आरोपी अखेर अटकेत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणे:** पुण्यातील बोपदेव घाटात ३ ऑक्टोबर २०२४ रोजी घडलेल्या सामूहिक बलात्कार प्रकरणात मोठी माहिती समोर आली आहे. या प्रकरणातील तिसरा आरोपी सूरज दशरथ गोसावी उर्फ बाप्या (वय ३३) याला सहा महिन्यांच्या शोधानंतर अखेर २६ एप्रिल रोजी सोलापूर जिल्ह्यातील अकलूज येथील बसस्थानकावरून अटक करण्यात आली. वालचंदनगर पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणातील पीडित २१ वर्षीय तरुणी आणि तिचा मित्र, दोघेही पुण्याबाहेरील महाविद्यालयीन विद्यार्थी, ३ ऑक्टोबर २०२४ रोजी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास बोपदेव घाट परिसरात मोटरसायकलवरून फिरत होते. त्यावेळी तीन आरोपींनी धारदार शस्त्रांचा धाक दाखवून त्यांच्याकडील मौल्यवान वस्तू लुटल्या. यानंतर, त्यांनी तरुणीच्या मित्राला त्याच्या शर्ट आणि बेल्टने बांधून तिला एका निर्जन ठिकाणी ओढत नेलं आणि तिच्यावर सामूहिक बलात्कार केला. दरम्यान, या घटनेने संपूर्ण पुणे शहरात संतापाची लाट उसळली होती. पुणे शहर पोलिसांच्या गुन्हे शाखेने तातडीने कारवाई करत दोन आरोपींना काही दिवसांतच अटक केली. चंद्रकुमार रविप्रसाद कनोजिया (वय २०, मूळ दिंदोरी, मध्य प्रदेश) याला १० ऑक्टोबर रोजी आणि अख्तर बाबू शेख उर्फ शोएब (वय २७) याला १४ ऑक्टोबर रोजी प्रयागराज येथून अटक करण्यात आली. पोलिसांनी शेख हा या गुन्ह्याचा मुख्य सूत्रधार असल्याचे सांगितले होते. मात्र, तिसरा आरोपी सूरज गोसावी हा गेल्या सहा महिन्यांपासून फरार होता. त्याने आपला मोबाइल फोन बंद ठेवला होता आणि पत्नी, कुटुंब किंवा मित्रांशी संपर्क साधला नव्हता. पुणे शहर आणि ग्रामीण पोलिसांच्या अनेक पथकांनी त्याचा शोध घेतला. सुरुवातीला अटक केलेल्या दोन आरोपींनी गोसावीचु नाव सोमनाथ यादव असं खोटं सांगून तपासाला खीळ घालण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी पडताळणीनंतर त्याचं खरं नाव सूरज दशरथ गोसावी उर्फ बाप्या असल्याचे समोर आले. पुणे ग्रामीण पोलिसांच्या एका अधिकाऱ्याने सांगितले, ''गोसावीचा शेवटचा ठावठिकाणा वालचंदनगर पोलीस स्टेशनच्या हद्दीत होता. या संवेदनशील प्रकरणामुळे पुणे शहर गुन्हे शाखेसोबतच पुणे ग्रामीण पोलिसही त्याचा शोध घेत होते.'' वालचंदनगर पोलीस स्टेशनचे सहाय्यक निरीक्षक राजकुमार दुनगे यांच्या नेतृत्वाखालील पथकानं गुप्त माहितीदारांच्या माध्यमातून गोसावीच्या हालचालींवर लक्ष ठेवले होते. २६ एप्रिल रोजी एका खबऱ्याने वालचंदनगर पोलिसांना फोन करून सांगितलं, ''तो (बाप्या) माझ्यासमोर आहे.'' त्यावेळी पोलीस पथक एका दुसऱ्या प्रकरणाच्या तपासासाठी तिथेच रस्त्यावर होते. बाप्या एका पाण्याच्या टँकरच्या केबिनमध्ये बसल्याचं सांगितलं. पोलिसांनी माहितीदाराला टँकरचा पाठलाग करण्यास सांगितलं आणि स्वतःही त्याच्या मागावर लागले. अकलूजच्या बसस्थानकावर गोसावी खाली उतरताच पोलिसांनी त्याला ताब्यात घेतलं आणि नंतर पुणे शहर पोलिसांच्या गुन्हे शाखेकडे सुपूर्द केले. दरम्यान, या अटकेमुळे बोपदेव घाट सामूहिक बलात्कार प्रकरणातील तिन्ही आरोपी आता पोलिसांच्या ताब्यात आहेत. पुढील तपास पुणे शहर पोलिसांची गुन्हे शाखा करत आहे.

# पाथर्डीत स्मार्ट मीटर बसवण्यास सर्वपक्षीय कार्यकर्त्यांचा विरोध

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी :** शहरात महावितरणकडून जबरदस्तीने स्मार्ट मीटर बसवण्याच्या मोहिमेविरोधात नागरिक आणि सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी तीव्र आंदोलन छेडले.सोमवारी महावितरणच्या कार्यालयात ठिय्या आंदोलन करत कार्यकर्त्यांनी स्मार्ट मीटर बसवणे त्वरित थांबवण्याची मागणी केली.यावेळी आंदोलक आणि अधिकाऱ्यांमध्ये तीव्र शाब्दिक चकमक झाली.ठेकेदाराने जबरदस्ती कायम ठेवल्यास कडक कारवाईचा इशारा कार्यकर्त्यांनी दिला. या आंदोलनात माजी नगरसेवक बंडू पाटील बोरुडे, भाजपचे मुकुंद गर्जे,राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे योगेश रासने,काँग्रेसचे तालुका अध्यक्ष नासिर शेख, माजी नगरसेविका मनीषा उदमले,सुनील कदम,परवेज मणियार, भैय्या इजारे,सुंदरदास कांबळे, विवेक देशमुख, जब्बार आतार,उमेश खटावकर, दत्तात्रय कांबळे, संतोष उदमले, विशाल निऱ्हाळी,आकाश निऱ्हाळी,ओम भालसिंग,राहुल रोडी,राजेंद्र खोजे यांच्यासह अनेक कार्यकर्ते सहभागी झाले.बंडू पाटील बोरुडे म्हणाले की,स्मार्ट मीटरमुळे तांत्रिक बिघाड वारंवार होत असून,नागरिकांना अवाजवी वीजबिले येत आहेत.हे काम त्वरित थांबवले नाही, तर पाथर्डी बंद करून तीव्र आंदोलन उभारू असा इशारा त्यांनी दिला. विज चोरी होत असेल तर ती थांबवण्याचे काम प्रशासनाचे आहे.मात्र त्या चोरीचे ओझे सामान्य नागरिकांवर स्मार्ट मीटरच्या माध्यमातून लादले जात आहे.तसेच वादळी वाऱ्याने वाकड्या झालेल्या पोलांचे दुरुस्ती काम रखडले असून, बिलांच्या तक्रारींकडेही दुर्लक्ष होत असल्याचा आरोप त्यांनी केला. मुकुंद गर्जे म्हणाले,नागरिकांच्या संमतीशिवाय स्मार्ट मीटर बसवणे त्वरित थांबवावे अन्यथा तीव्र आंदोलन होईल, असे त्यांनी ठणकावले.एक वर्षापूर्वीच मीटर बदलले असूनही पुन्हा पुन्हा त्याच त्रासाला सामोरे जावे लागत आहे. हे स्मार्ट मीटर आमच्या शहरासाठी नको अशी भूमिका त्यांनी घेतली. योगेश रासने म्हणाले,तुम्ही जनतेचे सेवक आहात, हुकूमशाही खपवून घेणार नाही.

# पहिली वर्गाच्या अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण सुरु

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर:** महाराष्ट्र शासन जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अहिल्यानगर आणि पंचायत समिती, राहाता यांच्या संयुक्त विद्यमाने राहाता येथे इयत्ता पहिली वर्गाच्या अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण आज पासून सुरू झाले आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५- २६ पासून महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि केंद्रीय बोर्डाचा अभ्यासक्रम स्वीकारल्यामुळे पहिलीचा अभ्यासक्रम बदलणे क्रम प्राप्त होते. पहिलीचा अभ्यासक्रम बदलल्यानंतर हे प्रशिक्षण सुरू झाले आहे. यंदा इयत्ता पहिलीपासून नवीन शैक्षणिक धोरणाची सुरुवात टप्प्याटप्प्याने होत आहे. त्यामुळे जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या माध्यमातून दि. २८ ते ३० मे २०२५ या कालावधीत कोकमठाण येथे पहिल्या इयत्तेचे अभ्यासक्रमाचे जिल्हास्तरीय प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर आता जिल्ह्यातील तालुकास्तरावरचे प्रशिक्षण सुरू झाले आहे. राहाता येथील पहिली वर्गास शिकवणारे १७० शिक्षकांचे प्रशिक्षण गटशिक्षणाधिकारी राजेश पावसे व समन्वयक दिलीप दहिफळे यांच्या मार्गदर्शनाखाली रयत शिक्षण संस्थेच्या शारदा विद्या मंदिर येथे हे प्रशिक्षण दि. ९ ते ११ जून २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे. नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीनुसार टप्प्याटप्प्याने आयोजित केलेल्या या प्रशिक्षणामध्ये राहाता तालुका अधिनस्त सर्व जिल्हा परिषद खाजगी अनुदानित व विनाअनुदानित प्राथमिक शाळांमधील इयत्ता पहिली वर्गात शिकवणाऱ्या सर्व शिक्षकास हे प्रशिक्षण सक्तीचे करण्यात आलेले आहे.

# मोबाईल दुकानदारास खंडणी मागून मारहाण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** तु लय माजला काय? तुला येथे दुकान चालवायचे असेल तर तुला पैसे दयावे लागतील, असे म्हणून आरोपीने सागर संगपाळ या मोबाईल शॉपी दुकानदारास दमदाटी करुन लोखंडी वस्तूने बेदम मारहाण केल्याची घटना दि. ६ जून रोजी दुपारच्या सुमारास राहुरी तालुक्यातील वांबोरी येथे घडली. सागर मनोहर संगपाळ, वय ३३ वर्षे, हा तरुण राहुरी तालुक्यातील वांबोरी येथे राहत असून त्याचे वांबोरी येथील बाजार तळावर एस टी मोबाईल शॉपी अॅन्ड इलेट्रॉनिक्स नावाचे दुकान आहे. दि. ६ जून २०२५ रोजी दुपारी १२.३० वाजेच्या सुमारास सागर संगपाळ हा तरुण त्याच्या दुकानात ग्राहकांना मोबाईल दाखवत असताना तेथे आरोपी आला. व म्हणाला की, तु लय माजला काय? तु मला तुझ्या गल्ल्यातील पैसे दे. तेव्हा सागर संगपाळ त्याला म्हणाला की, तुला कशाचे पैसे द्यायचे तुझे माझ्याकडे पैसे आहेत काय ?. माझा काही तुझ्याकडे व्यवहार नाही. त्यामुळे मी तुला पैसे देणार नाही. तेव्हा आरोपी म्हणाला की, तुला येथे दुकान चालवायचे असेल तर तुला पैसे द्यावे लागतील. तेव्हा सागर संगपाळ या तरुणाने त्याला पैसे देण्यास नकार दिला. त्याचा राग आल्याने आरोपीने सागर संगपाळ याला काहीतरी लोखंडी वस्तुने मारहाण करुन जखमी केले. तेव्हा तुषार राजेंद्र दाते हा भांडण सोडविण्यासाठी आला असता आरोपी त्याला म्हणाला की तु जर मध्ये भांडण सोडवायला आला तर तुला पण मारेल, तसेच सागर संगपाळ याला जिवंत सोडत नाही, अशी धमकी दिली.

त्यानंतर सागर मनोहर संगपाळ या तरुणाने राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्या फिर्यादीवरून आरोपी अमोल ऊर्फ गोट्या हिरामन चौगुले, रा. वांबोरी, ता. राहुरी, याच्यावर गुन्हा रजि. नं. ६४३/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ११५ (२), ११८ (१), ३०८ (२), ३०८ (३), ३३३, ३५१ (२), ३५२ प्रमाणे मारहाण व खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी समाजहितासाठी दक्ष राहून काम करावे : विवेक कोल्हे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**कोपरगाव :** भारतीय जनता पार्टीच्या कोपरगाव तालुकाध्यक्ष (पश्चिम मंडळ) पदावर सुनील कदम यांची निवड झाल्याबद्दल कोपरगाव आणि पंचक्रोशीतील नागरिकांच्या वतीने भव्य नागरी सत्कार समारंभ राघवेश्वर मंदिर, कुंभारी येथे उत्साहात पार पडला. सहकार महर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष युवानेतृत्व विवेकभैय्या कोल्हे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सत्कार सोहळा अत्यंत प्रेरणादायी वातावरणात पार पडला. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.या प्रसंगी सुनील कदम यांचा सन्मान करण्यात आला आणि पुढील राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या सोहळ्याला नागरिकांचा व कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाला ज्येष्ठ नेते शरदनाना थोरात, कोल्हे कारखाना व्हा . चेअरमन राजेंद्र कोळपे, बाजार समिती सभापती साहेबराव रोहोम, औद्योगिक वसाहत उपाध्यक्ष केशवराव भवर,माजी सभापती पं.स. मच्छिंद्र केकाण, विलास वाबळे, सोपानराव पाणगव्हाने, ज्ञानेश्वर होन, कैलास माळी, रमेश घोडेराव, संभाजीराव गावंड, रघुनाथ फटंगारे, फकिरराव बोरणारे, दीपक चौधरी, दगूराव चौधरी, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष अमोल गवळी, मा.सरपंच बाळासाहेब पाणगव्हाने, मा.सभापती सुनीलराव देवकर, मा.तालुकाध्यक्ष युवा मोर्चा विक्रम पाचोरे, राजेंद्र गवळी, डी.पी. मोरे, निवृत्ती बनकर, शिवाजी जाधव, संदीपराव देवकर, शिवाजीराव कदम, विजयराव कदम, किरण कोळपे, बापूसाहेब पवार, शब्बीर पटेल, पुंजाजी राऊत आदीसह मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना युवानेते विवेक कोल्हे म्हणाले चांगले काम करणाऱ्याला न्याय देण्यात यावा अशी भूमिका बिपीन कोल्हे आणि मा.आ.सौ. स्नेहलताताई कोल्हे यांच्यासह आम्हा सर्वांची आहे.पक्ष वाढीसाठी आपण पूर्ण ताकदीनिशी काम करतो आहोत. पक्षहितासाठी आपण गत निवडणुकीत भूमिका घेतली पण दुर्दैवाने जे यश आपण लोकप्रतिनिधींच्या पदरात टाकले त्याप्रमाणे अपेक्षित काम होताना दिसत नाही हे वास्तव आहे यामुळे नागरिकांच्या समस्या आणि प्रश्न सोडवण्यासाठी पक्षाच्या माध्यमातून आपले काम सुरू आहे.

# माणूस चार्जिंगला कुठं लावायचा ?

आपण रोज स्मार्टफोन वापरतो, आणि तो चार्ज न केला तर तो बंद पडतो – हे तर सगळ्यांनाच ठाऊक आहे.पण माणूस? तोही रोज धावत असतो,विचार करतो, चिंता करत असतो आणि एक दिवस 'लो बॅटरी'सारखा थकून जातो.मग प्रश्न असा - माणूस चार्जिंगला कुठं लावायचा? तर त्याचं उत्तर आहे - ''माणसाचेही चार्जर असतात, पण ते इलेक्ट्रॉनिक नाहीत, 'जीवनदायी' असतात!'' चला पाहूया असे कोणतेतरी 'मानवी चार्जर' जे आपल्याला नवचैतन्य देतात:

**निसर्गाचा सहवास:** झाडं,पाणी,पक्षी,वारा - या गोष्टी मनाला रीलोड करतात. निसर्गात वेळ घालवला की आतून शांती लाभते.

**चांगले मित्र:** हसणं,बोलणं,मस्ती करणं – हे मित्रांमुळेच तर शक्य होतं! ते मानसिक थकवा दूर करून आपल्याला चार्ज करतात.

**योगाभ्यास आणि व्यायाम:** शरीर हालवलं की मन हलकं होतं. व्यायाम म्हणजे नैसर्गिक 'मूड बूस्टर'!

**अभ्यास आणि वाचन:** नवीन गोष्टी शिकणं आणि चांगली पुस्तकं वाचणं – हे तुमच्या विचारसृष्टीला ताजंतवानं करतं.

**मैदानी खेळ:** खेळात स्पर्धा असते,मजा असते आणि आरोग्यही सुधारतं – यामुळे शरीर आणि मन दोन्ही फिट राहतं.

**चांगले छंद:** गाणं, छायाचित्रण,लेखन, पाककला... छंद म्हणजे स्वतःला चार्ज ठेवण्याचं सुंदर कारण.

**प्रसन्न संगीत:** एक चांगलं गाणं कधी कधी हजार शब्दांपेक्षा जास्त ऊर्जा देतं.

**स्वत:साठी पर्यटन:** कधीमधी स्वतःसाठी बाहेर फिरायला गेलं की आयुष्य नवीन वाटतं.

**संतुलित आहार:** बॅटरी चार्ज होण्यासाठी योग्य करंट लागतो, आणि शरीरासाठी तो म्हणजे पौष्टिक आहार!

**लेखक : गौरव डेंगळे,**
**श्रीरामपूर,०८७९३३२१५१५**

# प्रवरेच्या बी.एड. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये उत्कृष्ट कामगिरी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लोणी :** लोकनेते पद्मभूषण डॉ.बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील प्रवरा ग्रामीण शिक्षणशास्त्र महाविद्यालयाने आयोजित केलेल्या कॅम्पस इंटरव्ह्यू मध्ये विद्यार्थ्यांची निवड झाल्याची माहिती प्राचार्य डॉ. सचिन भोसले यांनी दिली. साध्वी प्रितीसुधाजी इंग्लिश मिडीयम स्कूल, राहता येथे कु. वैष्णवी शेळके, कू. ऋतुजा निबे, कू. रेणुका गायकवाड यांची तर आनंद निकेतन इंग्लिश मिडीयम स्कूल, मांडवे येथे कू. पुजा झाडगे हिची निवड झाली. शाळेतील प्रतिनिधींनी बी.एड.महाविद्यालयात येऊन विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या, त्यामध्ये वरील विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुश्मिता विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रवरा ग्रामीण शिक्षणशास्त्र महाविद्यालय विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याबरोबरच नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यात अग्रेसर असल्याचे डॉ. सचिन भोसले सांगत महाविद्यालयाच्या माध्यमातून सक्षम विद्यार्थी घडवण्याचे प्रयत्न हे सुरू आहे. शिक्षण शास्त्र महाविद्यालयाचा विद्यार्थी हा सर्व गुण संपन्न असावा त्याच्या माध्यमातून मुलांना संस्कार शिक्षण मिळावे यासाठी विशेष प्रयत्न महाविद्यालयाच्या माध्यमातून सुरू असतात त्याचबरोबर येथील विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच कौशल्य विकास, मुलाखत मुलाखत, व्यावसायिक दृष्टिकोन प्रक्षेत्र भेटी, प्रत्यक्ष कृतीडरे शिक्षण दिले जात असल्यामुळे आज प्रवरेच्या शिक्षण शास्त्र महाविद्यालयाचा विद्यार्थी हा विविध शैक्षणिक संस्थेमध्ये कार्यरत असल्याचेही भोसले यांनी सांगितले. या विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष आणि जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ. शालिनीताई विखे पाटील, माजी खा.डॉ.सुजय विखे पाटील, सहसचिव भारत घोगरे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ, अतांत्रिक विभागाचे शिक्षण संचालक डॉ. प्रदीप दिघे,संस्थेचे प्लेसमेंटचे समन्वयक प्रा.मनोज परजणे यांनी अभिनंदन केले आहे.




हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Bahasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, Emal ID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818

द • ख • ल

## कै. मुळे शाळेच्या आदिती देवकरची इस्रोसाठी निवड



**आंबी :** श्रीरामपूर येथील गुरुदेव दत्त एज्युकेशन सोसायटी सावरगाव संचलित कै. अनिल दिगंबर मुळे विद्यालयाची पाचवीची विद्यार्थिनी आदिती राहुल देवकर हिने अवकाश संशोधन क्षेत्रातील डॉ. सी. व्ही. रमण बालवैज्ञानिक परीक्षेत तालुक्यात पाचवा क्रमांक मिळविला. यामुळे भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) च्या सहलीसाठी आदितीची निवड झाली आहे. या कार्यक्रमांतर्गत आदिती बरोबरच निवडक विद्यार्थ्यांना इस्रोच्या शास्त्रज्ञांशी संवाद साधण्याची, कार्यशाळेत सहभागी होण्याची आणि अवकाश संशोधनाच्या मूलभूत संकल्पना समजावून घेण्याची संधी मिळणार आहे. त्याचबरोबर आदितीने मंथन राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षेत ३०० पैकी २३२ गुण मिळवून तालुक्यात दुसरा क्रमांक, शासकीय शिष्यवृत्ती परीक्षेत ३०० पैकी १९८ गुण मिळवून उत्तीर्ण झाली आहे. आदितीने या निवड प्रक्रियेत आपली बुद्धिमत्ता आणि उत्साहाने सर्वांना प्रभावित केले आहे. आदिती देवकरच्या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संजय (बापू) कुलकर्णी, सचिव सुनीताताई संजय कुलकर्णी, उपाध्यक्ष संतोष कावले, संचालक मधुकर मेहेत्रे, मुख्याध्यापिका श्रीमती देठे यांसह सर्व शिक्षक वृंद, संस्था पदाधिकारी, शाळा व्यवस्थापन समिती, पालक वर्ग यांनी शुभेच्छा देऊन अभिनंदन केले आहे.

## पेमगिरीत महावटवृक्ष परिसरात आज वटपौर्णिमा उत्सव



**संगमनेर :** संगमनेर तालुक्यातील पेमगिरी येथील स्वराज्य संकल्प भूमी मोरदरा येथील महाकाय वटवृक्षाच्या परिसरात जाकमत बाबा आणि महायुती संगमनेर तालुका महिलाआघाडीच्या वतीने खास महिलांसाठी उत्सव माझ्या कुंकवाचा वटसावित्री पौर्णिमेचा या कार्यक्रमाचे मंगळवार दि १० जून २०२५ रोजी आयोजन करण्यात आले आहे.संगमनेर तालुक्यातील पेमगिरी येथील मोरदरा परिसरात इतिहासकालीन महा काय वटवृक्ष आहे .महाकाय वटवृक्षाच्या सानिध्यात महिलांचा वटसावित्री पौर्णिमा उत्सव साजरा व्हावा यासाठी जाकमत बाबा तरुण मित्र मंडळ आणि संगमनेर तालुका महायुती महिला आघाडी यांच्या वतीने कार्यक्रमाची जय्यत तयारी सुरू आहे.या कार्यक्रमाला जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, धनश्रीताई सुजय विखे पाटील आणि नीलमताई अमोल खताळ पाटील या महिला मान्यवर उपस्थित राहुन सर्व महिलांना मार्गदर्शन करणार आहे.

# नुकसानग्रस्तांना स्थायी आदेशाच्या पलिकडे जाऊन मदत करणार : ना.विखे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहाता :** जिल्ह्यात मागील काही दिवसांत मोठ्या स्वरुपातील पावसाने झालेल्या नूकसानीचा विचार करता स्थायी आदेशाच्या पलिकडे जावून मदत करण्याचा विचार करावा लागणार आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी प्राथमिक चर्चा झाली असल्याची माहिति जलसंपदा तथा पालक मंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

राहाता तालुक्यातील बाभळेश्वर, राजुरी ममदापूर, तिसगाव वाडी,अस्तगावच्या काही भागांमध्ये चक्रीवादळ सदृश्य पावसाने या भागातील डाळिंब,आंबा, ऊस आणि साठवलेल्या कांद्याचे तसेच घरे गोठा यांवर झाडे पडून मोठे नुकसान झाले. या नुकसानग्रस्त भागाला जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी भेटी देऊन शेतकऱ्यांना दिलासा दिला. अधिकाऱ्यांना सरसकट पंचनामे करण्याच्या सूचना देत सरकार हे नैसर्गिक संकटात शेतकऱ्यांसह नागरिकांच्या पाठीशी भक्कमपणे उभे असल्याची ग्वाही दिली.

झालेल्या नूकसानीचे सरसकट सरसकट पंचनामे करा, महावितरणाचा वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करावे अशा सूचना मंत्री विखे पाटील यांनी पाहाणीनंतर अधिकाऱ्यां समवेत घेतलेल्या बैठकीत दिल्या. शनिवारी सायंकाळी बाभळेश्वर, राजुरी, ममदापूर, तिसगाव, अस्तगाव या भागामध्ये चक्री वादळाने या भागातील फळबागा तसेच शेती पीकांचे मोठ्या प्रमाणात नूकसान झाले आहे. भाऊसाहेब विनायक म्हस्के यांची कांदा चाळ, डाळिंब उत्पादक राहुल सुरेश कसाब आणि डाळींबरत्न बी. टी. गोरे यांच्या



डाळींब बागा थेट शेतात जाऊन या नुकसानग्रस्त भागाची पाहणी त्यांनी केली यावेळी प्रांत अधिकारी माणिक आहेर तहसीलदार अमोल मोरे तालुका कृषी अधिकारी आबासाहेब भोरे यांच्यासह वीज वितरण कंपनी सार्वजनीक बांधकाम विभागाचे अभियंता उपस्थित होते.

मंत्री विखे पाटील यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची संवाद साधत सरकार आपल्या पाठीशी असल्याची ग्वाही दिली.शासनाच्या वतीने सरसकट पंचनामे करण्याचे आदेश दिले असल्याचे त्यांनी सांगितले.ज्या ठिकाणी पंचनामे करण्यासाठी अडचणी आहेत मदत देण्यासाठी अडचणी आहेत या संदर्भात आपण स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांच्याशी बोलून नुकसान भरपाई कशी मिळेल यासाठी प्रयत्न करणार असल्याचे मंत्री विखे पाटील यांनी माध्यमांशी बोलतांना सांगितले. वातावरणात झालेल्या बदलाने नैसर्गिक चक्र पूर्णपणे बदलले आहे. काही दिवसांपुर्वी पुणे जिल्ह्यात झालेल्या पावसाने एका दिवसात धरणात एक टिएमसी पाणी येणे हे सुध्दा घडू शकते.त्यामुळे नैसर्गिक परीस्थितीला सामोरे जाण्याशिवाय पर्याय नाही.

वादळी वार्याने या भागातील वीज पुरवठा हा गेल्या दोन दिवसापासून बंद आहे वीज पुरवठा तातडीने सुरू करण्यासाठी महावितरणच्या अधिकाऱ्यांनी युध्द पातळीवर प्रयत्न करण्याचे निर्देश मंत्री विखे पाटील यांनी दिले. आपत्ती नैसर्गिक आपती असली तरी,भविष्यात नुससान कसे टाळता येऊ शकते यावरच उपाय योजना करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. प्रत्येकाचा पंचनाम करून तातडीने अहवाल सादर करा अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

पाहणी दरम्यान त्यांनी डाळिंब उत्पादकांशीही संवाद साधला अनेक भागांमध्ये डाळिंब उत्पादकांनी नवनवीन तंत्रज्ञान वापरले आहे आणि नवीन तंत्रज्ञानाच्या वापरामुळे शेतकऱ्यांना उत्पादनही मोठ्या प्रमाणात मिळत आहे. राहुल कसाब यांची फळभाग पूर्णपणे भुईसपाट झाली आहे, या बागेची पुन्हा बांधणी करण्यासाठी काय उपाययोजना करता येईल याविषयी डाळिंब रत्न डॉ. बी.टी. गोरे यांच्याशी यासंदर्भात चर्चा करून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. आंबा, कांदा उत्पादकांना देखील या वादळी पावसाचा मोठा फटका बसला आहे. चाळीत असलेला कांदा आणि त्यावर पडलेल्या झाडांमुळे कांदा पूर्णपणे भिजलेल्या कांद्याचे पंचनामे अधिकाऱ्यांनी करून अहवाल त्वरित पाठवण्याची सूचना त्यांनी केल्या आहेत.

# आश्वीत मोफत नेत्र व दंत तपासणी शिबीर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**झरेकाठी :** जैन साध्वी मोक्षदाजी महाराज यांचा दिक्षा दिना निमित्त आश्वीत मोफत नेत्र व दंन्त तपासणी शिबीर संपन्न झाले.

आश्वी येथील सामाजिक कार्यकर्ते सुशील भंडारी यांची उच्च पदवीधर कन्या प्रतिक्षा हिने ९ जुन २०२४ रोजी उपाध्या प्रवर परम पुज्य प्रवीण ऋषीजी महाराज, तीर्थश ऋषीजी महाराज जैन साध्वी सन्मतीजी महाराज, साध्वी सुनंदाजी महाराज यांच्या उपस्थितीत खडतर असे जैन साधुव्रताचा स्वीकार करत जैन साध्वी मोक्षदाजी



महाराज झाल्या त्यांच्या दीक्षा दिनाचे औचित्य साधून उडाण टिम आश्वी वशांतीनाथ सेवा संस्थान, संगमनेर यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्रतपासणी शिबीराचे आयोजन शनिवार दिनांक ७ जून २०२५ रोजी केले होते .या शिबिराचा १२० रुग्णांनी लाभ घेतला तर एक्सपर्ट डेंटल क्लिनिक व उडान टिम च्या संयुक्त विद्यमाने मोफत दंत तपासणी शिबीर रविवार दिनांक ८ जुन रोजी संपन्न झाले या शिबिरात डॉ. सागर गोपाळे आणि डॉ. राधिका चोपडा यांनी अत्याधुनिक अश्या एआय रोबोट मशीनचा साह्याने पन्नास रूगणांची तपासणी करुन उपचार केले. शिबीराचे उदघाटन भाऊराव कांगुणे,जैन श्रावक संघाचे अध्यक्ष सुम्मतीलाल गांधी यांनी केले. सोमवारी जैन धर्म स्थानक आश्वी व घोडनदी पुणे येथे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.शिबीर यशस्वी करण्यासाठी भुषण भंडारी, अथर्व रातडीया,रोशन रातडीया, प्रीत गांधी, कोमल बोरा, महीमा रातडीया, प्राप्ती मुनोत, प्रसन्ना रातडीया,अमिता भंडारी, सिया गांधी, दिया लुंकड, जिनेशा गांधी, सलोनी पटवा शेलोत, साक्षी पटवा, जान्हवी कोळपकर, भक्ती भंडारी, लब्धी गांधी, साक्षी पटवा, तिलक गांधी, अनिकेत पटवा,आनंद चोपडा,यश भंडारी, सनी भंडारी उडान टीम आश्वी ने प्रयत्न केले.

शालेय पोषण आहार कर्मचाऱ्यांचा...

# शालेय शिक्षण मंत्र्यांच्या घरावर थाळी नाद मोर्चा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव :** शालेय पोषण आहार कर्मचारी यांना हरियाणा राज्य सरकारच्या धर्तीवर ७००० रुपये वेतन मिळावे,५ जुलै २०२४ च्या मंत्रीमंडळ निर्णयाची अंमलबजावणी करावी या प्रमुख मागण्यांसह विविध मागण्यासाठी आज मालेगाव येथे शालेय पोषण आहार कर्मचारी यांनी थाळी नाद मोर्चा काढला होता. या मोर्चाचे आयोजन सम्यक फाऊंडेशन प्रणित श्रमिक मजदुर संघ शालेय पोषण आहार कर्मचारी संघटना,आधारवड महिला बहुउद्देशीय महिला संघटना व आयटक यांनी केले होते.सदर मोर्चाची सुरुवात



महात्मा फुले चौक मौसम पूल येथुन सुरू झाला.त्याचा शेवट शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या कार्यालयात झाला.

याप्रसंगी शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांना विविध मागण्यांचे निवेदन देऊन त्या तात्काळ सोडविण्याचे सांगितले.यावेळी श्रमिक मजदुर संघाच्या राज्य समन्वयक तथा अहिल्यानगर जिल्हा अध्यक्षा सौ सविता विधाते,राज्य समन्वयक सुभाष सोनवणे,राज्य समन्वयक कैलास पवार,राज्य समन्वयक उत्तम गायकवाड,आधारवड महिला बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्षा संगीता सोनवणे, आयटक अमरावती जिल्हा अध्यक्ष हिम्मत गवई यासह अनेक पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी अहिल्यानगर कोषाध्यक्ष कुमारी मेजबिन सय्यद,सुभाष सोनवणे, उत्तम गायकवाड, कैलास पवार,शिवकन्या गिरमकर, सविता विधाते, संगीता सोनवणे, हिम्मत गवई आदी मोर्चाला मार्गदर्शन केले. शासनाने तात्काळ आमच्या मागण्या मान्य करून आम्हाला न्याय द्यावा अन्यथा मंत्रालयावर पुन्हा मोर्चा काढू असेही सर्वांनी मनोगतात व्यक्त केले.याप्रसंगी कर्जत तालुका अध्यक्ष सुखदेव कांबळे, शेवगाव तालुका अध्यक्ष शिवकन्या गिरमकर, नेवासा तालुका अध्यक्ष कैलास पवार, कोपरगाव तालुका अध्यक्ष प्रकाश पानपाटील व अहिल्यानगर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर येथील कर्मचारी उपस्थित होते.

# शिर्डी ग्रामसभेत डरकाळ्या फोडणारे आता गप्प का ? सुनील गोंदकर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** फेब्रुवारी महिन्यात दुहेरी हत्याकांड झाले अन शिर्डीतील सर्व वातावरण ढवळून निघाले प्रत्येकाला असुरक्षिततेची जाणीव होताच द्वारकामाई समोरील खुल्या नाट्यगृहासमोर जंगी ग्रामसभा झाली अनेक जणांनी माईक हातात घेऊन भाषण ठोकले .आता यापुढे ग्रामस्थ गुंडगीरी संपवणार, पोलीसांनी कारवाई न केल्यास पोलीस ठाण्याला कुलूप ठोकू असा सज्जड इशारा दिला परंतू दोन महिने उलटत नाही तोच काल पुन्हा एक खुन झाला पुन्हा जैसे थे परिस्थिती निर्माण झाली असताना ग्रामसभेत भाषण ठोकणारे कुठे गेले असा संतप्त सवाल शिर्डी येथील सामाजिक कार्यकर्ते सुनिल नाना गोंदकर यांनी व्यक्त केला आहे .

श्री गोंदकर पुढे म्हणाले की, दिडशे रुपयावरून एका जणाचा खुन होतो म्हणजेच शिर्डीत रात्रीचे गर्दुल्ले पुन्हा वाढले आहे दिवसभर नशा करायची रात्र झाली शिर्डी झोपली की बाहेर पडून नशेत तर्रर होवून समोर जो कोणी येईल त्याला लुटायचे प्रसंगी मारून टाकायचे असे प्रकार घडत आहेत . कालचा खुन झाला म्हणून ते पोलीसांना उघड झाले परंतू असे अनेक प्रकार रोज घडतात ते पोलीसांपर्यंत जात नाही . शिर्डी ही आपली जबाबदारी आहे याला पहिलं प्राधाण्य शिर्डी ग्रामस्थांना द्यावे लागेल . आज शिर्डी मध्ये पुन्हा एकदा गुन्हेगारी, वेश्याव्यवसाय,दारु विक्री, मटका अड्डा, जुगार, भांग विक्री, गांजा विक्री,नशा जास्त प्रमाणात होण्यासाठी पांढरे पावडर, अप्रवासी वाहतूक, साई भक्तांची लूट करणारे, युपी, बिहार ,दिल्ली, हैदराबाद, बेंगलोर, कर्नाटक परराज्यातून आलेले लोंढे, वाढते सत्रम, धंदे कमी रेस्टॉरंटची संख्या सर्वात जास्त बेढप वाढती शिर्डी आणि याच पद्धतीने ग्रामस्थांचं महत्त्व आपल्या डोळ्यासमोर कमी होतानी दिसत आहे मागील काळात जेष्ठ नागरिकांनी काय पेरलं हे आज महत्त्वाचा नसून त्यांनी संघटित व एकत्रित राहून लढा द्यावा हे शिकवले आहे. शिर्डी नगर परिषद ची निवडणूक समोर आहे. निवडूका येतील जातील पण गावाचं गावपण गेलं तर ते कधीच येणार नाही. दीडशे रुपयासाठी खंडोबा मंदिरापाशी एखाद्याचा खून होत असेल तर मागील झालेल्या खुनामधून आणि निषेध सभेमधून शिर्डी ग्रामस्थांनी काय प्राप्त केलं? पुन्हा जसे थे परिस्थिती झाल्या सारखी वाटत आहे . जे निषेध सभेमध्ये सिंहासारखे गर्जना करत होते ते आता कुठल्या बिळामध्ये जाऊन बसले समजायला मार्ग नाही. त्या ग्रामसभेत जी काही भाषणे झाली त्या प्रत्येकाची व्हिडिओ शूटिंग झाली ती अजूनही तशीच आहे. श्री साईबाबा संस्थान त्यांच्या चौकटीत काम करते त्यांना गावाशी काही देणेघेणे नाही किंवा शिर्डी नगर परिषद किंवा शिर्डी पोलीस स्टेशन जेवढ्या पण शासकीय यंत्रणा आहे त्या हातचे राखून काम करतात कुणीही मनावर घ्यायला तयार नाही . असे भरपूर उदाहरणं आहेत जे पुराव्या सह देता येईल . ग्रामसभेमध्ये ज्या सिंहगर्जना करण्यात आल्या त्यातली एक गोष्ट सुद्धा शिर्डी ग्रामस्थांच्या पथ्यावर पडली नाही . त्यामुळे शिर्डी ग्रामस्थांचं महत्त्व कमी होत आहे. येथील ग्रामस्थ वेळेत सावध नाही झाले तर येणारे भविष्य अंधारमय होईल . जुन्या जाणत्या नागरीकांनी शिर्डी ची घडी मजबूत ठेवली आताची पिढी जो तो स्वतः चे हित साधतात. एकमेकाचे हेवेदावे हे सर्व प्रगतीला आडवे येत आहे . शिर्डीचा पैसा हा संगमनेरचे मालपाणी वाले, आंध्रा वाले, सत्रम वाले, बेंगलोर वाले, हैदराबाद, कर्नाटका, युपी, बिहार, उत्तर प्रदेश, दिल्ली, राजस्थान या लोकांकडे जात आहे . आणि तेच लोक त्यांच्या लोकांना घेऊन प्रगतीपथावर आहेत आणि आपले लोक आपल्याच लोकांना व्यवसाय न देता अजून तो भिकारी कसा राहील हा दृष्टिकोन असल्यामुळे स्थानिक लोकांना अडथळे ठरत आहे .

# नगदवाडीत आजपासून दशावतार आखाडी सोहळ्याला सुरुवात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव :** तालुक्यातील सोनेवाडी येथील नगदवाडी ग्रामस्थांच्या वतीने पुरातन चालत आलेली परंपरा जपण्याचे काम सुरू ठेवले आहे.

आज मंगळवार दिनांक १० जून रोजी रात्री आठ वाजता दशावतार आखाडी सोहळ्याला सुरुवात होणार आहे.बाजूचे बाजू कदम से कदम, श्री गणेश महाराज की स्वारी आ रही है, निगा रखो महाराज. असे म्हणत सूत्रधार दशावताराच्या या खेळाला सुरुवात करणार आहे. मंगळवारी गणेशाची वंदना करत आखाडीचा शुभारंभ होणार आहे. समस्त ग्रामस्थ व नागदवाडी आखाडी कमिटीच्या वतीने सात दिवस चालणाऱ्या या सोहळ्याचे नियोजन केले आहे. या आखाडी सोहळ्यात पाचव्या दिवशी निघणारा रावण व समाप्तीला नरसिंह या सोंगाचे महत्व आहे.

या आघाडी सोहळ्याची सांगता मंगळवार दिनांक १७ जून रोजी होणार आहे. दररोज रात्री तमाशा व आखाडी सोंग नाचायचे काम सुरू राहणार आहे. आखाडी मध्ये सामील होण्यासाठी ज्यांना सोंग घ्यायचे असेल त्यांनी कमिटीशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे. सोनेवाडी पंचक्रोशीतील भाविकांनी या आखाडी सोहळ्यामध्ये सहभागी व्हावे असे आवाहन आखाडी उत्सव कमिटी नगदवाडी च्या वतीने करण्यात आले आहे.

# गौतम पॉलिटेक्निकच्या मेकॅनिकलचे ३० विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी

**कोळपेवाडी :** कर्मवीर शंकरराव काळे एज्यूकेशन सोसायटीच्या कोळपेवाडी येथील गौतम पॉलिटेक्निक इंस्टीट्युटच्या तृतीय वर्ष मेकॅनिकल विभागातील ३० विद्यार्थ्यांची विविध नामांकित कंपन्यांमध्ये नोकरीसाठी निवड झाली असल्याची माहिती गौतम पॉलिटेकनिक इंस्टीट्युटचे प्राचार्य प्रा.सुभाष भारती व प्लेसमेंट अधिकारी प्रा.कैलास भोसले यांनी दिली आहे. यामध्ये बजाज ऑटो लिमिटेड या कंपनीत ०३, टाटा मोटर्स १०, भारत गेअर ०८, अभिराज मॅन पावर ०१ व कायनेटिक इंजीनीरिंग मध्ये ०८ अशा एकूण ३० विद्यार्थ्यांना निकालापूर्वीच नोकऱ्या मिळाल्यामुळे विद्यार्थी व त्यांच्या पालकांनी समाधान व्यक्त केले आहे.



दरवर्षी महाविद्यालयातील तृतीय वर्षातील सर्वच विद्यार्थ्यांना निकालापूर्वीच नामांकित कंपन्या नोकरीत सामावून घेत आहे.महाविद्यालयाचा निसर्गरम्य परिसर, विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्यासाठी परिश्रम घेणारे प्राचार्य, सहकारी प्राध्यापक, सर्व सोयीयुक्त वर्कशॉप विभाग, प्रयोगशाळा विभाग अशा सर्व सुविधांमुळे महाविद्यालयाचा नावलौकिक वाढत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांचे गौतम पॉलिटेकनिक इंस्टीट्युटच्या माध्यमातून अभियंता होण्याचे स्वप्न साकार होत आहे.अभियांत्रिकी पदवी हातात पडत नाही तोच महाविद्यालयाच्या प्रयत्नातून या विद्यार्थ्यांचे नोकरीचे देखील स्वप्न पूर्ण होत आहे. त्यामुळे गौतम पॉलिटेक्निक इंस्टीट्युट मध्ये प्रवेश घेवून उत्तीर्ण झालेले अनेक विद्यार्थी शासकीय नोकरीत तसेच बहुसंख्य नामांकित कंपन्यांमध्ये उच्चपदी मोठ्या पगारावर कार्यरत आहे.

निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे कर्मवीर शंकरराव काळे एज्यूकेशन सोसायटीचे चेअरमन मा.आ. अशोकराव काळे, विश्वस्त आ.आशुतोष काळे व्हा. चेअरमन छबुराव आव्हाड, मानद सचिव सौ.चैतालीताई काळे, संस्थेचे सर्व गव्हर्निंग कौन्सिल सदस्य, प्रशासकीय अधिकारी प्रा.नारायण बारे, प्राचार्य प्रा.सुभाष भारती, कार्यालयीन अधीक्षक आण्णासाहेब बढे यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# माऊली आश्रमातील त्रिदिनी सोहळ्याची सांगता

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** तालुक्यातील पिचडगाव येथील माऊली आश्रमात बांधण्यात आलेल्या मंदिरातील विठ्ठल रुख्मिणी व संत ज्ञानेश्वर महाराज मूर्ती प्राणप्रतिष्ठा निमित्ताने हभप ज्ञानेश्वर महाराज हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित त्रिदिनी सोहळयाची सांगता वेदांताचार्य हभप भगवान महाराज यांच्या किर्तनाने व संतपूजनाने करण्यात आली. संत ज्ञानेश्वर माऊलींनी विश्वालाच घर मानले असल्याने चराचरात वास्तव्य असलेल्या संत ज्ञानेश्वर माऊलींचे अंतःकरण हे विश्वव्यापक असल्याचे प्रतिपादन भगवान महाराज जंगले शास्त्री यांनी यावेळी झालेल्या किर्तन सोहळयात बोलतांना केले.

यावेळी झालेल्या किर्तन सोहळयाच्या प्रसंगी बोलतांना वेदांताचार्य हरि भक्त परायण भगवान महाराज जंगले शास्त्री म्हणाले की हभप ज्ञानेश्वर महाराज हजारे यांनी या पिचडगाव शिवारातील माळरानावर माऊली आश्रमाची स्थापना केल्याने पंचक्रोशीतील भाविकांचे हे क्षेत्र श्रध्दास्थान बनले आहे,अनेकांनी परमार्थाची वाट धरली असून ते भक्तिमार्गाला लागले आहेत. आज नव्याने बांधण्यात आलेल्या मंदिरामध्ये विठ्ठल रुख्मिणीसह संत ज्ञानेश्वर माऊली मूर्तीच्या रूपाने येथे वास्तव्यास आलेले आहे त्यामुळे निश्चितच माऊली आश्रमाला उज्वल भविष्यकाळ राहील पारमार्थिक सुखाचा आनंद भाविक घेतील असा शुभाशीर्वाद यावेळी बोलतांना दिला.

स्त्री आणि पुरुषांना आपण माऊली म्हणूनच उच्चारण करतो यातून त्यांनी स्त्री व पुरुष भेदभाव न

## संत ज्ञानेश्वर माऊलींचे अंत:करण हे विश्वव्यापक : भगवान महाराज



**नेवासा** तालुक्यातील पिचडगाव येथील माऊली आश्रमातील मूर्ती प्राणप्रतिष्ठा निमित्ताने आयोजित त्रिदिनी सोहळयाच्या सांगता प्रसंगी बोलतांना वेदांताचार्य हभप भगवान महाराज जंगले शास्त्री समवेत उपस्थित भाविक-( छाया-सुधीर चव्हाण)

मानता समानतेचा संदेश दिला आहे म्हणूनच हे विश्व देखील माऊलीमय झाले आहे,आज माऊली आश्रमातील माऊली हे प्राणप्रतिष्ठाच्या निमित्ताने अधिष्ठानावर विराजमान झाले असल्याचे सांगत मायबाप असलेल्या संतांनी दिलेल्या उपदेशाचे पालन करा,संतांच्या संगतीत राहून परमार्थ करून मनुष्य जीवाचा उद्धार करा असे आवाहन भगवान महाराज जंगले शास्त्री यांनी यावेळी बोलतांना केले.यावेळी आमसरी येथील अंबऋषि संस्थानचे महंत श्री कृष्णागिरी महाराज,संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे विश्वस्त वेदांताचार्य हभप देविदासजी महाराज म्हस्के व श्रीराम साधना आश्रमाचे महंत स्वामी सुनीलगिरी महाराज, त्रिवेणीश्वर देवस्थानचे महंत स्वामी रमेशानंदगिरी महाराज,जगदंबा खडेश्वरी देवस्थानचे महंत गणेशानंदगिरी महाराज,संत तुकाराम महाराज देवस्थानचे विश्वस्त हभप अंकुश महाराज जगताप,शिनाई देवस्थानचे उत्तराधिकारी बालब्रम्हचारी आवेराज महाराज यांनी प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या निमित्ताने आशीर्वादरुपी शुभेच्छा दिल्या.

यावेळी संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे अध्यक्ष पांडुरंग अभंग,सीताराम महाराज पठाडे,रामनाथ महाराज पवार, चांगदेव महाराज काळे,विजय महाराज पवार, संतसेवक लक्ष्मीनारायण महाराज जोंधळे,आळंदी येथील मृदुंगाचार्य समाधान महाराज कन्हेरकर, किरण महाराज डीवरे, सरपंच पोपटराव हजारे, भगवानराव शेजूळ, अशोक निपुंगे, दत्तात्रय कोळेकर, मेजर बर्डे पाटील,रामकृष्ण कांगुणे,पोलीस पाटील अनिल लहारे, पिचडगाव येथील तरुण मंडळाचे सेवेकरी,वारकरी संप्रदायातील संत मंडळीसह माऊली आश्रम भक्त परिवारातील सदस्य, पिचडगाव येथील विविध संस्थेचे पदाधिकारी ग्रामस्थ भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पान १ वरुन

## शिवप्रेमींच्या उत्साहात न्हाऊन निघाला रायगड

सायंकाळी शिरकाई देवी पूजन, गडपूजन व गोंधळाने कार्यक्रमाला सुरुवात झाली. सोमवारी सकाळी नगारखान्याजवळ ध्वजारोहण करण्यात आले. ढोल-ताशाच्या गजरात वाजत गाजत शिवप्रतिमेची पालखी राज सदरेवर आणण्यात आली. राजपुरोहितांच्या मंत्रोच्चारामध्ये व वेद घोषामध्ये मुख्य सोहळ्याला सुरुवात झाली. श्री पंचाक्षर माहेश्वर (जंगम) पौरोहित्य मंडळ यांच्याकडून विधिवत पूजन पार पडले. मंत्री भरत गोगावले आणि त्यांच्या पत्नी सुषमा गोगावले यांच्या हस्ते पूजनाचा कार्यक्रम पार पडला. दीप प्रज्ज्वलन, जगदीश्वराचे स्मरण, शंख पूजन, शंखनाद, अथर्वशीर्ष पठण, महासंकल्प, धर्मरक्षण शपथ असे धार्मिक विधीही पार पडले.

रायगड किल्ल्यावरील अल्हाददायक व शिवमय वातावरणात पार पडलेल्या या सोहळ्याला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उद्योगमंत्री उदय सामंत, स्वागत अध्यक्ष रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले, गृहराज्यमंत्री योगेश कदम, आमदार मंगेश चव्हाण, आमदार महेंद्र थोरवे, आमदार रूपेश म्हात्रे, खासदार श्रीरंग बारणे, समितीचे अध्यक्ष सुनील पवार, कोकण कडाचे अध्यक्ष सुरेश पवार, जिल्हाधिकारी किशन जावळे, पोलिस अधीक्षक आचल दलाल, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्यासह असंख्य शिवप्रेमी उपस्थित होते.

## दोन भरधाव रेल्वेचे प्रवासी एकमेकांवर आदळले; चौघे मृत्युमुखी; ९ जखमी

सहाव्या लाईनपर्यंत अपग्रेड करणार आहोत. कार्यालयांना देखील विनंती केली होती की कार्यालयातील वेळेमध्ये केले तर चांगलं होईल. लोकांचा देखील सहयोग गरजेचा आहे, उपाययोजना आपण करत आहोत. पश्चिम आणि मध्यमध्ये अनेक गोष्टी वेगळ्या आहेत. मध्य रेल्वेची फ्रिक्वेन्सी अधिक आहेत, ब्रिज आणि टनेल अधिक आहेत.

रेल्वे अपघातातील जखमी : १) श्री. शिवा गवळी (पुरुष २३ वर्ष/यांची प्रकृती चिंताजनक असल्याने छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय येथून ज्युपिटर हॉस्पिटल येथे पाठविण्यात आले आहे.)

२) आदेश भोईर (पु/२६ वर्ष, राहणार: आढगाव, कसारा, यांची प्रकृती स्थिर आहे व त्यांच्यावर शिवाजी महाराज रुग्णालय येथे उपचार सुरू आहेत.) ३) रिहान शेख (पु/२६ वर्ष, राहणार: भिवंडी, प्रवास: कल्याण ते ठाणे, यांची प्रकृती स्थिर आहे व त्यांच्यावर शिवाजी महाराज रुग्णालय येथे उपचार सुरू आहेत) ४) अनिल मोरे (पुरुष ४० वर्ष, यांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना उपचारासाठी ज्युपिटर हॉस्पिटल येथे पाठविण्यात आले आहे.) ५) तुषार भगत (पु/२२ वर्ष, प्रवास: टिटवाळा ते ठाणे, यांची प्रकृती स्थिर आहे व त्यांच्यावर शिवाजी महाराज रुग्णालय येथे उपचार सुरू आहेत.) ६) मनीष सरोज (पु/२६ वर्ष, पत्ता: दिवा साबेगाव, दिवा यांची प्रकृती स्थिर आहे व त्यांच्यावर शिवाजी महाराज रुग्णालय येथे उपचार सुरू आहेत) ७) मच्छिंद्र गोतारणे (पु/३९ वर्ष, राहणार: वाशिंद, यांची प्रकृती स्थिर आहे व त्यांच्यावर शिवाजी महाराज रुग्णालय येथे उपचार सुरू आहेत) ८) स्नेहा धोंडे (स्त्री/२१वर्ष, राहणार: टिटवाळा, प्रवास: टिटवाळा ते ठाणे यांची प्रकृती स्थिर आहे व त्यांच्यावर शिवाजी महाराज रुग्णालय येथे उपचार सुरू आहेत) ९) प्रियंका भाटिया (स्त्री/२६ वर्ष, राहणार: शहाड, कल्याण यांची प्रकृती स्थिर आहे व त्यांच्यावर शिवाजी महाराज रुग्णालय येथे उपचार सुरू आहेत) **अपघातानंतर मध्य रेल्वेचे महत्त्वाचे निर्णय :** १. नवीन गाड्यांमध्ये ऑटोमेटिक डोअर क्लोजर असेल. २. सध्याच्या लोकल ट्रेन्सनाही ऑटोमेटिक डोअर लावण्यासंदर्भात विचार केला जाईल. ३. कल्याण कसारापर्यंत तिसरी आणि चौथी लाईन तर कुर्लापर्यंत पाचवी आणि सहावी लाईन नियोजित ४. ठाणे ते सीएसएमटी सहाव्या लाईनपर्यंत अपग्रेड करणार ५. सरकारी आणि खासगी कार्यालयांनी एकच ऑफिस टाईम न ठेवता वेगवेगळे इन-आऊट टाईम ठेवावे.

## पीओपी गणेश मूर्तीवरील बंदी उठवली

जलस्रोतांऐवजी कृत्रिम तलावांमध्येच करण्याची अट कायम राहणार आहे.या मूर्तींचे विसर्जन हे नैसर्गिक जलस्रोतांऐवजी कृत्रिम तलावांमध्येच करण्याची अट कायम राहणार आहे. या निर्णयावर न्यायालयात दोन्ही बाजूंनी सहमती दर्शवली आहे.

## दोन भरधाव रेल्वेचे प्रवासी एकमेकांवर आदळले; चौघे मृत्युमुखी; ९ जखमी

करण्यात आले या अपघात घटनेची माहिती मिळताच नेवासा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक धनंजय जाधव हे स्वतः पहाटे पोलीस फौजफाटयासह घटनास्थळी दाखल झाले. जखमींना रुग्णवाहिकेद्वारे नेवासा फाटा येथे खाजगी इस्पितळात उपचारसाठी नेण्यासाठी पोलीस निरीक्षक धनंजय जाधव यांनी पोलिसांमार्फत मोलाची भूमिका बजावली. उस्थळ दुमाला ता.नेवासा गावाचे शिवारातील अहिल्यानगर ते छत्रपती संभाजीनगर हायवे रोडने घरी बोदवड जिल्हा जालना येथे जात असताना आमचे क्रुझर चार चाकी वाहन क्र. एम.एच.२० डी जे ४८३४ वरील चालक अविनाश उर्फ रोशन गोकुलसींग निकम रा. खामखेड ता. मलकापुर जिल्हा बुलढाणा याने त्याचे ताब्यातील नमुद वाहन हयगयीने अविचाराने रस्त्याचे परीस्थीतींकडे दुर्लक्ष करून चालवुन हायवे रोडवर समोर ट्रॅफिक मध्ये उभा असलेला ट्रक क्रं.एम एच ११ ए एल ५२१७ च्या चालकाच्या बाजुस क्लुझरने पाठीमागुन जोराची धडक देवुन ट्रक चालक बाजुने पुढे घासत जावुन हा रस्ता अपघात घडला असल्याचे पोलिसांनी सांगितले.

## सर्व शासकीय कार्यालये सौर ऊर्जेवर

असलेल्या ग्राहकांचा वीजबिलाचा खर्च शून्यावर आणण्याचा सरकारचा प्रयत्न असून त्यासाठी आधी शंभर युनिट आणि नंतरच्या टप्प्यात तीनशे युनिटपर्यंत वीजवापर असलेल्या ग्राहकांना सौर ऊर्जेवर आणले जाईल,' असे फडणवीस यांनी सांगितले.

कार्यक्रमापूर्वी फडणवीस यांनी अपारंपरिक ऊर्जेसंदर्भातील प्रदर्शनाला भेट दिली. यावेळी महाऊर्जाच्या प्रगती अहवालाचे प्रकाशन करण्यात आले.

# १६ वर्षांचा चमत्कार : पुण्याच्या अलोकची आंतरराष्ट्रीय झेप

**गौरव डेंगळे । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** सेंट्रल एशियन व्हॉलिबॉल चॅम्पियनशिप २०२५ (उजबेगिस्तान) या स्पर्धेसाठी १९ वर्षांखालील भारतीय पुरुष व्हॉलिबॉल संघात पुण्याचा अलोक मनोज तोडकर याची निवड झाली आहे. केवळ १६ वर्षांचा असलेला अलोक पुरुष गटात लिब्रो म्हणून निवड होणारा महाराष्ट्रातील पहिला खेळाडू ठरला आहे, ही बाब महाराष्ट्रासाठी आणि पुण्यासाठी अत्यंत गौरवाची आहे.

अलोकने यापूर्वी दोन वेळा भारतीय संघाच्या संभाव्य खेळाडूंच्या यादीत स्थान मिळवले होते,मात्र अंतिम संघात निवड होणे हुकले होते.परंतु त्या अपयशाला न जुमानता त्याने सातत्यपूर्ण मेहनत,जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर या वर्षी वरिष्ठ राष्ट्रीय व्हॉलिबॉल स्पर्धेत महाराष्ट्र संघात प्रभावी कामगिरी करत भारतीय संघात स्थान मिळवले आहे.

अलोक वयाच्या चौथ्या वर्षापासून पैलवान अमोल बुचडे स्पोर्ट्स फाउंडेशन येथे नियमित सराव करत आहे.लहानपणापासून त्याने या क्लबच्या वरिष्ठ खेळाडूंना भारतीय संघाच्या सराव शिबिरात स्थान मिळवताना पाहिले आणि त्याच प्रेरणेतून तोही भारतीय संघात स्थान मिळवण्याचा



निर्धार करत सरावात गुंतला.

या यशामागे फाउंडेशनचे प्रशिक्षक डॉ. संतोष पवार, रोहित मालेगावकर,संदीप भोसले,तसेच संस्थेचे आधारस्तंभ मा.अप्पासाहेब रेणुसे व अमोल बुचडे यांचे मार्गदर्शन आणि प्रोत्साहन मोलाचे ठरले.अलोकच्या घडणीत प्रीतम जाधव,योगेश कुत्रेह, सुयश पवार,गौरव ब्रम्हे, आदित्य कुडपणे,केशव गायकवाड या वरिष्ठ खेळाडूंचाही मोलाचा वाटा आहे.

अलोकच्या या अभूतपूर्व निवडीबद्दल त्याला शुभेच्छा देण्यासाठी स्कूल गेम्स फेडरेशन ऑफ इंडियाचे सीईओ मा. पार्थ दोशी,प्राचार्य डॉ. स्वप्नील विधाते, श्री. शिवाजी कोळी, उपाध्यक्ष भास्कर बुचडे,रेल्वे संघाचे प्रशिक्षक अमेय कुलकर्णी,राष्ट्रीय प्रशिक्षक कुलदीप कोंडे,शिवाजी जाधव आदी मान्यवरांनी विशेष अभिनंदन केले.

## मित्र असावा तर माजी मंत्री प्राजक्त दादांसारखा



(छाया : राजेंद्र परदेशी)

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** आमदार व मित्र असावा तर प्राजक्त दादांसारखा असावा, असा एक भावनिक सूर राहुरी तालुक्यातील गोटूंबे आखाडा येथील सर्व सामान्य नागरिकांमधून उमटला. आपला मित्र त्याच्या मुलाच्या वाढदिवसाला येऊ शकत नाही. हे समजल्यावर माजी मंत्री प्राजक्त तनपूरे हे स्वतः केक घेऊन मित्राच्या घरी गेले. आणि मित्राच्या मुलाचा वाढदिवस उत्साहात साजरा केला.

माजी मंत्री प्राजक्त तनपूरे हे धर्म जात, गरीब श्रीमंत यात कोणताही भेदभाव मानत नसून फक्त विकास कामांना महत्त्व देणारे कुशल नेते म्हणून सर्व परिचित आहे. प्राजक्त तनपूरे यांचे प्राथमिक शिक्षण राहुरी शहरातील प्रगती विद्यालय येथे झाले. त्यावेळी त्यांचे राहुरी शहर व तालुक्यातील अनेक जण वर्गमित्र होते. प्राजक्त तनपूरे यांनी धर्म जात, श्रीमंत गरीब असा कोणताही भेदभाव न करता आजपर्यंत आपल्या शालेय मित्रां बरोबरची मैत्री जपली. दरम्यान गेट टूगेदर च्या माध्यमातून प्राजक्त तनपूरे यांनी शालेय मित्रांना एकत्र आणले. त्यापैकी तालुक्यातील गोटूंबे आखाडा येथील संजय बनसोडे हे माजी मंत्री प्राजक्त तनपूरे यांचे वर्गमित्र आहेत. संजय बनसोडे यांची विद्यापीठात चालक पदावर नेमणूक असून सध्या ते सोलापूर येथे नोकरी करत आहे. त्यांचा मुलगा पवन बनसोडे याचा दि. ६ जून २०२५ रोजी वाढदिवस होता. आपला मित्र संजय बनसोडे हे त्यांच्या मुलाच्या वाढदिवसाला येऊ शकत नाही.

हे समजल्यावर माजी मंत्री प्राजक्त तनपूरे हे शाल, पुष्पगुच्छ व केक घेऊन थेट आपल्या मित्राच्या घरी गोटूंबे आखाडा येथे गेले. तेव्हा प्राजक्त तनपूरे यांनी मित्रांचा मुलगा ..... बनसोडे याचा वाढदिवस मोठ्या उत्साहात सजरा केला. आणि त्याला शुभेच्छा दिल्या.

प्राजक्त तनपूरे यांनी आमदारकीचे पाच वर्षे व मंत्री पदाच्या अडिच वर्षाच्या कार्यकाळात आपल्या मतदार संघात व राज्यात विकास कामांचा डोंगर उभा केला. आणि आमदार कसा असला पाहीजे हे दाखवून दिले.

त्याचबरोबर एका मागासवर्गीय मित्राच्या मुलाचा वाढदिवस साजरा करुन मित्र कसा असावा, हे देखील दाखवून दिले. संजय बनसोडे व त्यांच्या कुटुंबाने भावनावश होऊन माजी मंत्री प्राजक्त तनपूरे यांचे आभार व्यक्त केले.

## बेपत्ता कपल प्रकरणात खुलासा; खुनी दुल्हन अटकेत

**मुंबई :** शिलाँगमध्ये बेपत्ता झालेल्या कपल प्रकरणात अत्यंत धक्कादायक खुलासा करण्यात आला आहे. राजाचा मृतदेह सापडला पण सोनम बेपत्ता होती. मात्र आता सोनमला अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी तिला उत्तर प्रदेशातील गाझीपूर येथून पकडलं आहे. या घटनेने सर्वांनाच मोठा धक्का बसला आहे. गेल्या कित्येक दिवसापासून सोनमचा शोध घेतला जात होता.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सोनमचं आधीच दुसऱ्या तरुणाशी प्रेमसंबंध होते आणि त्यामुळे पती राजाला मारण्याचा कट रचण्यात आला. राजाला प्रेमाच्या जाळ्यात अडकवून शिलाँगला नेण्यात आलं, जिथे त्याची सुनियोजित पद्धतीने हत्या करण्यात आली. राजा रघुवंशी आणि सोनमचं ११ मे रोजी इंदूरमध्ये हिंदू रितीरिवाजानुसार लग्न झालं. कुटुंब आनंदी होतं. २० मे रोजी दोघेही शिलाँगला हनिमूनसाठी निघाले.

२२ मे रोजी हे जोडपे नोंगरियाट गावातील शिप्रा होमस्टे येथे राहिले. त्यांनी दुसऱ्या दिवशी सकाळी ६ वाजता चेक आउट केलं आणि तेव्हापासून दोघांचेही मोबाईल बंद होते. २४ मे रोजी मावलाखियाटपासून सुमारे २५ किमी अंतरावर असलेल्या ओसारा हिल्सच्या पार्किंगमध्ये स्कूटी बेवारस आढळली. त्यानंतर, राजा आणि सोनमचे सामान जंगलात सापडलं आणि २ जून रोजी राजाचा मृतदेह वेसावडोंग धबधब्याच्याजवळ एका खोल दरीत आढळला. त्याच्या हातावरील टॅटूवरून त्याची ओळख पटली.

### १७ दिवसांनी सोनमने केला फोन

९ जून रोजी पहाटे ३ ते ४ च्या दरम्यान सोनम गाझीपूरच्या नंदगंज भागातील एका ढाब्यावर पोहोचली. तिथून तिने ढाबा ऑपरेटरचा फोन घेतला आणि तिच्या भावाला व्हिडीओ कॉल केला आणि ती गाजीपूरमध्ये असल्याचं सांगितलं. भावाने ताबडतोब इंदूर पोलिसांना माहिती दिली, त्यांनी गाझीपूर पोलिसांशी संपर्क साधला. पोलीस घटनास्थळी पोहोचले आणि सोनमला वैद्यकीय तपासणीसाठी वन स्टॉप सेंटरमध्ये ठेवण्यात आलं. तपासात कोणतीही जखम किंवा मारहाणीच्या खुणा आढळल्या नाहीत.

### सोनमने राजाला संपवण्याचा रचला कट

सोनमचे एका तरुणाशी प्रेमसंबंध होते. लग्नानंतरही दोघेही संपर्कात होते. सोनमने राजाला संपवण्याचा कट रचला आणि तिच्या प्रियकरासह शिलाँगमध्ये त्याची हत्या केली. राजाच्या हत्येत एकूण चार जणांचा सहभाग होता. त्यापैकी तिघांना इंदूरमधून अटक करण्यात आली आहे, तर एक आरोपी उत्तर प्रदेशचा आहे जो सध्या फरार आहे. मेघालयचे डीजीपी एल. नोंगरांग यांनी पुष्टी केली आहे की इंदूर येथील रहिवासी राजा रघुवंशी यांच्या हत्येप्रकरणी त्याची पत्नी सोनमसह चार जणांना अटक करण्यात आली आहे. सोनमची चौकशी सुरू आहे.

## बांधकाम कामगारांना संसारोपयोगी व किटचे वाटप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** भारतीय जनता पार्टी नेवासा तालुक्याच्या वतीने आपल्या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारला अकरा वर्षे पूर्ण होत आहेत त्यानिमित्ताने श्रीक्षेत्र त्रिवेणीस्वर देवस्थान या ठिकाणी



भारतीय जनता पार्टी कार्यकर्त्यांचा मेळावा व बांधकाम कामगारांचा मेळावा आयोजित करून बांधकाम कामगारांना संसार उपयोगी व किटचे वाटप आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी महंत रमेशानंद गिरी महाराज, कामगार आयुक्त किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अंकुशराव काळे नेवासा तालुक्याचे भारतीय जनता पार्टीचे तालुका अध्यक्ष प्रतापराव चिंधे, मंडलाध्यक्ष संभाजीराव जगताप, जिल्हा उपाध्यक्ष माऊली पेचे, खंडागळे गुरुजी, गणेश लंघे, लक्ष्मणराव मोहिते,भाऊसाहेब वाघ, शंकरराव लोखंडे, सरपंच ललित मोटे, सचिन मोटे, बाळासाहेब भदगले, अशोकराव टेकने, बाळासाहेब शिरसागर,अंबादास उंद्रे, रविकांत शेळके, तुळशीदास शिंदे अनिल गायकवाड सचिन भांड, विवेक ननवरे, सागर पुंड, विजू पुंड, मोरे, विविध मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे आयोजन अमोल दिघे व त्यांचे सर्व सहकारी यांनी केले व सूत्रसंचालन बाळासाहेब पिसाळ यांनी केले यावेळी आमदार विठ्ठलराव लंगे पाटील यांनी फडणवीस सरकारच्या व शिंदे सरकारच्या विविध योजना बद्दल माहिती दिली तसेच येणाऱ्या काळामध्ये समाजातील कुठल्याही घटकाला सरकारी योजनेपासून वंचित राहू देणार नाही अशी ग्वाही दिली तसेच भारतीय जनता पार्टी तालुकाध्यक्ष प्रताप चिंधे यांनी मनोगत व्यक्त केले व मोदी सरकार व फडणवीस सरकार यांचे जाहीर आभार मानले.

## प्रवरा व गोदावरीची पुणतांबामार्गे भेट करावी : संदीप वहाडणे

**पुणतांबा :** सध्या गोदावरी खोऱ्यात निळवंडे धरणाचे पाणी पिंपळ वाडी मार्गे गोदावरी नदीपात्रात सोडून प्रवरा व गोदावरी नदीची भेट झाल्याचा आनंदोत्सव साजरा केला जातो हे वास्तव असले तरी प्रवरा व गोदावरी नदीची भेट पुणतांबा मार्गे झाली असती तर ह्या आनंद उत्सवात पुणतांबेकरांना सहभागी होण्याचे भाग्य मिळाले असते. असे प्रतिपादन मनसेचे शेतकरी सेनेचे राहाता तालुका अध्यक्ष संदीप वहाडणे यांनी केले आहे. निळवंडे धरणाचे पाणी धनगरवाडी पर्यंत आलेले आहे. तेथून दक्षिणेकडे अवघे सव्वा पाच किमीटर अंतरावर जळगाव हदीत गोदावरी उजवा कालवा आहे. निळवंडे धरणाचे ओव्हर फ्लो तसेच आर्वतनाच्या काळात गोदावरी उजव्या कालव्यात पाणी सोडले तर पुणतांबा परिसरातील सिंचनाचा प्रश्न मार्गी लागू शकतो विशेष म्हणजे १९८० पासून गोदावरी उजव्या कालव्याचे पाटपाणी सातत्याने पाणी झालेले आहे. पुणतांबा परिसरातील शेती व्यवसाय पूर्णपणे अडचणीत आलेला आहे गोदावरी नदीच्या काठावर असलेल्या पुणतांबा ग्रामस्थांना भर पावसाळ्यात पिण्याच्या पाणीटंचाईला सामोरे जावे लागते. प्रवरा खोरे व गोदावरी खोरे वेगळे असले तरी प्रवरा खोऱ्यातील पाणी गोदावरी खोऱ्यात पिंपळवाडी मार्गी नेतांना पुणतांबा मार्गेही न्यावे व येथील शेतकरी वर्गाला न्याय द्यावा असेही वहाडणे यांनी स्पष्ट केले आहे.

## जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांचे कुटुंबासह शनी दर्शन



**सोनई :** नाशिक येथील त्रिंबकेश्वर येथील कुंभ मेळाव्याच्या पार्श्वभूमीवर भाविकांना पायाभूत सुविधा करिता शिंगणापूर येथे पाहणी करून बैठक आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भुसारी यांनी श्री शेत्र शनिशिंगणापूर येथे व्यक्त केले. २२ महिने चालणाऱ्या कुंभ मेळाव्यासाठी येणाऱ्या भक्तांच्या सुविधासाठी शिर्डी शनिशिंगणापूर येथे भाविक येणार असल्याने त्यांना पुरविण्यात येणाऱ्या पायाभूत सुविधा त्यामध्ये पिण्याचे पाणी घनकचरा व्यवस्थापन पथदिवे देवस्थानला जोडणारी रस्ते साफसफाई या सेवा करिता बैठक घेणारा असून शासनाकडे प्रस्ताव पाठवला जाईल. मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी उदासी महाराज मठात तेल अभिषेक करून शनि देवाला तेल अर्पण केले आणि शनि देवा पुढे नतमस्तक होऊन आशीर्वाद घेतले. देवस्थानच्या वतीने भंडारी यांचे स्वागत राज्यपाल प्राप्त पुरस्कार करते एडवोकेट सयाराम बानकर यांनी पुष्पगुच्छ, शाल, शनीप्रसाद देऊन स्वागत केले. शनिशिंगणापूर ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी दादासाहेब बोरुडे यांनी ग्रामपंचायतचे वतीने स्वागत केले. यासंदर्भात ग्रामपंचायत आढावा घेऊन वसुली पथकर ,ग्रामपंचायत उत्पन्नाचा आढावा, याबाबत चर्चा देखील केली.


## नशिबाची परिक्षा

**मंगळवार दि. १० जून २०२५**

### मिलनम डे

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १२० ३४६ ४९० | ३-७ | १२४ १७९ ११५ | जोड ३१-९७-६२-०४-७५ |

### कल्याण

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| १४७ २४६ ६६० | २-४ | १५८ १४९ ११२ | जोड २६-०४-९१-५८-४३ |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १५० १६९ ११४ | ६-३ | १३९ ५८० ६७० | जोड ६०-२३-७१-४५-३९ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat |
|---|---|---|---|---|---|---|
| 31/03/2025 to 05/04/2025 | 128 12 336 | 460 04 356 | 880 66 367 | 178 61 560 | 169 62 138 | 235 02 679 |
| 07/04/2025 to 12/04/2025 | 180 91 588 | 247 31 119 | 789 44 239 | 277 63 670 | 345 23 238 | 469 93 689 |
| 14/04/2025 to 19/04/2025 | 257 40 389 | 270 96 268 | 169 62 570 | 169 62 570 | 489 15 168 | 359 76 240 |
| 21/04/2025 to 26/04/2025 | 247 35 500 | 469 91 335 | 149 44 248 | 299 08 459 | 490 34 789 | 257 46 268 |
| 05/05/2025 to 10/05/2025 | 135 98 116 | 470 04 112 | 136 03 158 | 123 62 138 | 158 47 269 | 257 45 258 |
| 12/05/2025 to 17/05/2025 | 233 82 336 | 569 00 389 | 278 74 590 | 288 83 157 | 389 08 468 | 690 57 160 |
| 19/05/2025 to 24/05/2025 | 900 99 360 | 470 04 112 | 123 62 138 | 257 41 155 | 135 98 116 | 789 44 239 |
| 26/05/2025 to 31/05/2025 | 148 30 145 | 259 61 128 | 470 16 457 | 125 81 678 | 790 65 690 | 247 38 170 |
| 02/06/2025 to 07/06/2025 | 229 34 455 | 899 62 138 | 778 21 470 | 244 02 336 | 255 23 247 | 110 24 248 |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *


## कहार कर्मचारी समाज ट्रस्टच्यावतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**नेवासा :** कहार कर्मचारी समाज सेवा ट्रस्टच्या वतीने सोमवार दि . ९ जून रोजी कहार समाजातील शिक्षण क्षेत्रातून उत्कृष्ट कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात नेवासा तालुक्यातील प्रवरासंगम येथे करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्ञानेश्वर लिंबोरे हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून जगदीश तुंबारे, विश्वंभर कुंठे , कडूभाऊ रासने, रमेश गंगुले व्यासपीठावर उपस्थित होते.

कहार कर्मचारी समाजसेवा ट्रस्टचे अध्यक्ष संतोष पंडुरे यांनी प्रास्ताविकात समाजातील गरीब हुशार विद्यार्थींनी शिक्षण घ्यावे म्हणून ट्रस्टच्या वतीने हा उपक्रम राबवला जात असल्याचे सांगितले. या सोहळ्यात शिक्षण क्षेत्रातून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला आणि त्यांना शैक्षणिक मदत म्हणून १५० विद्यार्थ्यांना आवश्यक साहित्य मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले.

यावेळी अध्यक्षीय भाषणात ज्ञानेश्वर लिंबोरे म्हणाले की, उच्च शैक्षणिक गुणांसह उज्वल कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रेरित करणे आणि त्यांना साधने पुरवून पुढील वाटचालीत सहकार्य करणे हाच या उपक्रमाचा मुख उद्देश होता , शिकण्यासाठी आणि प्रेरित होण्यासाठी एक उत्तम संदेश होता.

हा कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाला पूरक ठरेल व हे विद्यार्थी यश प्राप्त करून आपल्या कुटुंबा बरोबर समाजाचेही नाव मोठे करतील.या कार्यक्रमाने समाजातील आगामी पिढीच्या शिक्षणात सहभागी होण्यासाठी एक जागरूकता निर्माण झाली आहे. हा उपक्रम प्रेरणादायी आहे व भविष्यात देखील अशाच प्रकारचे उपक्रम आयोजित करण्याचे आवाहन त्यांनी व्यक्त केले.

कहार कर्मचारी समाजसेवा ट्रस्टच्या आयोजित कार्यक्रमास उपाध्यक्ष प्रांजली तुंबारे, संचालक सौ. स्मिता तुंबारे, गंगाधर रासने, अनिल बिरुटे, मोहिनीराज सरगैये, सौ. नंदीनी लिंबोरे, संदीप पांडव, सतीष गंगुले, आशीष गंगुले, दीपक बनगैय्या, डॉ. देवीलाल गरुटे, उमेश पंडुरे यांच्यासह विद्यार्थी, पालक व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन सौ. प्रांजली तुंबारे व सौ. स्मिता तुंबारे यांनी केले गंगाधर रासने यांनी आभार मानले.

द • ख • ल

## कॅबिनेटमध्ये शिक्षकांच्या आरोग्य योजनेचा मुद्दा घ्या : जिल्हाध्यक्ष शिंदे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर:** राज्यातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी कॅशलेस मेडिक्लेम योजना तातडीने लागू करावी, अशी मागणी स्वाभिमानी शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रसाद शिंदे यांनी पालकमंत्री



राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. शिंदे यांनी सांगितले की, गंभीर आजार झाल्यास शिक्षक वा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना उपचारासाठी आर्थिक चणचण भोगावी लागते. सध्या सरकारकडून खर्चाची भरपाई फाईल प्रक्रियेनंतर केली जाते. मात्र, ही प्रक्रिया वेळखाऊ असून, आकस्मिक प्रसंगी कुटुंबियांना उसनवारी करून उपचार खर्च उभा करावा लागतो. ''कॅशलेस मेडिक्लेम योजना शिक्षक वर्गासाठी अत्यावश्यक आहे. कॅबिनेटच्या येत्या बैठकीत हा मुद्दा मांडून शासन निर्णय निर्गमित करावा,'' अशी ठाम मागणी शिंदे यांनी केली. यावेळी माजी नगरसेवक धनंजय जाधव उपस्थित होते. या मागणीला उमेश भोईटे, अमोल क्षीरसागर, बाबासाहेब गवते, सुनील अंगारखे, तसेच सर्व तालुका अध्यक्ष, जिल्हा कार्यकारिणी सदस्य आणि महिला आघाडी प्रमुख यांचा पाठिंबा मिळत आहे. येत्या काळात योजना प्रत्यक्षात यावी यासाठी हे सर्वजण प्रयत्नशील राहणार असल्याची माहिती देण्यात आली.

## जळके खुर्द गावात जागतिक पर्यावरण दिन उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शहरटाकळी:** जळके खुर्द गावात जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सोनई कृषी महाविद्यालयातील कृषिदुतांनी जळके खुर्द गावात जागतिक पर्यावरण दिन निमित्त कृषिदुतांनी विविध प्रकारचे उपक्रम राबविले. वृक्षरोपण करून कार्यक्रम साजरा करण्यात आला. कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ .एच. जी .मोरे , उपप्राचार्य डॉ. एस व्ही बोरुडे, कार्यक्रम समन्वयक डॉ.अतुल दरंदले,कार्यक्रम अधिकारी डॉ. एस. बी चौघुले यांचे मार्गदर्शन लाभले.यावेळी कृषीदुत सोमनाथ कावले , तेज मेहेर, सार्थक नरोडे,आघाव शिवम, धीरज खंडारे कार्यरत होते.यावेळी कृषिदुत यशराज मचाले यांनी सर्वांचे आभार मानले.




## कोळगाव येथे कृषी कन्यांचे स्वागत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव:** श्रीगोंदा तालुक्यातील कोळगाव येथे साई कृपा कृषी महाविद्यालय, घारगाव (म. फु. कृ. वि., राहुरी संलग्नित) येथील कृषीकन्यांचे ग्रामीण कृषी जागरूकता व औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत आगमन झाले. या निमित्ताने गावात त्यांचे उत्साहपूर्ण स्वागत करण्यात आले. या उपक्रमांतर्गत कृषीकन्या बंडे मेघा, बनसोडे प्रज्ञा, इंपाळ अस्मिता, वीर कावेरी या विद्यार्थिनी पुढील तीन महिने खरीप हंगामात शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमाचा उद्देश शेतकऱ्यांना पीक व्यवस्थापन, हवामानाचे बदल, रोगकिड नियंत्रण तसेच उत्पादन वाढीसाठी उपाययोजना यावर मार्गदर्शन करणे आहे. तसेच शेतीतील नवतंत्रज्ञान थेट शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचविण्यासाठी विविध उपक्रम राबविले जाणार आहेत. या स्वागत प्रसंगी सरपंच पुरुषोत्तम लगड, उपसरपंच नंदू लगड, ग्रामपंचायत सदस्य, गावकरी, कृषीकन्या आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. एच. निंबाळकर, कार्यक्रम समन्वयक प्रा. जे. एस. राठोड आणि कार्यक्रम अधिकारी प्रा. एस. एस. फुंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वीरीत्या राबवण्यात येत आहे. शेतीच्या समृद्धीसाठी कृषीकन्यांचा हा उपक्रम निश्चितच उपयुक्त ठरेल, असे मत गावकऱ्यांनी व्यक्त केले.




# अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करणारा आरोपी ६ तासांत अटकेत

## शेवगाव पोलिसांची कामगिरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव :** अल्पवयीन मुलीस लग्नाचे आणि प्रेमाचे आमिष दाखवून फसवून पळवून नेऊन तिच्यावर वारंवार लैंगिक अत्याचार करणाऱ्या आरोपीला शेवगाव पोलिसांनी अवघ्या ६ तासांत अटक करून मोठे यश मिळवले आहे. या प्रकरणात आरोपी आकाश सोमनाथ गिरम (वय २५, रा. शहरटाकळी, ता. शेवगाव) याच्यावर पोस्को कायदा, भारतीय दंड संहिता आणि बालविवाह प्रतिबंधक कायद्यांतर्गत गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. दि. ४ जून २०२५ रोजी वडार गल्ली, शेवगाव येथील ३६ वर्षीय महिलेनं शेवगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली की, तिच्या अल्पवयीन मुलीस आरोपी आकाश गिरम याने प्रेमसंबंध व लग्नाचे आमिष दाखवून दि. १ जून रोजी पळवून नेले. आरोपीने पीडितेला तो काम करत असलेल्या भातकुडगाव येथील हॉटेल जगदंबामध्ये चार दिवस ठेवून लैंगिक अत्याचार केला. फिर्याद दाखल होणार असल्याची माहिती मिळाल्यावर आरोपीने दि. ४ जून रोजी दुपारी १ वाजता पीडितेला पोलीस स्टेशनच्या आवारात आणून सोडले. यावरून शेवगाव पोलिसांनी गु. र. नं. ५०३/२०२५ नोंदवून पुढील कारवाई सुरू केली.

पोलीस निरीक्षक समाधान नागरे यांच्या मार्गदर्शनाखाली धरमसिंग सुंदरडे यांच्या नेतृत्वात तपास पथक गठीत करण्यात आले. या पथकाने मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार अवघ्या ६ तासांत आरोपी आकाश गिरम याला शहरटाकळी येथून ताब्यात घेऊन अटक केली. तपासादरम्यान पीडितेने दिलेल्या जबाबात गेल्या दोन महिन्यांपासून वारंवार लैंगिक अत्याचार झाल्याचा आरोप केला. विशेष म्हणजे, पीडितेचे एक वर्षापूर्वी तिच्या पालकांनी जबरदस्तीने धुळे येथील एका मुलासोबत लग्न लावले होते. त्यामुळे या प्रकरणात पिडीतेचे आई-वडील, सासू-सासरे आणि पती यांना देखील




आरोपी करण्यात आले आहे. या गुन्ह्यात पोस्को कायदा कलम तसेच बालविवाह प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. पीडितेची वैद्यकीय तपासणी करण्यात आली असून, आरोपीस ५ जून रोजी जिल्हा व सत्र न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्यास १० जून २०२५ पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे व उपविभागीय अधिकारी सुनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. समाधान नागरे, स पो नि धरमसिंग सुंदरडे, पो.उ.नि. महाले, पा.का. अ. चव्हाण, पो.का. श्याम गुंजाळ, आठरे व कृष्णा मोरे यांच्या सहकार्याने पार पडली.

## आईच्या स्मरणात वृक्षारोपण जय हिंद'चा स्तुत्य उपक्रम

### आईचं झाड या नावाने राहणार कायमस्वरूपी ओळख



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मिरी :** पाथर्डी तालुक्यातील आदर्श गाव कोल्हार येथील दिवंगत सरपंच कौसाबाई पालवे यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या दशक्रिया विधी निमित्त जय हिंद फाउंडेशन अहिल्यानगरच्या माध्यमातुन कोल्हार येथे ''आईचे झाड''उपक्रम राबविण्यात आला. मातोश्री च्या नावाने आईचे झाड अर्थात वटवृक्ष लागवड करण्यात आली.यावेळी पालवे कुटुंबातील सदस्यांनी आईच्या स्मृती जपण्यासाठी वृक्षारोपण करण्याचा निर्णय घेतला. त्यामधे वटवृक्ष व पिंपळाचे रोपण करण्यात आले.याबाबत माहिती अशी की, दिवंगत कौसाबाई पालवे ह्या कोल्हार गावचे पंधरा वर्षे सरपंच होत्या.कोल्हार गावासाठी त्यांचे मोठे योगदान लाभलेले आहे त्यांच्या माध्यमातून अनेक विकास कामे गावामध्ये झालेली असून त्यांची परिसरामध्ये एक वेगळी ओळख होती.कोल्हार गावासाठी त्यांना आई म्हणून संबोधले जात होतं. गावातील गोरगरिबाच्या सुखा दुखामध्ये समाजकार्यामध्ये कायम उपस्थिती लावून मोठा हातभार त्यांच्या माध्यमातून लावला जात होता. त्यांचे पती स्वर्गीय नामदेव पालवे हे भारतीय सैन्य दलात नोकरीत होते त्यामुळे या परिवाराला देशभक्त परिवार असेही म्हटलं जातं आहे.

यावेळी उपसरपंच गोरक्षनाथ पालवे माजी सरपंच बाबाजी पालवे रमेश पालवे बाबाजी पालवे राजेंद्र पालवे मदन पालवे किरण पालवे जय हिंदचे शिवाजी पालवे,शिवाजी गर्जे,मुख्याध्यापक देविदास गिते, दिनकर पालवे,रोहीदास पालवे, सन्नी गर्जे,अमोल पालवे,उपस्थित होते. कौशल्य पालवे एक आदर्श माता होउन गेल्या त्यांना सहा मुले व एक मुलगी आणि २१ नातवंडे असा परिवार आहे या परिवाराला जरी आईची सावली हरवली असली तरी जय हिंद फाउंडेशनच्या ''आईचे झाड'' या उपक्रमामुळे भविष्यात वृक्ष या परिवाराला नक्कीच आईची आठवण व आईप्रमाणे सावली देईल असे फाउंडेशनचे शिवाजी पालवे म्हणाले यावेळी स्वर्गीय व कोसाबाई पालवे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आले जय हिंद च्या माध्यमातून लावण्यात आलेले आईचे झाड पालवे परिवार या वटवृक्षाचे संगोपन करणार आहे असे रमेश पालवे म्हणाले, मुख्याध्यापक देविदास गीते सर यांनी जय हिंद च्या वृक्ष चळवळीचे कौतुक केले जय हिंद फौंडेशन अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये विविध देवस्थाने,जिल्हा परिषद शाळा,ओपन स्पेस तसेच दशक्रिया विधी निमित्त शुभविवाह निमित्त वाढदिवसानिमित्त आठवण म्हणून वृक्षारोपणाचे महान कार्य करत आहे या वृक्ष क्रांती चळवळीमध्ये सर्वांनी सहभाग घेतला पाहिजे दुष्काळाची गंभीर समस्या भेडसावत असतात. कडक उन्हाळ्याची तीव्रता लक्षात घेऊन निसर्गाचा वारसा जतन करण्यासाठी वृक्षारोपणासारख्या ऊपक्रम करणे आवश्यक असल्याचे मत प्रा. देविदास गीते यांनी व्यक्त केले.

## वाचलेली माणसे साहित्यातून लिहिण्याचा प्रवास अचंबित करणारा : नारायण शर्मा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** – कंपनीत अभियंता म्हणून काम करत असताना दैनंदिन कामाच्या लिखाणाची माधव जोशी यांची सवय सर्वांनाच वेगळी वाटायची. यंत्रापासून सुरू झालेला जोशी यांचा हा प्रवास जगभरातील अनेक देश फिरताना आलेल्या अनुभवातून समृद्ध झाला. या प्रवासात कामाबरोबरच माणसे वाचतांना व ती साहित्यातून उतरविताना त्यांनी विविध टप्प्यावर विविध पुस्तकातून केलेले प्रयोग हे अचंबित करणारे असल्याचे उद्गार ज्येष्ठ नारायण शर्मा यांनी काढले. अहिल्यानगर जिल्हा वाचनालय व नवयुग चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने प्रसिद्ध लेखक माधव जोशी यांच्या ''माधव हा म्हणे.... या गणराज प्रकाशन ने काढलेल्या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्याप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.याप्रसंगी वाचनालयाचे अध्यक्ष प्रा शिरीष मोडक ,लेखक माधव जोशी ,आयोजक संजय पारनाईक, संचालिका प्रा ज्योती कुलकर्णी, राहुल तांबोळी,निवेदक प्रसाद बेडेकर, ग्रंथपाल अमोल इथापे उद्योजक राजीव गुजर, किशोर थत्ते, अशोक पानसरे ,प्रताप शेळके, अशोक चाबूकस्वार, सुशील पुरंदरेआदींसह असंख्य क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. नारायण शर्मा यांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण मनोगतात माधव जोशी यांची साहित्यि कला ही वेगवेगळ्या टप्प्यावर सातत्याने बहरत केली. त्यांच्या साहित्यात निरीक्षण शक्ती, कल्पनाशक्ती, ओजस्विता , अशा वेगवेगळ्या वैशिष्ट्यातून साकारत गेल्याचे जाणवते.




त्यांच्या वेगवेगळ्या साहित्य कृतीतून वैयक्तिक पात्रांमधून, विज्ञान ,स्वातंत्र्य ते जगभरातील संस्कृतीशी सांगड घातली गेली आहे. त्या साहितकृती देशात नव्हे तर परदेशातही वाचकांच्या हृदयाला भिडल्या.आज मित्र परिवारांच्या प्रेमातून पद्य स्वरूपात ''माधव हा म्हणे ....या पुस्तकातून अनोखा विषय वाचकांच्या समोर येत आहे. त्यांची ही कला अशीच बहरत राहो अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या. कार्यक्रमाच्या स्वागत प्रसंगी वाचनालयाचे अध्यक्ष प्रा शिरीष मोडक यांनी बोलताना माधव जोशी यांच्या पुस्तक प्रकाशनाची संधी दिल्या बद्दलआनंद व्यक्त करून भविष्यात वाचन संस्कृती वाढण्यासाठी हा सोहळा प्रेरक असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे निमंत्रक व समन्वय संजय पारनाईक यांनी प्रास्ताविकात माधव जोशी यांच्या हातून लिहिलेल्या रचना समाज माध्यमावर या काव्यपंक्ती अतिशय प्रभावी होत्या. त्यांचे संकलन पुस्तक रूपाने यावे व वाचकापर्यंत जावे असे आम्हा मित्र परिवाराची इच्छा होती. त्यामधून नवयुक्त ट्रस्ट व जिल्हा वाचनालय यांच्या समन्वयातून गणराज प्रकाशन चे प्राध्यापक गणेश भगत यांच्या सहकार्यातून हे पुस्तक साकारल्याचे मनस्वी आनंद होत असल्याचे सांगितले. पुस्तकाचे लेखक माधव जोशी यांनी बोलताना ''नगरमध्ये कंपनीमध्ये अभियंता म्हणून नोकरी करताना आपण काहीतरी लिहिले पाहिजे असे सतत वाटे. माझी आई आणि आजोबा हे महाराष्ट्रातील मोठे साहित्यिक होते. यांचेच गुण आणि प्रेरणा घेऊन मी नोकरीच्या शेवटच्या काही वर्षात लिहिलेला लिहिण्यास प्रारंभ केला. वेगवेगळी पात्र ,कल्पनाशक्ती ,भेटलेली माणसे जगभरात जोडले गेलेले मित्र व सांस्कृतिक नाते यामधून वेगवेगळ्या विषयावर नऊ पुस्तके लिहिण्याची मला प्रेरणा मिळाली. अचानकपणे साडेतीन चरणांच्या ओवी समान पद्य सूचले व त्याला तज्ञ साहित्यिक मित्रांनी दिलेल्या प्रोत्साहनामुळे आज हे पुस्तक स्वरूपात साकारत आहे. यासाठी चे सर्व श्रेय मित्र संजय पारनाईक व परिवाराला असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाच्या उत्तरार्धात माधव हा म्हणे... या पुस्तकाच्या पद्यकृतीवर आधारित निरुपणाचा अनोखा कार्यक्रम प्रसिद्ध निवेदक प्राध्यापक प्रसाद बेडेकर यांनी सादर केला.

## सॉलिसिटर गुलाबराव शेळके यांचे राज्यातील सहकार चळवळीसाठी मोठे योगदान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पिंपरी जलसेन:** जी एस महानगर बँकेचे संस्थापक अध्यक्ष सॉलिसिटर गुलाबराव शेळके यांचे राज्यातील सहकार चळवळीसाठी सर्वाधिक योगदान मिळाले असल्याचे प्रतिपादन सेवानिवृत्त प्राचार्य तथा राज्य मराठी पत्रकार संघाचे मार्गदर्शक रामचंद्र महाराज सुपेकर यांनी व्यक्त केले आहे.

पिंपरी जलसेन येथे शेळके यांच्या जयंतीनिमित्त सुपेकर सर, आपली माती आपली माणसं या सामाजिक संस्थेचे अध्यक्ष रुपेश ढवण, पारनेर तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष बाबाजी वाघमारे, कार्याध्यक्ष दत्ताजी उनवणे तसेच ,ढवण व त्यांच्या सहकाऱ्यांनी अभिवादन केले यावेळी ते बोलत होते.

माजी सरपंच कैलास घेमुड, भास्कर शेळके, रामदास शेळके, विजय पठारे , शैलेंद्र गायकवाड, गणेश पुणेकर, दिनेश शेळके तसेच ग्रामस्थ व विद्यालयातील विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुपेकर म्हणाले गेली पन्नास वर्षांपूर्वी सॉलिसिटर शेळके साहेब यांनी अहमदनगर बँक स्थापन करुन जिल्ह्यातील लोकांना मुंबई येथे व्यवसाय शिक्षण यासाठी मोठ्या प्रमाणात




आधार दिला मुंबई स्थायीक पारनेर तालुक्यातील जनतेला स्थीरस्थावर होण्यासाठी मोठ्या प्रमाणात पाठबळ दिले. गेली पन्नास वर्षांच्या कार्यकाळात शेळके साहेब, माजी अध्यक्ष ॲड. उदय शेळके यांनी जी एस महानगर बँकेचा नावलौकिक देशात होण्यासाठी मोठ्या प्रमाणात परिश्रम केले. जिल्हा सहकारी बँक व जी एस महानगर बँकेच्या संचालिका गीतांजली शेळके यांनी सॉलिसिटर गुलाबराव शेळके पॅनलच्या माध्यमातून ही निवडणूक मोठ्या मताधिक्याने जिंकून सभासदांचा विश्वास सार्थ ठरवीण्यासाठी कार्यक्षमपणे कारभार करीत आहेत .

ही जिल्ह्यातील जनतेसाठी अभिमानास्पद बाब असल्याने प्रतीपादन त्यांनी व्यक्त केले आहे. आपली माती आपली माणसं या सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रुपेश ढवण यावेळी म्हणाले आज राज्यात लाखो कुटुंबाना हक्काचा रोजगार देण्याचे काम जी एस महानगर बँकेच्या माध्यमातून झाले आहे. जिल्ह्याचा नावलौकिक देशात झाला आहे याचे श्रेय जी एस महानगर बँकेच्या माध्यमातून संस्थापक अध्यक्ष सॉलिसिटर गुलाबराव शेळके व माजी अध्यक्ष ॲड.उदयदादा शेळके यांना आहे. सॉलिसिटर शेळके साहेब व उदयदादा यांचे विचार आमच्यासारख्या युवकांना प्रेरणादायी असून त्यांचे अनुकरण करीत आम्ही मार्गक्रमण करणार असल्याची ग्वाही यावेळी त्यांनी दिली. सकाळी आठ वाजेपासून ते उशीरापर्यंत पिंपरी जलसेन परिसर, तसेच शिरुर व पारनेर तालुक्यातील लोकांनी समाधीस्थळी येऊन अभिवादन करीत आदरांजली व पुष्पांजली अर्पण केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय पठारे यांनी केले.

## जातीचे दाखले आणि घरकुलाच्या जागेसाठी आदिवासी भटक्यांचे तहसीलवर आंदोलन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :**तालुक्यातील भटक्या विमुक्त लोकांना जातीचे दाखले तसेच लिंपणगाव येथील जोशी वस्तीवरील लोकांना घरकुलासाठी जागा उपलब्ध करून देण्याचा मागणीसाठी अँड.अरुण जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली तहसील कार्यालयाच्या समोर वाजत गाजत आंदोलन करण्यात आले त्यावेळी त्याच्या मागण्या प्रशासनाने मान्य केल्याने अनेकांच्या चेहऱ्यावर झालेला आनंद दिसून आला. श्रीगोंदा तालुक्यातील भटके विमुक्त आदिवाशी समाजाला जातीचे दाखले मिळावेत तसेच लिपणगाव (जोशी वस्ती ) येथील जुना गट नंबर ५२/५२ नविन गट नंबर २/१/५२ या क्षेत्रावरील जागा भटके विमुक्तांच्या घरकुलासाठी जागा मिळणेबाबत आंदोलन करण्याबाबतचे निवेदन त्यानीं प्रशासनाला दिले होते. आज सकाळी वाजत गाजत घोषणाबाजी करत तहसील कार्यालयावर मोर्चा काढत धरणे आंदोलन केले होते त्यावेळी बोलताना अरुण जाधव म्हणाले कि संविधानाने दिलेल्या मूलभूत अधिकारासाठी अजूनही ठराविक समाज झटत आहे आणि प्रशासन त्याची खिल्ली उडवत आहे. हीच खरी शोकांतिका आहे त्यामुळे प्रशासनाला जाग यावी त्यासाठी आंदोलन करतोय आजही अनेक युवकांना जातीच्या दाखल्या मुळे शिक्षणाची अडचण येत आहे तसेच अनेकांना घरे नाहीत कारण घरासाठी त्यांना जागा नाही अश्या अनेक अडचणी समाज्याच्या समोर आहेत यासाठी आंदोलन करण्यात येत आहे त्याच्या अनेक मागण्या प्रशासनाने मान्य केल्या असून आता गावोगावी कॅम्पच्या माध्यमातुन जात प्रमाणपत्र दिले जाणार असून तसेच लिपंणगाव (जोशी वस्ती ) येथील जुना गट नंबर ५२/५२ नविन गट नंबर २/१/५२ या क्षेत्रावरील जागा भटके विमुक्तांच्या घरकुलासाठी मिळणेबाबत व तालुका शक्ती प्रदत्त समितीची बैठक आयोजीत केलेली असून त्यामध्ये गटविकास अधिकारी तथा सदस्य सचिव तालुका शक्ती प्रद समिती त्याच्याशी चर्चा केल्यावर ती समिती १२ जून रोजी बैठक घेणार आहे त्यामुळे तोपण प्रश्न मार्गी लागेल असेही तहसीलदार यांनी बोलताना सांगितले आहे. यावेळी आंदोलनासाठी लिंपणगाव ढोकराई या सह



अनेक ठिकाणाहून आलेल्या महिलांसह अनेक मान्यवर उपस्थित होते त्यावेळी त्याच्या मागण्या प्रशासनाने मान्य केल्याने अनेकांच्या चेहऱ्यावर खुशीचे चित्र दिसून येत आहे.

तहसीलदारांना अडवले

आंदोलन सुरु झाल्यावर अधिकारी मागच्या दराने बाहेर जात असल्याची माहिती आंदोलनकर्त्यांना मिळताच त्यांनी तहसील कार्यालयाच्या मागच्या दारात जाऊन तहसीलदार यांना तेथून जाण्यास अडचण निर्माण केल्याने ते मागच्या दराने जाऊ शकले नाही शेवटी त्यांना जनतेला सामोरे जावेच लागले त्यामुळे जनतेच्या प्रश्नापासून प काढणाऱ्या अधिकाऱ्याला आंदोलनकर्त्यांनी चांगलाच धडा शिकविला असल्याची जोरदार चर्चा ऐकायला मिळावी आहे.

## गुरुवारपासून श्रीक्षेत्र हरेश्वर देवस्थान डमाळवाडी येथे हरिनाम सप्ताह

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिराळ चिचोंडी:** संत श्री मच्छिंद्रनाथ भाऊ महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त व हरेश्वर मंदिर वर्धापन दिनानिमित्त श्री क्षेत्र हरेश्वर देवस्थान डमाळवाडी येथे दि.१२ जून पासून अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. हा सप्ताह भक्तिमय वातावरणात उत्साहात सुरू होणार असल्याची माहिती भगवान महाराज मचे यांनी दिली . दिनांक १२ जून ते १९ जून या दरम्यान होणाऱ्या या हरिकीर्तन महोत्सवात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहात दररोज पहाटे काकडा आरती नंतर ज्ञानेश्वरीचे वाचन केले जाईल त्यानंतर महाप्रसाद म्हणजेच सकाळची संत पंगत होईल संध्याकाळी प्रवचन त्यानंतर हरिपाठ कीर्तन होऊन महाप्रसादाची संत पंगत होईल मध्यरात्रीपर्यंत हरी भजन सुरू राहील दिनांक १९ जून रोजी सकाळी दहा वाजता भगवान महाराज मचे श्री शेत्र हरेश्वर संस्थान यांच्या काल्याच्या कीर्तनाने पुण्यतिथी सोहळ्याची सांगता होईल त्यानंतर महाप्रसादाची भव्यपंगत होईल सलग सात दिवस चालणाऱ्या कार्यक्रमाचा पंचकोशी येथील भाविकांनी लाभ घ्यावा अशी आव्हान हरेश्वर संस्थान डमाळवाडी किती वाडी धारवाडी चिचोंडी डोंगरवाडी कोल्हार शिराळ जोड मोहोज भजनी मंडळ व ग्रामस्थांनी केले आहे .

दैनंदिन हरिकीर्तन कार्यक्रम पुढील प्रमाणे: १२ जून लक्ष्मण महाराज कराड अंजनी गड ,१३ जून बाबासाहेब महाराज बडे , १४ जून संदिपान हासेगावकर श्रीक्षेत्र आळंदी ,१५ जून आदिनाथ महाराज शास्त्री तारकेश्वर गड ,१६जुन ह भ प उल्हास सूर्यवंशी श्रीक्षेत्र आळंदी ,१७ जून ह भ प यशो धनाजी साखरे महाराज आळंदी, १८ जून ह भ प अर्जुन महाराज लटपटे श्री शेत्र होळ १९ जून भगवान महाराज मचे श्री क्षेत्र यांचे कार्याची कीर्तन होईल.

# चोरीस गेलेला ट्रॅक्टर व नांगर २४ तासात केला हस्तगत

## सुपा पोलिसांची कामगिरी



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोमेश्वरनगर-** सुपा पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या ट्रॅक्टर व नांगर चोरी प्रकरणाचा पोलिसांनी २४ तासाच्या आत छडा लावत ट्रॅक्टर व नांगर हस्तगत करत पाच आरोपींना अटक केली आहे. याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली माहिती अशी की,शेतकरी राजेंद्र बबन खोमणे धंदा शेती रा.आंबी 'बु' ता. बारामती जि.पुणे यांचे मालकीचा ५लाख/- रुपये किंचा जॉनडियर कंपनिचा ५०४५ मॉडेलचा हिरवे रंगाचा ट्रॅक्टर व ३०हजार/- रुपये कंपनिचा लाल रंगाचा नांगर हा १जून रोजी रात्री ८:३० ते दिनांक २जून रोजी सकाळी ५/३० वाचे दरम्यान कोणी तरी अज्ञात चोरटयाने चोरी केले बाबत सुपा पोलीस स्टेशन गुन्हा दाखल आहे. मिळालेल्या माहितीनुसार हा गुन्हा उघडकीस करणे बाबत पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी मनोजकुमार नवसरे यांनी पोलीस स्टेशनचे गुन्हेशोध पथकाचे पोलीस अंमलदार किसन ताडगे महादेव साळुंके, व भाऊसाहेब चौधरी यांना गुन्हयाचे तपासा बाबत योग्य त्या सुचना देवुन तपास पथक रवाना केले. या गुन्हयाबाबत गुप्त बातमी दारामार्फत मिळालेली माहिती, तांत्रीक तपास तसेच सी.सी.टिव्ही फुटेज वरुन संशयित आरोपी १) बाळा उर्फ अविष्कार संजय तावरे वय २३ वर्षे रा. मोरगाव ता. बारामती जि. पुणे २) धिरज संदिप चव्हाण वय १८ वर्षे रा. मूर्टी. बारामती जि.पुणे ३) रोहन ज्ञानेश्वर माने वय १९ वर्षे रा. मोढवे ता. बारामती जि.पुणे ४) चेतन कानोबा दगडे वय २५ वर्षे रा. मोढवे ता. बारामती जि. पुणे ५) ओमकार रमेश पवार वय २७ रा. मोरगाव ता. बारामती जि.पुणे याना ताब्यात घेवुन त्याचेकडे गुन्हयाचे अनुषंगाने विचारपुस चौकशी करता त्यांनी गुन्हा केला असल्याची कबुली दिली आहे. सदर आरोपी यांचे कडुन गुन्हयात चोरलेला जॉनडियर कंपनिचा ५०४५ मॉडेलचा हिरवे रंगाचा ट्रॅक्टर व कंपनिचा लाल रंगाचा नांगर असा एकुन ५लाख३०हजार रुपये किंचा मुद्देमाल जप्त करुन गुन्हा उघडकीस आणण्यात आला आहे. अधिक तपास सहा. फौजदार वसंत वाघोले हे करीत आहेत.

सदरची कामगिरी पोलीस अधिक्षक संदीप सिंह गिल्ल, अप्पर पोलीस अधिक्षक गणेश बिरादार, .उप. विभागिय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड यांचें मार्गदर्शनाखाली, स.पो.नि. मनोजकुमार नवसरे, पो. स. ई. जिनेश कोळी, पो. हवा. रुपेश साळुंके, राहुल भाग्यवंत, संदिप लोंढे, विशाल गजरे, दत्तात्रय धुमाळ, पो. कॉ. किसन ताडगे, महादेव साळुंके, भाऊसाहेब चौधरी, ऋषीकेश विर, निहाल वणवे, सुरज साळुंके, सचिन दरेकर, सागर वाघमोडे, तुषार जैनक, सचिन कोकणे, आदेश मवाळ यांनी केली आहे.

द•ख•ल

## भारतीय पत्रकार संघाच्या बारामती तालुका अध्यक्षपदी मधुकर बनसोडे



**सोमेश्वरनगर** - भारतीय पत्रकार संघ बारामती तालुका नवीन कार्यकारिणी बैठक सोमवार दि ९ रोजी करंजे (ता बारामती) रोजी संपर्ककार्यालयात संपन्न झाली , भारतीय पत्रकार संघ बैठकीदरम्यान अध्यक्षस्थानी भारतीय पत्रकार संघ पश्चिम महाराष्ट्राचे कार्याध्यक्ष सिकंदर होते तसेच पुणे जिल्हा अध्यक्ष तैन्नूर शेख , सचिव काशिनाथ पिंगळे , मावळते तालुकाध्यक्ष विनोद गोलांडे उपस्थित होते.तालुकाध्यक्ष पदासाठी दोन इच्छुक त्यामध्ये सोमनाथ पिसाळ व मधुकर बनसोडे होते यामध्ये मधुकर बनसोडे यांचे नाव पुढे आल्याने तालुकाध्यक्षपदी बनसोडे यांची निवड करण्यात आली तसेच उपाध्यक्ष मोहम्मद शेख तर सचिव शरद भगत यांची निवड झाली तसेच नवनिर्वाचित पुढील कार्यकारणी कार्याध्यक्ष सीमा चोपडे,सहसचिव माधव झगडे,खजिनदार सोमनाथ लोणकर ,प्रसिद्धी प्रमुख जितेंद्र काकडे, हल्लाकृती समिती अजय पिसाळ, संघटक निखिल नाटककार , फिरोज भालदार यांच्या ही पदाची घोषणा करण्यात आली. अध्यक्षीय भाषणात सिकंदर नदाफ यांनी भारतीय पत्रकार संघ हा महाराष्ट्रातच नव्हे तर २२ राज्यात काम करणारा संघ आहे सर्वांनी एकत्र येत बारामती तालुका भारतीय पत्रकार संघाचे नाव अतिउंच करावे व नवीन कार्यकर्त्यांना शुभेच्छा दिल्या तसेच पुणे जिल्हाध्यक्ष तैन्नूर शेख यांनीही पत्रकारांसाठी आलेले नवनवीन कायदे व नियम याविषयी मार्गदर्शन केले ,तसेच जिल्हासचिव काशिनाथ पिंगळे यांनी नवनिर्वाचित कार्यकारणी यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या तसेच मावळते तालुकाध्यक्ष विनोद गोलांडे यांनी संघ स्थापनेपासून सर्व एकत्र येत जसे काम केले त्या पद्धतीत पुढेही काम करावे असे त्यांनी बोलताना आपले मत व्यक्त केले.

## शिरूर पोलिसांनी सुमारे सव्वा लाख रुपयांचा गुटखा पकडला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिरूर:** येथील पुणे–अहिल्यानगर महामार्गलगत जिओ पेट्रोल पंपाजवळ गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांचा मोठा साठा बाळगल्याप्रकरणी पोलिसांनी छापा टाकून तब्बल १ लाख १६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी हिमांशु धर्मवीर सिंग (वय २३) या युवकाविरुद्ध शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई रविवारी (ता.८) रात्री पावणेआठ वाजता करण्यात आली. शिरूरमधील जिओ पेट्रोल पंपासमोरील आदित्य स्नॅक्स सेंटरच्या मागील खोलीमध्ये आरोपी हिमांशु धर्मवीर सिंग याच्याकडे मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थ विक्रीसाठी बेकायदेशीररित्या साठवलेले असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर शिरूर पोलिसांनी ही कारवाई केली. पोलिसांनी जप्त केलेल्या मुद्देमालामध्ये हिरा पान मसाल्याची १८ हजार ४८८ रुपयांची १०५ पाकिटे, विमल पान मसाल्याची ७२ हजार ४३४ रुपयांची रुपयांची ३१६ पाकिटे, गोवा–१००० पान मसाल्याची ५ हजार ४०० रुपयांची २७ पाकिटे, रॉयल ७१७ टोबॅकोची ४ हजार ४०० रुपयांची १०० पाकिटे,व्ही वन टोबॅकोची ४ हजार ८४० रुपयांची २२० पाकिटे,डायरेक्टर स्पेशल पान मसाल्याची सात हजार रुपयांची २८ पाकिटे तसेच शॉट ९९९ टोबॅकोची ३ हजार ५०० रुपयांची २८ पाकिटे असा एकूण १ लाख १६ हजार ५४ रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.या प्रकारामुळे प्रतिबंधित अन्नपदार्थांची साठवणूक व विक्री करण्यास बंदी असतानाही आरोपीने आर्थिक फायद्यासाठी त्याचा साठा केल्याचे उघडकीस आले आहे. त्यामुळे अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम तसेच भारतीय न्याय संहिता कायद्याअंतर्गत आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस कॉन्स्टेबल नितेश दत्तात्रय थोरात यांच्या फिर्यादीवरून करण्यात आली असून,पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली शिरूर पोलीस पुढील तपास करीत आहेत.

## जिल्हा शल्य चिकित्सक म्हणून डॉ. संजय घोगरे पुन्हा नगरला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शल्यचिकित्सक डॉ. नागोराव चव्हाण यांची लातूर जिल्ह्यात बदली झाली असून, त्यांच्या जागी डॉ. संजय घोगरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. श्री. घोगरे यांनी यापूर्वी या पदावर जबाबदारी सांभाळली असून, नगर जिल्ह्यातील उद्देखनीय कार्यामुळे त्यांची ओळख बनली होती. त्यांची वर्षभरातच पुन्हा नगरला विनंती बदली करण्यात आली आहे. सध्याचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नागोराव शिवाजीराव चव्हाण यांची अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक म्हणून लातूर जिल्ह्यातील उदगीर येथे प्रशासकीय कारणास्तव करण्यात आली आहे. त्यांच्या जागी डॉ. संजय दशरथ घोगरे यांची जिल्हा शल्य चिकित्सक म्हणून नियुक्ती झाली असून, श्री. घोगरे सध्या पुणे येथे अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक म्हणून कार्यरत होते. त्यांची नगरला विनंती बदली करण्यात आली आहे. आरोग्य उपसंचालक नाशिक मंडळ यांनी याबाबत आज दि. ९ आदेश काढले असून, श्री. घोगरे यांना आजच नियुक्त करण्यात आल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## फुंदे टाकळी फाटा येथे दुकानात चोरी; ६२ हजार रुपयांची रोकड लंपास

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी:**तालुक्यातील फुंदे टाकळी फाटा येथे अज्ञात चोरट्यांनी दोन दुकानांच्या मागील पत्रे उचकटून ६२ हजार रुपयांची रोख रक्कम चोरल्याची घटना उघडकीस आली आहे.याप्रकरणी पाथर्डी पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दत्तात्रय अदिनाथ फुंदे (वय २६,रा.भुतेटाकळी, ता. पाथर्डी) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांचे गुरुदेव कॉम्प्युटर आणि शेजारील महेश शंकर खेडकर यांचे बालाजी कृषी सेवा केंद्र या दुकानांमध्ये ही चोरी घडली. फिर्यादीत म्हटले आहे की, दि.८ जून रोजी दुकाने बंद करून घरी गेल्यानंतर,९ जून रोजी सकाळी दुकाने उघडण्यासाठी गेल्यावर त्यांना मागील पत्रे उचकटलेले आढळले.दत्तात्रय फुंदे यांच्या दुकानातील काउंटरमधून २५ हजार रुपये आणि महेश खेडकर यांच्या दुकानातील काउंटरमधून ३७ हजार रुपये रोख रक्कम चोरीला गेल्याचे निदर्शनास आले.या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून,स्थानिक व्यापारी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.पाथर्डी पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली आहे.

## पैसे भरूनही कृषी सोलर पंप मिळेना जेऊर इमामपूर गटातील शेतकरी वैतागले



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मिरी ::** शासनाकडून सुरू करण्यात आलेल्या 'मागेल त्याला सौर कृषी पंप' योजना अत्यंत संथगतीने राबविली जात आहे. शेतकऱ्यांनी पैसे भरून तीन महिने उलटले तरी अद्याप शेतकऱ्यांना सौर कृषी पंप उपलब्ध होत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण होत आहे. दरम्यान, नगर तालुक्यामध्ये जेऊर इमांमपुर गटातील असंख्य शेतकऱ्यांनी सौर कृषी पंपासाठी ऑनलाइन अर्ज सादर केले आहेत. यामध्ये वीजवितरण कंपनीकडून शेतकऱ्यांना अप्रूव्हल दिले असले तरी प्रत्यक्षात सौरपंप बसविण्यास विलंब होत आहे. दरम्यान, अजूनही हजारो शेतकरी मान्यतेच्या प्रतीक्षेत आहेत. मागेल त्याला सौर कृषी पंप या योजनेअगोदर शेतकऱ्यांसाठी मेडा आणि कुसुम या योजनेअंतर्गत सौर कृषी पंप दिले जात होते. यामध्ये शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर नोंदणी केली होती; परंतु नवीन योजना आल्यानंतर जुन्या सर्व शेतकऱ्यांना नवीन योजनेमध्ये वर्ग केले. यासाठी शेतकऱ्यांना सुरवातीला ऑनलाइन अर्ज करावा लागतो. अर्ज केल्यानंतर वीजवितरण कंपनीकडून पेमेंट भरण्यासंदर्भात शेतकऱ्यांना मेसेज येतात. शेतकऱ्यांनी संबंधित पोर्टलवर पेमेंट केल्यानंतर विभागीय कार्यालयाकडून अप्रूव्हल दिले जाते. त्यानंतर पुन्हा लाइनमनकडून आयडी तयार करून दिला जातो. नंतर पुन्हा विभाग कार्यालयावर संबंधित अर्ज पाठविला जातो. सौरपंप योजनेत शेतकऱ्यांची कंपनीकडून लुबाडणूक त्यानंतर त्यामध्ये शेतकऱ्यांची निवड करून सौर कृषी पंप पुरविणाऱ्या कंपन्यांना कळविले जाते. मात्र, अंमलबजावणीत गोंधळ होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी आहे. यंदा लवकर पाऊस झाल्याने पाण्याची उपलब्धता वाढली. खरीप लागवडीचे क्षेत्रही वाढले आहे. त्यामुळे सिंचन क्षेत्र वाढल्याने अनेक शेतकऱ्यांनी नवीन विहिरी खोदल्या आहेत. यामुळे मागेल त्याला सोलार योजनेअंतर्गत अनेकांनी साधारण दोन–तीन महिन्यांपूर्वी सोलार पंपासाठी अर्ज भरले होते. दरम्यान, निवडणूक काळात काही दिवस या योजनेची साइट बंद झाली होती. महावितरण पोर्टलची साइट सद्यःस्थितीत सुरू आहे. यात सोलार पंपासाठी निवड झालेल्या शेतकऱ्यांना पैसे भरण्याचा पर्याय आहे; परंतु पुरवठादार निवडण्याचा कोणताही पर्याय येत नसल्याने शेतकरी संभ्रमात आहेत.

### नवीन अर्जधारकांना येताहेत अडचणी:

**मागेल त्याला सौरपंप या योजनेसाठी सातबारा उताऱ्यावर विहिरीची आवश्यकता असते. दरम्यान, अनेक शेतकऱ्यांनी अलीकडल्या काळामध्ये नवीन विहिरी खोदल्या आहेत. दरम्यान, या खोदलेल्या विहिरींचा फेर सातबारा उताऱ्यावर घेतला जात नाही. अशाही अनेक अडचणींना शेतकऱ्यांना सामोरे जावे लागत आहे.**

**तीन महिन्यांपूर्वी बँकेचे कर्ज काढून या योजनेसाठी पैसे भरले.कृषी सौरपंपासाठी ऑनलाइन अर्ज दाखल करून त्याची रकमही भरली आहे; परंतु अद्याप सौरपंप पुरवठा करणाऱ्या कंपनीची नावे निवडण्याचा पर्याय खुला नसल्याने पैसे भरूनही पंप मिळत नाही,अशी स्थिती आहे.**

**- रविंद्र मोकाटे (शेतकरी ईमांमपुर)**

## पोलिस उपनिरीक्षक लक्ष्मण औटी ३५वर्षाच्या सेवेनंतर सेवानिवृत्ती



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव :** सालवडगाव येथील ३५ वर्षे पोलिस खात्यात अत्यंत निष्ठेने आणि प्रामाणिकपणे सेवा बजावलेले पोलिस उपनिरीक्षक लक्ष्मण माधवराव औटी यांचा सेवानिवृत्ती समारंभ शुभम मंगल कार्यालय, शेवगाव येथे मोठ्या उत्साहात पार पडला.

या समारंभप्रसंगी विविध मान्यवर उपस्थित होते. अध्यक्षस्थानी चेअरमन आदिनाथ लांडे होते. यावेळी बप्पासाहेब लांडे, सुनील हाडके, रमेश मुके, वैशाली मुके, निता गोसावी, प्रणाली औटी, आकाश औटी, कल्याण मुटकुळे यांनी उपस्थिती लावून औटी यांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. काकासाहेब लांडे यांनी करताना औटी यांच्या सेवाभावी कार्याची आणि त्यांच्या शिस्तप्रिय स्वभावाची आठवण करून दिली. ''त्यांचे कर्तव्यनिष्ठ आणि मनमिळावू व्यक्तिमत्त्व आज अनेकांसाठी प्रेरणादायी ठरले आहे,'' असे त्यांनी सांगितले.

सर्व वक्त्यांनी औटी यांच्या योगदानाचे कौतुक करत त्यांना पुढील जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. औटी यांचा सेवानिवृत्ती समारंभ त्यांच्या सहकाऱ्यांच्या आणि कुटुंबीयांच्या उपस्थितीत स्नेहपूर्ण वातावरणात पार पडला.

## स्वराज्य, धर्म, संस्कृती आणि समतेच्या मूल्यांसाठी शिवरायांचा संघर्ष: कुलकर्णी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी:**जगभरात संघर्ष, युद्ध आणि मतभेदांचे वाढते प्रमाण पाहता भारताला आता आपली ऐतिहासिक जबाबदारी स्वीकारून जगाला समतेचा आणि शांतीचा मार्ग दाखवावा लागेल. ही भूमिका पार पाडण्यासाठी शिवाजी महाराजांचे विचार आणि हिंदू संस्कृतीची मूल्ये आधारभूत ठरतील.छत्रपती शिवाजी महाराजांचा संघर्ष फक्त स्वराज्यासाठी नव्हता,तर धर्म,संस्कृती आणि समतेच्या जागतिक मूल्यांसाठी होता असे प्रतिपादन विश्व हिंदू परिषद व बजरंग दल महाराष्ट्र–गोवा क्षेत्र संयोजक विवेक कुलकर्णी यांनी केले. शहरातील अष्टवाडा येथील चौंडेश्वरी मंदिरात रविवारी सुवर्णयुग परिवार ट्रस्ट व सकल हिंदू समाज यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त आयोजित हिंदू साम्राज्य दिन कार्यक्रमात ते बोलत होते.कार्यक्रमाला तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ महाराज शास्त्री,राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तालुकाध्यक्ष अरविंद पारगावकर,महादेव सोनवणे,विश्व हिंदू परिषदेचे तालुकाध्यक्ष किशोर परदेशी,महेश बाहेती,मुकुंद गर्जे,सोमनाथ बंग आदी मान्यवर उपस्थित होते. कुलकर्णी म्हणाले,आजच्या अस्थिर जागतिक वातावरणात भारतासमोर एक अनोखी आणि महत्त्वपूर्ण जागतिक भूमिका आहे,ती म्हणजे मानवजातीला समतेचा, शांतीचा व आध्यात्मिकतेचा मार्ग दाखवण्याची.मात्र ही भूमिका पार पाडण्यासाठी भारताने आधी स्वतः संघटित व अखंड होणे गरजेचे आहे.हीच भूमिका डोळ्यांसमोर ठेवून छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेला संघर्ष केवळ स्वराज्यासाठी नव्हता,तर तो एक व्यापक,वैश्विक मूल्यनिर्मितीचा प्रयत्न होता असे कुलकर्णी यांनी सांगितले. आदिनाथ महाराज म्हणाले,छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्य स्थापन करून संपूर्ण समाजासाठी आदर्श निर्माण केला. त्यांच्या जीवनशैलीतून आपल्याला प्रेरणा घेऊन मार्गक्रमण करावे लागेल.आजच्या काळात देव, देश आणि धर्मासाठी प्रत्येकाने निःस्वार्थ भावनेने व तळमळीने कार्य करणे आवश्यक आहे.शेवटी त्यांनी सर्वांना एकजुटीने राष्ट्रसेवेसाठी पुढे येण्याचे आवाहन केले.प्रास्ताविक व सूत्रसंचालन शैलेश शिरसाट यांनी तर आभार अमोल भंडारी यांनी केले.

## माऊलींच्या पालखी सोहळ्यासाठी मानाच्या अश्वांचे अंकलीहून प्रस्थान



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**आळंदी :** श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी सोहळ्यात अग्रभागी असणाऱ्या देवाच्या व स्वाराच्या अश्वांचे प्रस्थान अंकली जि बेळगांव येथून रविवारी (दि.८) हरिनाम गजरात झाले. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या आळंदी ते पंढरपूर या पालखी सोहळ्यात मानाचे स्थान असलेल्या माऊलींच्या अश्वाचे शितोळे, अंकली (ता.चिकोडी जि.बेळगांव) येथून प्रस्थान झाले. माऊलींच्या सोहळ्यातील मानाचे अश्व अंकली ते आळंदी हा ११ दिवसांचा पायी प्रवास करुन दि.१८ जून रोजी श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात सहभागी होण्यासाठी आळंदीत दाखल होतील. गुरुवार (दि.१९) जून रोजी आळंदी मंदिरातून श्रींचे वैभवी पालखी सोहळ्याचे आळंदी मंदिरातून प्रस्थान होणार आहे. आषाढी वारी साठी ज्ञानेश्वर माऊलींच्या अश्व प्रस्थान सोहळ्यास श्रीमंत उर्जितसिंह शितोळे सरकार, महादजीराजे शितोळे सरकार, युवराज विहानराजे शितोळे सरकार, पालखी सोहळ्याचे मालक बाळासाहेब आरफळकर, पालखी सोहळ्याचे मानकरी योगीराज कुऱ्हाडे, योगेश आरु, माऊली ग्रुपचे ज्ञानेश्वर गुळुंजकर, अजित मधवे, शंकरराव मा.कुऱ्हाडे, राहुल भोर, सत्यवान बवले आदीसह वारकरी उपस्थित होते. सन १८३२ मध्ये श्री क्षेत्र आळंदी ते श्री क्षेत्र पंढरपूर अशी संत ज्ञानेश्वर माउलींचा पालखी सोहळा सुरु झाला. अगदी तेंव्हा पासून श्रीमंत शितोळे सरकार यांचे अश्व व देवाला रात्री मुक्कामाचे ठिकाणी तंबू देण्याची परंपरा आहे. दि.१९ जून रोजी आषाढी पायी वारी पालखी सोहळा आळंदीतून पंढरीकडे प्रस्थान करेल. अंकली येथील शितोळे सरकारांच्या राजवाड्यात अश्वांचे विधिवत पूजन, परंपरांचे पालन करीत धार्मिक पूजा विधी झाल्यानंतर श्रीमंत शितोळे सरकार यांचे नियंत्रणात पूजना नंतर नगर प्रदक्षिणा झाल्यावर या अश्वाचे आळंदीकडे हरीनाम गजरात प्रस्थान झाले.

## भाजप कार्यशाळेत काही पदाधिकाऱ्यांची अनुपस्थिती; नाराजीचं नाट्य चर्चेत




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** मोदी सरकारच्या यशस्वी अकरा वर्षांचा उत्सव साजरा करण्यासाठी भारतीय जनता पक्षातर्फे जिल्हास्तरीय कार्यशाळेचं आयोजन आज अहिल्यानगर येथील बंधन लॉन्समध्ये जलसंपदा मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आलं. कार्यशाळेला जिल्ह्यातील नवनिर्वाचित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. मात्र नगर शहरातील काही निवडक पदाधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीमुळे नाराजीचं नाट्य गाजत असून, त्यावरून राजकीय चर्चांना उधाण आलं आहे. शहर जिल्हाध्यक्ष पदाच्या निवडीवरून गेल्या काही दिवसांपासून भाजपमध्ये रस्सीखेच सुरू होती. माजी महापौर बाबासाहेब वाकळे, सचिन पारखी आणि अनिल मोहिते यांची नावं या पदासाठी चर्चेत होती. अखेर अनिल मोहिते यांची निवड झाल्यानंतर काही पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये नाराजीचं वातावरण दिसून आलं. काहींनी जाहीरपणे या निवडीचं स्वागत केलं असलं तरी अनेकांनी खाजगीत नाराजी व्यक्त केल्याचं बोललं जातं. या पार्श्वभूमीवर आजच्या कार्यशाळेला माजी शहर जिल्हाध्यक्ष आणि जुने पदाधिकारी अनुपस्थित राहिल्याने, पक्षात अजूनही एक गट नाराज असल्याचं चित्र स्पष्ट झालं. कार्यशाळेत भाजप महिला आणि युवक मोर्चाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. व्यासपीठावर नव्या–जुन्या पदाधिकाऱ्यांची उपस्थितीही लक्षणीय होती.

ही कार्यशाळा नवनिर्वाचित नगर शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांच्या उपस्थितीत पार पडलेला पहिला मोठा कार्यक्रम ठरला. येत्या काळात नगर महानगरपालिकेच्या निवडणुका जाहीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पक्षात गटबाजीची भावना कमी करून सर्व गटांना विश्वासात घेऊन संघटना मजबूत करण्याचं मोठं आव्हान आता मोहिते यांच्यासमोर आहे.

द•ख•ल

## श्रीगोंदा माध्यमिक विद्यालयाची पूर्वी गारुडकर ची इस्रो सहलीसाठी निवड

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**लपणगाव**--जनसेवा प्रतिष्ठान अहिल्यानगर यांच्या वतीने घेण्यात आलेल्या डॉ.सी व्ही रमण बालवैज्ञानिक परीक्षेत ज्ञानदीप ग्रामीण विकास शिक्षण संस्थेचे, श्रीगोंदा माध्यमिक विद्यालय श्रीगोंदा येथे शिकत असलेली इयत्ता सहावीतील विद्यार्थ्यांनी कु.पूर्वी संजय गारुडकर ही श्रीगोंदा तालुक्यात प्रथम आली असून तिची इस्रो सहलीसाठी निवड झाली आहे. श्रीगोंदा माध्यमिक विद्यालयातील आठ विद्यार्थी या परिक्षेत उत्तीर्ण झाले आहेत.

पूर्वीच्या या यशाबद्दल ज्ञानदीप ग्रामीण विकास शिक्षण संस्थेचे सचिव . राजेंद्र नागवडे तसेच संस्थेच्या अध्यक्षा अनुराधाताई राजेंद्र नागवडे, संस्थेचे निरीक्षक . बी.के लगड, छत्रपती शिक्षण संस्थेचे निरीक्षक .सचिनराव लगड , शाळा समितीचे उपाध्यक्ष बबनराव आनंदकर, शाळा समितीचे सर्व सदस्य, विद्यालयाचे मुख्याध्यापक मा. भिमराव आनंदकर,मार्गदर्शक शिक्षक राजेंद्र गारुडकर, सर्व शिक्षक व पालकांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## राज्यात तापमानात वाढ; काही ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाची शक्यता

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : राज्यात मागील दोन आठवड्यांपासून मान्सूनचा प्रवास पूर्णपणे रखडलेला असून, तो पुढील आठवडाभर तरी सुरु होण्याची चिन्हं नाहीत. भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, १५ जूनपर्यंत राज्यात सार्वत्रिक पावसाची शक्यता नाही. त्यामुळे १४ जूनपर्यंत राज्यातील बहुतांश भागांमध्ये तापमानात वाढ होण्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. विदर्भात तापमान ४५ अंशांपर्यंत जाण्याचा इशारा विदर्भ, मराठवाडा आणि खानदेशात कमाल तापमानात वाढ होण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. विशेषतः पूर्व विदर्भात तापमान ४५ अंश सेल्सिअसपर्यंत जाण्याची शक्यता असून, इतर भागांमध्येही कमाल तापमान ४० अंशाच्या वर राहण्याची शक्यता आहे. मराठवाडा आणि खानदेशातील अनेक भागांतही उकाडा जाणवण्यासारखा असून, तापमान ४० अंशांच्या आसपास राहील.

दक्षिण महाराष्ट्रात काही ठिकाणीच पावसाची शक्यता राज्यात पाऊस केवळ काही ठिकाणीच होणार असून, तोही मेघगर्जनेसह आणि मुख्यतः दुपारनंतर. दक्षिण मराठवाडा आणि दक्षिण मध्य महाराष्ट्रात आठवड्याच्या सुरुवातीला थोड्या प्रमाणात पावसाची शक्यता आहे. मात्र सार्वत्रिक मान्सूनसदृश पर्जन्यवृष्टी अद्याप प्रतीक्षेत आहे.

कृषी विभागाचा शेतकऱ्यांना इशारा मान्सून अद्याप लांबणीवर असल्यामुळे आणि उच्च तापमानाच्या पार्श्वभूमीवर, कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना पेरणी किंवा लागवडीची घाई न करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. उष्माघात आणि पाण्याच्या टंचाईचा धोका लक्षात घेता योग्य वेळेची वाट पाहणे हिताचे असल्याचे कृषी तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

## गुलमोहर रस्त्यावर ड्रेनेज कामासाठी वाहतुकीत बदल

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : पारिजात चौक परिसरातील रस्त्यावरील वाहतूक व्यवस्थेत लवकरच बदल होणार आहेत. सावेडी टेलिफोन ऑफिस – पारिजात चौक – एकविरा चौक – तपोवन रस्ता या मार्गाचे डांबरीकरण शासनाच्या निधीतून करण्यात येणार आहे. त्याआधी या




संपूर्ण मार्गावर अंडरग्राऊंड ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. गुलमोहर रस्त्यावर पारिजात चौक येथे या कामाला ८ जूनपासून सुरुवात झाली असून, १८ जूनपर्यंत ते पूर्ण करण्याचे नियोजन महापालिकेने केले आहे.या कामामुळे वाहतुकीत अडथळा निर्माण होऊ नये म्हणून दहा दिवस गुलमोहर रस्त्यावरील वाहतूक पर्यायी मार्गाने वळवण्यात येणार आहे. या काळात नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे. पर्यायी मार्गाची व्यवस्था सुरभी हॉस्पिटल ते कलानगर या मार्गावर जाणाऱ्या वाहनचालकांसाठी पुढील पर्यायी मार्ग निश्चित करण्यात आला आहे:

आमदार संग्राम जगताप यांचे कार्यालय – हनुमान मंदिर – रामकृष्ण कॉलनी – अष्टविनायक अपार्टमेंट – समता नगर – झालानी हॉस्पिटल – गंगा उद्यान मार्गे वाहनचालकांनी प्रवास करावा, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.ड्रेनेज लाईनचे काम वेळेत आणि दर्जेदार व्हावे यासाठी संबंधित यंत्रणांना सूचना देण्यात आल्या आहेत. रस्त्यावरील वाहतुकीच्या अडचणी टाळण्यासाठी नागरिकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.

# रस्त्यावरील खड्ड्यांची पूजा करत श्रीगोंद्यात शिवसेनेची गांधीगिरी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : शहरातील मुख्य रस्त्यावर तसेच इतर रहदारीच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणामध्ये पडलेले खड्डे तातडीने दर्जेदार काम करून भरण्यात/बुजवण्यात यावेत याबाबत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे श्रीगोंदा तालुक्याचे वतीने श्रीगोंदा शहरातील सर्व खड्ड्यांना पुष्पहार अर्पण करून पूजा करण्यात आली व सर्व खड्ड्याचे प्रतिमा मुख्याधिकारी पुष्पगंधा भगत यांना भेट देण्यात आली आहे .त्यामुळे श्रीगोंद्यात शिवसेनेची गांधीगिरी बाबत जोरदार चर्चा रंगली. श्रीगोंद्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे सगळीकडे रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुर्दशा झाली असल्यामुळे नागरिकांना दळणवळण करण्यास मोठी अडचण निर्माण होताना दिसत आहे त्यामळे जनतेसाठी पाऊस आला धावून पण चक्क रस्ते गेले वाहून असेच चित्र श्रीगोंद्यात पाहण्यास मिळत आहे शहरातील मुख्य रस्त्यावर तसेच इतर रहदारीच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणामध्ये पडलेले खड्डे असल्यामुळे नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे त्यामुळे शिवसेनेच्या उद्धव ठाकरे गटाच्या वतीने शहरातील खड्ड्याना पुष्पहार अपूर्ण करून त्याचा फोटो काढून त्याची प्रतिमा नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी पुष्पगंधा भगत यांना भेट देण्यात आली आहे त्यामुळे श्रीगोंद्यात शिवसेनेची गांधीगिरी बाबत जोरदार चर्चा रंगताना



दिसत आहे तसेच हे खड्डे लवकरात लवकर दर्जेदार रित्या न बुजवल्यास शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचेवतीने तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल यावेळी नगरपरिषदेच्या विरोधात प्रचंड घोषणाबाजी करून आंदोलन करण्यात आले या आंदोलनाचे निवेदन मुख्याधिकारी यांना देण्यात आले श्रीगोंदा शहरांमधून अनेक तालुक्यातील दिंड्या पंढरपूरकडे जात असतात दिंडी मार्गावर सुद्धा प्रचंड खड्डे पडलेले आहेत संत शेख महंमद महाराज यांचा सुद्धा पालखी सोहळा श्रीगोंदा शहराला प्रदर्शना घालून पंढरपूरकडे जात असतो या मार्गावर सुद्धा प्रचंड खड्डे पडलेले आहेत सर्व खड्डे लवकरात लवकर बुजवण्यात यावे अशी मागणी निवेदन डरे करण्यात आली यावेळी उपस्थित शिवसेना उपजिल्हाप्रमुख बाळासाहेब दुतारे सुरेश देशमुख संभाजी घोडके हरिभाऊ काळे सुदाम सावंत शिवाजी समदडे सागर खेडकर नितीन लोखंडे रोहिदास मस्के संतोष चिकलठाणे सुनील घोडके राजू तोरडे गणेश लाटे योगेश भुतकर मयूर गोरे रघुनाथ सूर्यवंशी नूतनताई पानसरे जनाबाई गायकवाड जमील भाई शेख ओमकार शिंदे राहुल नवले यावेळी शिवसैनिक युवा सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

## ओढे, नाल्यांवरील अतिक्रमणामुळे घरात पाणी ; भाजपने केली आयुक्तांच्या बदलीची मागणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : शहर व उपनगरांतील ओढे व नाल्यांवरील अतिक्रमण न हटवल्यामुळे पावसाचे पाणी थेट नागरिकांच्या घरात शिरले आहे. यामुळे संतप्त झालेल्या नागरिकांनी प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. दरम्यान, ''अतिक्रमण काढण्यात अपयशी ठरत असाल, तर राजीनामा द्या किंवा बदली करून जा,'' अशी थेट मागणी भाजपचे शहर जिल्हा चिटणीस मिलिंद भालसिंग यांनी आयुक्तांकडे केली आहे. सावेडी उपनगर, केडगाव, बोल्हेगाव–नागापूर, पाईपलाईन, बालिकाश्रम रोड, सारसनगर, निर्मलनगर, कोठला परिसर आदी भागांतील नाल्यांवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झाली आहेत. परिणामी, पावसाळ्यात नाल्यांचे पाणी मोकळे वाहू शकत नाही आणि ते घरांमध्ये घुसते. भालसिंग म्हणाले, महानगरपालिकेच्या बांधकाम विभागातील अधिकारी झोपेत आहेत का, असा प्रश्न निर्माण झाला आहे. नाल्यावर मोठी बांधकामे दिसतात, ती प्रशासनाला दिसत नाहीत का? नालेसफाईचे काम मे अखेरीपर्यंत पूर्ण करण्याचे आदेश ठेकेदार संस्थेला देण्यात आले होते. काही ठिकाणी नालेसफाईचे काम झाले असले तरी अनेक भागांमध्ये नाल्यावरील अतिक्रमण हटवले गेलेले नाही. काम न करता, केवळ अहवालात काम झाल्याचे दाखवून जनतेला वेड्यात काढण्याचा प्रकार सुरू आहे, अशी टीकाही भालसिंग यांनी केली.

## महिला पोलिसाचा आत्महत्येच्या प्रयत्नामागे सामाजिक कार्यकर्त्याचा दबाव?

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर** : अहिल्यानगर शहरातील पोलिस दलाला हादरवून टाकणारी एक गंभीर घटना समोर आली आहे. वाहतूक शाखेतील महिला पोलीस कर्मचारी जयश्री सुद्रिक (वय अंदाजे ३५) यांनी मानसिक त्रासाला कंटाळून विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केल्याची माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे, या प्रकरणात एका सामाजिक कार्यकर्त्याच्या जाचाचा स्पष्ट उल्लेख असलेली सुसाईड नोटही सापडली आहे. सकाळी नेहमीप्रमाणे ड्युटीवर उपस्थित झाल्यानंतर जयश्री सुद्रिक यांची प्रकृती अचानक खालावली. सहकाऱ्यांनी तत्काळ दक्षता घेत त्यांना जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केलं. प्राथमिक तपासणीत त्यांनी विषारी पदार्थ घेतल्याचं निष्पन्न झालं. त्यानंतर त्यांना अधिक उपचारासाठी शहरातील एका खासगी रुग्णालयात हलवण्यात आलं असून त्यांची प्रकृती अत्यवस्थ आहे. या घटनेनंतर त्यांची पर्स तपासली असता त्यात एक हस्तलिखित सुसाईड नोट आढळली. या चिठ्ठीत, एका विशिष्ट सामाजिक कार्यकर्त्याने दीर्घकाळ मानसिक त्रास दिल्याचा गंभीर आरोप सुद्रिक यांनी केला आहे. या सामाजिक कार्यकर्त्याचे नाव अद्याप अधिकृतपणे जाहीर करण्यात आलेले नसले, तरी पोलिसांनी तपासाची चक्रं सुरू केली आहेत. घटनेची गंभीरता लक्षात घेता तोफखाना पोलीस स्टेशनमध्ये याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, संबंधित कार्यकर्त्याची चौकशी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून या प्रकरणाकडे विशेष लक्ष दिलं जात आहे. जयश्री सुद्रिक या गेल्या काही वर्षांपासून वाहतूक शाखेत कार्यरत असून त्यांची सेवा वागणूक ही अत्यंत शिस्तबद्ध आणि नम्र असल्याचे त्यांचे सहकारी सांगतात. त्यामुळे या घटनेने पोलीस दलात खळबळ उडाली आहे. सध्या संपूर्ण जिल्ह्याचं लक्ष या प्रकरणाच्या पुढील तपासाकडे लागलं आहे. सुसाईड नोटमधील मजकूर खऱ्या अर्थाने पुरावा ठरेल का? आणि संबंधित सामाजिक कार्यकर्त्यावर कायदेशीर कारवाई होईल का, हे येत्या काही दिवसांत स्पष्ट होईल.

# अत्याचार पिडीत महिलांना तात्काळ अर्थसहाय्य द्या मागणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : रामवाडी येथील तीन कचरावेचक महिलांवर झालेल्या जातीय अत्याचाराच्या घटनेला चार महिने उलटूनही, अ‍ॅट्रॉसिटी कायद्याअंतर्गत त्यांना कोणतीही सरकारी मदत मिळालेली नाही. त्यामुळे या महिलांच्या कुटुंबीयांवर उपासमारीची वेळ आली आहे. तात्काळ अर्थसहाय्य देण्यात यावे, या मागणीसाठी कागद काच पत्रा कष्टकरी पंचायतने समाजकल्याण विभागाकडे निवेदन दिले. पंचायतच्या शिष्टमंडळाने प्रभारी समाजकल्याण अधिकारी देवीदास कोकाटे यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. यात चार महिन्यांपूर्वी नागापूर कॉटेज कॉर्नर परिसरात कचरा वेचणाऱ्या प्रमिला घोडके, ज्योती घोडके आणि कविता घोरपडे यांच्यावर झालेल्या मारहाणीचा व जातीवाचक शिवीगाळीचा संदर्भ देत, गुन्हा दाखल असूनही पीडितांना



मदत मिळत नसल्याची गंभीर बाब नमूद करण्यात आली आहे. संघटनेच्या माहितीनुसार, गंभीर जखमी झालेल्या या महिलांना दोन ते अडीच महिने अंथरुणावर राहावे लागले. आजही त्या कामावर जाऊ शकत नाहीत. त्यांच्याकडून आवश्यक कागदपत्रेही समाजकल्याण कार्यालयात वेळेवर सादर करण्यात आली होती. तरीही अद्याप ५०% तातडीची मदतदेखील त्यांना मिळालेली नाही.महिलांनी आर्थिक मदतीसाठी कार्यालयात विचारणा केली असता, कर्मचाऱ्यांकडून उद्धट वर्तन होत असल्याची तक्रारही संघटनेने केली आहे. कामगार महिलांना अधिकारांसाठी आवाज उठवला तरी त्यांच्यावरच दडपशाही केली जाते, असे मत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी व्यक्त केले. निवेदन देताना पंचायतचे जिल्हा समन्वयक विकास उडानशिवे, ज्योती घोडके, प्रमिला घोडके, कविता घोरपडे, सुशीला भालेराव, कुंदा अडागळे, नंदा इंगळे, सुमन वाघमारे, लता तिजोरे, ज्योती शेलार, कुसुम वडागळे, ताराबाई काते, उषा वडागळे, अनुसया वाघमारे आदी उपस्थित होते. या प्रकरणात समाजकल्याण विभागाने तातडीने हस्तक्षेप करून पीडित महिलांना कायद्यानुसार मिळणारी मदत द्यावी, अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशाराही पंचायतने दिला आहे.

## पूर्वजांची जमीन मिळावी म्हणून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर हलगी बजाव आंदोलन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगरः** ''पूर्वजांची जमीन आम्हाला परत मिळालीच पाहिजे'' अशी मागणी करत नेवासा तालुक्यातील खामगाव चिकणी येथील ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सोमवारी जोरदार हलगी बजाव आंदोलन केले. जायकवाडी प्रकल्पात संपादित झालेली व सध्या उघड पडलेली १० एकर १६ गुंटे जमीन आम्हाला वारस हक्काने कसण्यासाठी मिळावी, अशी मागणी त्यांनी केली. राष्ट्रीय विश्व ग्रामीण समाज कार्य संघाच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. यावेळी संजय वाल्हेकर, सुधीर भाऊ वैरागर, संजय वैरागर, अमोल शेरे, गोरखनाथ शेरे, बाबासाहेब शेलार, हरिभाऊ लहाने, कल्याण हापसे, राजेंद्र सरोदे, गोविंद सरोदे, प्रकाश सुखदान, कारभारी घुले, सुधाकर साठे, संदीप राजगुरू आदी उपस्थित होते. जायकवाडी प्रकल्पात जमीन गेली, आता दुसरेच कसत आहेत खामगाव चिकणी येथील गट क्र. ५५/२/ड व ५६/३ हे क्षेत्र जायकवाडी धरणासाठी संपादित करण्यात आले होते. गेल्या काही वर्षांपासून धरणातील पाणीपातळी




कमी झाल्याने ही जमीन पुन्हा उपयोगात येण्याजोगी झाली आहे. परंतु सदर जमिनीवर मौजे गोपळपूर येथील ढोकणे नावाचे सधन शेतकरी शासनाची कोणतीही परवानगी न घेता बेकायदेशीररीत्या शेती करत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे. कायद्याचा दाखला देत वारस हक्काची मागणी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमानुसार, पाटबंधारे प्रकल्पामुळे संपादित झालेली जमीन जर पुढे पाण्याखाली राहत नसेल, तर ती मूळ जमीनधारकांच्या वारसांना कसण्यासाठी परत दिली जाऊ शकते. हेच सूत्र लागू करत आंदोलकांनी जिल्हाधिकाऱ्यांना सादर केलेल्या निवेदनात आम्हाला ती जमीन परत मिळावी, अशी मागणी केली आहे. जमीन आमच्या पूर्वजांची असून ती आम्हीच कसू, परक्यांचा बेकायदेशीर ताबा खपवून घेतला जाणार नाही, असा निर्धार आंदोलकांनी यावेळी व्यक्त केला.

सरकारने प्रकल्पग्रस्तांचा विसर टाकलाय – आरोप प्रकल्पासाठी जमीन दिली, पण त्याऐवजी आम्हाला ना घर मिळालं, ना रोजगार. आता तीच जमीन परत मिळण्याची संधी असताना, त्यावर दुसऱ्यांनी कब्जा केला आहे. हे सरकारच्या दुर्लक्षामुळे घडते आहे, असा आरोप संजय वाल्हेकर यांनी केला. जर प्रशासनाने याकडे लक्ष दिले नाही, तर हे आंदोलन तीव्र करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ कारवाई करून मूळ जमिनधारकांच्या हक्काची पुनःस्थापना करावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

## महानगरपालिकेला दोन अत्याधुनिक ड्रेनेज सफाई वाहने उपलब्ध

### आमदार संग्राम जगताप यांच्या पाठपुराव्याला यश

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** – शहराचा वेगाने होत असलेला विस्तार, वाढती लोकसंख्या आणि त्या अनुषंगाने वाढणाऱ्या नागरी सुविधा लक्षात घेता, राज्य शासनाने अहिल्यानगर महानगरपालिकेला दोन अत्याधुनिक ड्रेनेज साफसफाई वाहने उपलब्ध करून दिली आहेत. आमदार संग्राम जगताप यांच्या पाठपुराव्यानंतर ही महत्त्वाची सुविधा मिळाली असून, त्यामुळे नागरिकांच्या तक्रारींवर तत्काळ उपाययोजना करता येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. सोमवारी महानगरपालिकेच्या आवारात सक्शन अँड जेटिंग वाहनांचे लोकार्पण आमदार संग्राम जगताप आणि आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांच्या हस्ते पार पडले. यावेळी उपायुक्त संतोष टेंगळे, विजयकुमार मुंडे, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. विशेष म्हणजे ७ टन क्षमतेच्या वाहनाचे लोकार्पण सफाई कामगारांच्या हस्ते करण्यात आले. आमदार संग्राम जगताप म्हणाले, महानगरपालिका आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांच्या अडचणी सोडवण्याचे काम करते. मात्र अद्ययावत साधनांची कमतरता असल्यास अडथळे निर्माण होतात. या पार्श्वभूमीवर शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून ही वाहने मंजूर करून घेतली आहेत. पावसाळ्यात जलतरण आणि ड्रेनेज समस्या उद्भवतात, अशा वेळी ही यंत्रणा प्रभावी ठरेल. आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले की, या गाड्यांमध्ये चेंबर व ड्रेनेजमधील मैला उपसून त्यावर गाडीतच प्रक्रिया केली जाते. या प्रक्रियेतूनच




निर्माण होणारे पाणी पुन्हा जेटिंगसाठी वापरता येते. त्यामुळे पाण्याचा वापर कमी होतो आणि वेळेचीही बचत होते. अत्याधुनिक सुविधांनी सज्ज वाहनांची वैशिष्ट्ये १८.५० टन क्षमतेचे वाहन : ८ हजार लिटर क्षमतेची टाकी, तीन प्रकारच्या सुविधा, गाडीतच मैल्यावर प्रक्रिया. ७ टन क्षमतेचे वाहन : ३ हजार लिटर क्षमतेची टाकी.प्रशिक्षित कर्मचारी : चालक व कर्मचाऱ्यांना विशेष प्रशिक्षण देण्यात आले आहे. दैनंदिन कार्यक्षमता : सलग आठ तास काम करण्याची क्षमता. या वाहनांच्या आगमनामुळे महानगरपालिकेवर तांत्रिक भार न पडता, अधिक कार्यक्षमतेने नागरी समस्यांवर उपाय करता येणार आहेत.

## श्रीगोंदा तालुक्यात जमिनीचा वापसा होताच पेरणीला सुरुवात

### शेतकऱ्यांची शेती उद्योगात लगबग सुरु

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**लिंपणगाव**:गेल्या काही दिवसांपासून श्रीगोंदा तालुक्यात पडणाऱ्या पूर्वमोसमी पावसाने शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित केल्या असून, खरीप हंगामाची पेरणी मोठ्या उत्साहात सुरू झाली होती.पहिल्याच पावसाच्या सरींचा लाभ घेत शेतकरी पुन्हा एकदा शेतात उतरताना दिसत असून, शेतमळ्यांमध्ये बैलजोड्यांचा गडगडाट आणि ट्रॅक्टरच्या घरघराटाने चैतन्य निर्माण झाले आहे. मात्र ठिकठिकाणी पाऊस सुरू असल्याने काही भागात पेरण्यांना ब्रेक लावला आहे. तालुक्यातील विविध गावांमध्ये उडीद, मूग, मका, बाजरी यांसारख्या पारंपरिक पिकांची पेरणी जोमात सुरू आहे. विशेषतः पाण्याची टंचाई जाणवणाऱ्या भागांतील शेतकऱ्यांनी योग्य वेळ साधत लवकर पेरणी सुरू केली आहे. पावसावर आधारित शेती करणाऱ्या या भागांमध्ये लवकर पेरणी होणे फायदेशीर मानले जात असून, त्यानुसार शेतकरी मेहनतीने कामाला लागले आहेत. दरम्यान, काही ठिकाणी बी–बियाणे व रासायनिक खते वेळेवर मिळण्यात अडचणी येत असल्याची माहितीही समोर येत आहे. यामुळे शेतकऱ्यांना काहीशी गैरसोय होत असून, कृषी खात्याने वेळीच लक्ष देणे गरजेचे असल्याचे जाणकारांनी सांगितले. पेरणीसाठीची लगबग, बैलजोड्यांचा नाद, ट्रॅक्टरचा आवाज आणि मातीचा सुगंध यामुळे संपूर्ण तालुक्यात खरीप हंगामाचे स्वागत आनंदात होत आहे. शेती म्हणजे केवळ व्यवसाय नव्हे तर श्रद्धा आणि संस्कृती याचा संगम आहे, हे पुन्हा एकदा अनुभवास येत आहे. श्रीगोंदा तालुक्यातील शेतकरी आपल्या पारंपरिक मेहनतीने आणि नव्या तंत्रज्ञानाच्या साहाय्याने यंदाही चांगले उत्पादन घेण्यासाठी सज्ज झाले आहेत.

दैनिक

# राष्ट्र सह्याद्री

मंगळवार, दि.१० जून २०२५ | अहिल्यानगर | पान नं. ८


## हॉटेलचे कुलूप तोडून ४० हजारांचा मुद्देमाल पळवीला

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील गुहा परिसरात असलेले साई सेवा नावाचे चहा नाष्ट्याचे हॉटेल अज्ञात भामट्याने फोडून हॉटेल मधील रोख रक्कमेसह सुमारे ४० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना दि. ५ जून रोजी पहाटेच्या सुमारास उघडकीस आली. नितीन एकनाथ कोळसे, वय ३१ वर्षे, हे राहुरी तालुक्यातील गुहा येथे राहत असून त्यांचे गुहा गावचे शिवारात सेल पेट्रोल पंपासमोर साई सेवा नावाचे चहा नाष्ट्याचे हॉटेल आहे. नितीन कोळसे हे दि. ४ जून २०२५ रोजी रात्री ११.३० वाजता दुकान बंद करून घरी गेले होते. पहाटे १.३० वाजे दरम्यान अज्ञात भामट्याने नितीन कोळसे यांचे हॉटेलचे कुलूप तोडून दुकानातील ७ हजार ८०० रुपये रोख रक्कम व सिगारेट, तंबाखू असा एकूण ३७ हजार ७७२ रुपयांचा मुद्देमाल चोरुन नेला. नितीन एकनाथ कोळसे यांच्या फिर्यादीवरून राहुरी पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपी विरोधात गुन्हा रजि. नं. ६३७/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ३०५ (अ), ३३१ (४) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे हे करीत आहेत.

# विठ्ठल-रुक्मिणीचे व्हीआयपी दर्शन बंद



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पंढरपूर** : पंढरपुरातील विठ्ठल-रुक्मिणी दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या दिवसेंदिवस वाढू लागली आहे. भाविकांची वाढती संख्या विचारात घेत मंदिर प्रशासनाने व्हीआयपी दर्शन बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. या संदर्भात मंदिर समितीने एक परिपत्रक देखील प्रसिद्ध केले आहे.

आषाढी यात्रेच्या निमित्ताने आत्तापासूनच पंढरपुरात भाविकांची गर्दी वाढू लागली आहे. आषाढी यात्रेसाठी येणाऱ्या भाविकांना विठ्ठल रुक्मिणीचे वेळेत आणि सुलभ दर्शन व्हावे, यासाठी वशिल्याचे दर्शन बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मागील काही दिवसांपासून वशिल्याच्या दर्शनामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे.

दर्शन रांगेत उभे राहणाऱ्या भाविकांना तासंतास ताटकळत थांबावे लागत असल्याचा प्रकार घडत आहे. यावर आता मंदिर समितीने वशिल्याचे दर्शन बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. मंदिर समितीचे अध्यक्ष सदस्य आणि कार्यकारी अधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय यापुढे कोणालाही मंदिरात दर्शनासाठी सोडले जाणार नाही, असा लेखी आदेश कार्यकारी अधिकाऱ्यांनी काढला आहे.आषाढी यात्रेनिमित्त विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी राज्यभरातून मोठ्या संख्येने भाविक येतात. आषाढी यात्रेनिमित्तभाविकांना मंदिर समितीमार्फत मुबलक सोयीसुविधा उपलब्ध करण्यात येणार आहे. त्याचबरोबर भाविकांचे सुलभ आणि जलद दर्शन व्हावे, यासाठी २७ जूनपासून २४ तास दर्शन व्यवस्था उपलब्ध होणार असल्याची माहिती मंदिर समितीने दिली आहे.मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी ही महत्वाची माहिती दिली. आषाढी यात्रेच्या अनुषंगाने मंदिर समितीची बैठक सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अक्ष्यक्षतेखाली झाली. त्यानंतर हा महत्वाचा निर्णय घेण्यात आला.

## अॅड. रावसाहेब शिंदे प्रतिष्ठानच्या

## ज्युनिअर कॉलेजचे शरद पवारांच्या हस्ते उद्घाटन




**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव:** अँड रावसाहेब शिंदे प्रतिष्ठान संचलीत विद्यानिकेतन शैक्षणिक संकुलाच्या जुनियर कॉलेज चे उद्घाटन व पुरस्कार गुरुवार दि.११ जून रोजी सकाळी १०.३० वा.माजी केंद्रीय मंत्री शरदचंद्र पवार,माजी खा,व मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रयत शिक्षण संस्था अध्यक्ष रामसशे

ठाकूर तसेच माजी मंत्री बाळासाहेब थोरात,जेष्ठ पत्रकार मधुकर भावे, भगीरथ शिंदे,आदी मान्यवर उपस्थित होणार असून, यावेळी एमकेसीएलचे विवेक सावंत यांना रावसाहेब शिंदे स्मृती पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती डॉ.राजीव शिंदे यांनी दिली.विद्यानिकेतन शैक्षणिक संकुलात आयोजित पत्रकार परिषदेत शिंदे बोलत होते यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा . टी.इ. शेळके, प्रा.डॉ.बाबुराव उपाध्ये, प्रा.शंकरराव गागरे उपस्थित होते. स्व. रावसाहेब शिंदे यांनी जीवनात समाजसेवेचा अखंड यज्ञ,सत्य सेवेचा दीपस्तंभ आणि समतेचा अटळ संकल्प स्वातंत्र्यपूर्व काळात मायभूमीच्या मुक्तीसाठी त्यांनी लढा दिला आहे.त्यानंतर विद्यार्थी शेतकरी कामगार व आदिवासी यांच्यासाठी क्रांतिकारक पाउल उचलले. शिक्षण सहकार,न्याय आणि शेतीच्या रचनात्मक कार्यात त्यांनी आयुष्य वाहिले आहे.यासाठी भाऊसाहेब थोरात,सुमनभाई शहा आदींचे सहकार्य लाभले.२०२५ या वर्षात ही संस्था डॉ राजीव शिंदे,डॉ प्रेरणा शिंदे यांनी मोठ्या प्रमाणात कोणतेही डोनेशन न घेता वाढवली.समाजाला आपला काही उपयोग व्हावा या मागचा उद्देश आहे.या शुभारंभ व पुरस्कार सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ प्रेरणा व राजीव शिंदे,प्राचार्य टी इ शेळके,सुखदेव सुकळे, नॅबचे अध्यक्ष भागचंद चुडीवाल,प्रकाश पाटील,डॉ बाबुराव उपाध्ये,प्राचार्य शंकरराव गागरे,आदींनी आवाहन केले आहे.

# प्लबिंग दुकाने फोडून पावने तीन लाखाचा ऐवज लंपास




**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड:** शहरातील बीड रोडवरील विठठल सेल्स व शासकीय दुध डेअरी समोरील बालाजी ट्रेडर्स या दोन्ही दुकानात दि. ८ च्या पहाटे अज्ञात चोरट्यांनी दुकानाच्या शटरचे कुलूप तोडून दुकानातील प्लबिंग साहित्यासह रोख रक्कम लंपास केली आहे. दोन्ही दुकानातील सुमारे पावणेतीन लाखांचा ऐवज लंपास झाला आहे. यामुळे जामखेड शहर व परिसरात खळबळ उडाली आहे.

याबाबत अभिषेक विठठल रेडे वय २४ वर्षे धंदा- प्लबिंग दुकान यांनी जामखेड पोलीस स्टेशनला दाखल केलेल्या तक्रारीत म्हटले आहे की माझे जामखेड ते बीड जाणारे रोड लगत नवले पेट्रोल पंपाचे समोर माझे विठठल सेल्स नावाचे प्लबिंग मटेरीयल चे दुकान असुन ते दुकान चालवुन मी माझे कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. सदरचे दुकान मी सकाळी दहा. सुमारास चालु करुन रात्री आठ. चे सुमारास दुकान व्यवस्थीत बंद करुन घरी जात असतो.

दि. ७ रोजी सकाळी दहा वाजता चे सुमारास मी माझे जामखेड ते बीड जाणारे रोड लगत नवले पेट्रोल पंपाचे समोर असणारे माझे विठठल सेल्स नावाचे प्लबिंग मटेरीयल नावाचे दुकानावर आलो होतो. दिवसभर दुकानावर काम करुन रात्री आठ वा चे सुमारास दुकान व्यवस्थीत बंद करुन माझे घरी गेलो होतो. दी. ८ रोजी सकाळी दहा वा. चे सुमारास दुकानावर आलो व दुकान उघडले असता मला दुकानातील साहीत्य अस्ताव्यस्त पडलेले दिसले तसेच दुकानाचे मागिल बाजुचे शटर व दरवाजा उघडा दिसला त्यांनतर सदरचा प्रकार मी माझा भाऊ विशाल विठठल रेडे, मावस भाऊ प्रमोद सिताराम पवार, वडील विठठल केरबा रेडे, चुलते बजरंग रेडे यांना सांगितला त्यांनतर ते दुकानात आले.

त्यांनतर आम्ही दुकानातील सामानाची पाहणी केली असता दुकानातील विक्री साठी आणलेले नळ फॅटिंगचे साहीत्य, काउंटर मधील पन्नास हजार रुपये रोख रक्कम तसेच इनव्हर्टर मिळुन आले नाही म्हणुन आमची खात्री झाली की, कोणीतरी अज्ञात चोरटयाने माझे संमती शिवाय लबाडीचे इरादाने स्वत:चे अर्थिक फायद्यासाठी माझे दुकानातील सामानाची चोरी केली आहे.

चोरीस गेलेल्या साहीत्याचे व रोख रक्कम याचे वर्णन खालील प्रमाणे ६०हजार- रुपये किं चे जॉनसन कंपनीचे १२ वॉल मिक्सर प्रत्यकी ५हजार रुपये किंमतीचे, ६३हजार रुपये किं चे जॉनसन कंपनीचे बाथरुम व किचनचे ४२ नळ प्रत्येकी १हजार ५०० रुपयेकिंमतीचे, २६हजार रुपये किं चे प्लंब फलो कंपनीचे बाथरुम फिटींगचे साहीत्य, १५हजार रुपये किंमतीचे इंनव्हर्टर व एक्साईड कंपनीची बॅटरी जु.वा.किं.अं., ५०हजार रुपये रोख रक्कम त्यात ५०० /- रुपये दराच्या १०० नोटा अशा प्रकारे सुमारे २लाख १४हजार रुपये एकुण माल लंपास झाला आहे. तसेच बीड रोडवरील शासकीय दुध संघाच्या समोरबालाजी ट्रेडर्स नावाचे दुकानात देखील चोरी झाल्याची घटना समोर आली आहे. याही दुकानातील पन्नास हजार रुपयांचे प्लबिंग चे साहित्य व चार हजार रुपये रोख लंपास झाले आहे. जामखेड शहरातील दोन्ही प्लबिंग च्या दुकानातील लाखो रुपयांचे प्लबिंग साहित्य व रोख रक्कम चोरट्यांनी लंपास केली आहे. यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. वरील घटनेचा तपास पोलीस निरीक्षक महेश पाटील हे करत आहेत.

## अल्पवयीन मुलीला पळवीले, पोलिसात अपहरणाचा गुन्हा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : नवीन घराचे सुरु असलेले काम पाहुन येते, असे सांगून घरातून बाहेर पडलेल्या अल्पवयीन मुलीचे अपहरण करण्यात आले. ही घटना दि. ५ जून रोजी सकाळच्या सुमारास राहुरी तालुक्यातील कणगर परिसरात घडली.

या घटनेतील १६ वर्षे ९ महिने वय असलेली अल्पवयीन मुलगी राहुरी तालुक्यातील कणगर परिसरात तीच्या कुटुंबियांसह राहते. दि. ५ जून २०२५ रोजी सकाळी १०.४५ वाजे दरम्यान पिडीत मुलगी नवीन घराचे सुरु असलेले काम पाहुन येते. असे सांगून घरातून बाहेर पडली. खुप वेळ झाला तरी ती घरी न आल्याने नातेवाईकांनी तिचा आजुबाजुला शोध घेतला. परंतु ती कुठेच सापडली नाही.

नातेवाईकांनी तिच्या मोबाईलवर फोन केला असता तो बंद होता. कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणासाठी पिडीत मुलीला फुस लावुन पळवून नेले. अशी नातेवाईकांची खात्री झाली. त्यानंतर पिडीत मुलीच्या आईने राहुरी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा रजि. नं. ६४२/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम १३७ (२) प्रमाणे अपहरणचा गुन्हा दाखल करण्यात आला. पुढिल तपास पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

### दंडकारण्य अभियानाअंतर्गत..

## वटपौर्णिमेनिमित्त २५२५ वटवृक्षांचे रोपण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : थोर स्वातंत्र्य सेनानी सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या संकल्पनेतून हरितसृष्टीसह पर्यावरण संवर्धनाचा मुलमंत्र देणाऱ्या दंडकारण्य अभियानाअंतर्गत वटवृक्ष लागवड सप्ताहात मंगळवारी १० जून रोजी वटपौर्णिमेनिमित्त तालुक्यातील प्रत्येक गावात व वाडीवस्तीवर २५२५ वटवृक्षांचे रोपण करण्यात येणार असल्याची माहिती प्रकल्पप्रमुख दुर्गा तांबे व डॉ.जयश्री थोरात यांनी दिली.

यावेळी अधिक माहिती देताना दुर्गा तांबे म्हणाल्या की, सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या संकल्पनेतून सुरू झालेले हे अभियान माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, दंडकारण्य अभियानाचे मुख्यप्रवर्तक माजी आ.डॉ. सुधीर तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली लोकचळवळ झाले आहे. वृक्षसंस्कृती जोपासणाऱ्या या चळवळीने देशपातळी वर मोठा लौकिक निर्माण केला आहे. प्रत्येक नागरिकाचा सहभागामुळे या चळवळीला यश आले



आहे. यामुळे वृक्षतोड टळली असून उजाड बोडखी डोंगरे झाडांनी हिरवीगार दिसू लागली आहे.भारतीय संस्कृतीत अत्यंत महत्वाचा असणारा वटपोर्णिमा हा महिलांचा सण आहे. वडाचे झाड अत्यंत औषधी व आरोग्यासाठी फलदायी आहे. आयुर्वेदामध्येही वटवृक्ष,रुई,उंबर,पिंपळ या झाडांना देव वृक्ष म्हणून संबोधले आहे. त्याचे प्रमुख कारण म्हणजे ही वृक्ष जास्त प्रमाणात ऑक्सीजन निर्माण करतात. हिरवी गार सावली,परिसराचे वैभव,आयुर्वेद,पूजापाठ व सजीवां साठी शुद्ध ऑक्सीजन मिळणार आहे. वटवृक्षाची सावली व थंडावा पशुपक्षांनाही आकर्षित करतो म्हणून असा हा वटवृक्ष प्रत्येक गावात व वाडीवस्तीवर असावा यासाठी दंडकारण्य अभियान समितीच्या वतीने प्रत्येक गावात व वाडीवस्तीसाठी किमान पाच असे तालुक्यात एकूण २५२५ वटवृक्षाचे रोपे देण्यात येणार आहे. वटपौर्णिमेच्या दिवशी महिला भगिनीच्या हस्ते या झाडाचे रोपन करुन त्याच्या पूजन व संगोपणाची जबाबदारी स्थानिक नागरिकावर देण्यात येणार आहे, असेही त्या म्हणाल्या.डॉ. जयश्री थोरात म्हणाल्या, की पर्यावरणाचा ऱ्हास होत चालल्याने ग्लोबल वॉर्मिगची समस्या उभी राहून उन्हाळ्यात लहान, मोठ्या सजिवांना जगणे असहाय झाले आहे.म्हणून प्रत्येक महिले ने किमान एक झाड लावून त्याचे संवर्धन केले पाहिजे. घराच्या भोवती परसबाग लावून फळझाडे, फूलझाडे वाढवावी. पुढील पिढीला चित्रातून झाडे दाखविण्याऐवजी प्रत्यक्ष त्या झाडाच्याच सावलीत खेळण्याचा आनंद मिळावा म्हणून दंडकारण्य अभियानात प्रत्येकाने सहभाग नोंदवावा असे आवाहन ही त्यांनी केले आहे.महिला वर्गातून या अभिनव उपक्रमाचे मोठे स्वागत करण्यात आले असून संगमनेर तालुक्याचा हा उपक्रम संपूर्ण देशाला मार्गदर्शक ठरणार आहे.

## बनावट घोटाळ्यातील कारवाईसाठी धरणे आंदोलन



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : शनिशिंगणापूर मधील बनावट घोटाळ्याची तातडीने चौकशी व्हावी व तातडीने कारवाई व्हावी यासाठी काँग्रेस व विविध संघटनांकडून शिंगणापूर देवस्थान आवारात धरणे आंदोलन करण्यात आले.

शनीशिंगणापूरमध्ये काही कर्मचाऱ्यांनी, पुजाऱ्यांनी देवस्थानच्या अधिकृत पच्या ऐवजी बनावट प तयार करून ऑनलाईन पूजेच्या माध्यमातून तसेच बनावट देणगी पावती व बनावट ठ च्या माध्यमातून करोडो रुपयाचा घोटाळा करून हा निधी आपल्या खाजगी खात्यावर वळून घेतला. यात देवस्थानची व देशभरातील शनिभक्तांची मोठी लूट या घोटाळा बहाद्दरांनी करून दाखवली.

याविरोधात काँग्रेसचे संभाजी माळवदे यांनी अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक व धर्मदाय उपायुक्त यांची भेट घेऊन चौकशीची मागणी देखील केली. तर देवस्थान प्रशासनाकडे त्यांनी परवानगी दिलेल्या पबद्दल माहिती मागण्यात आली होती. यामध्ये धर्मदाय आयुक्त यांचे परवानगी पत्र, ट्रस्टचा ठराव, करारनामा अशी माहिती मागण्यात आली होती. देवस्थान प्रशासनाने हि माहिती देण्यास टाळाटाळ केल्याने व घोटाळे बहाद्दरांना पाठीशी घातल्याने इतर पची माहिती दाबण्याचा प्रयत्न केल्याने आज देवस्थान आवारात काँग्रेस व विविध संघटनाकडून देवस्थान आवारात भर उन्हामध्ये धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी या घोटाळ्याचा तीव्र गतीने तपास करण्याची मागणी करण्यात आली. यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे संभाजी माळवदे यांनी देवस्थान प्रशासनाने फक्त तीन पवर कारवाईची मागणी करून इतर पवाल्याना व बनावट पावती पुस्तकं घोटाळे बहाद्दरांना पाठीशी घालणे ही अत्यंत दुर्दैवी गोष्ट आहे. पूर्ण कारवाई होईपर्यंत स्वस्थ बसणार नाही असे स्पष्ट केले.

शेतकरी संघटनेचे अशोकराव काळे यांनी या घोटाळ्यात देवस्थानचे कर्मचारी, पुजारी, अधिकारी सहभागी असल्याचा आरोप करत भाविकांच्या श्रद्धेला यांनी गंडा घातल्याचा आरोप केला. हरीश चक्रनारायण यानी देवस्थान आता सरकार जमा करण्याची वेळ आली असून प्रशासकाची याठिकाणी गरज आहे त्याशिवाय भ्रष्टाचार दूर होऊन कारभार सुरळीत होणार नाही. तसेच यावेळी काँग्रेसचे शहराध्यक्ष अंजुम पटेल,महिला अध्यक्ष शोभा पातारे, स्वाभिमानी संघांचे गणपत मोरे,बहुजन वंचितचे विजयसिहं गायकवाड, संजय वाघमारे यांनी देखील याविरोधात मनोगत व्यक्त केले. तर आंदोलनात संजय होडगर, कानिफ जगताप, सुमित पटारे, संदीप मोटे, सतीश तऱ्हाळ, गोरक्षनाथ काळे, आदीसह शनिभक्त सहभागी झाले होते. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय माळी यांना निवेदन दिले यात पुढील आठ दिवसात योग्य तपास न झाल्यास पुन्हा आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला.

# शनि शिंगणापूर बनावट ॲप, देणगी पावती प्रकरणाचा छडा लावणार : घार्गे



शनिशिंगणापूर देवस्थान ट्रस्ट ला जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी भेट देवून बनावट ॲप देणग्या पावत्या माहिती घेतली यावेळी शनिदेव दर्शन घेतले समवेत शिंगणापूर पोलिस ठाण्याचे सपोनि अशिष शेळके उपस्थित होते (छाया- बाळासाहेब नवगिरे)

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पानेगांव** : जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दि ८ रोजी शनि शिंगणापूरला देवस्थान ला भेट देऊन बनावट ॲप, देणगी पावती पुस्तके,ऑनलाइन पूजा घोटाळा विषयी शनैश्वर देवस्थान विश्वस्तांनी बाजू मांडली. देवस्थानने तक्रारीत उल्लेख केलेल्या तीन ऑनलाइन ॲप आणि ते चालविणा-या मालकांचा तपास योग्य पद्धतीने सुरु असून लवकरात लवकर या प्रकरणाचा छडा लावला जाईल असा विश्वास बैठकीत व्यक्त करण्यात आला आहे.

शनैश्वर देवस्थानच्या जनसंपर्क कार्यालयात झालेल्या बैठकीत पोलिस अधीक्षक घार्गे यांनी विविध निवेदनाच्या माध्यमातून व्यक्त होत असलेल्या आरोपांबाबत विचारपूस

केली असता विश्वस्त समितीचे अध्यक्ष भागवत बानकर यांनी तपासामध्ये देवस्थान मधील कर्मचारी अथवा अन्य कोणी आढळल्यास त्या विरोधात फिर्याद देण्यात येईल या वेळी बानकर सांगितले. या वेळी उपाध्यक्ष विकास बानकर, विश्वस्त अप्पासाहेब शेटे, छबूराव भुतकर, मुख्य कार्यकारी अधिकारी जी. के. दरंदले, उपकार्यकारी अधिकारी नितीन शेटे, शनि शिंगणापूर पोलिस ठाण्याचे सपोनि अशिश शेळके मंदिर व्यवस्थापनाचे प्रमुख विठ्ठल आढाव, आदी उपस्थित होते.

शनिशिंगणापूर येथील ऑनलाइन पूजा, तेल अर्पण करणे व शनिमूर्तीचे दर्शन घडवून देणे याकरिता देवस्थान ट्रस्टच्या परवानगीशिवाय कलकत्ता व गुडगाव (नवी दिल्ली),श्री मंदीर बैंगलोर ,नोएडा दिल्ली तसेच अन्य शहरातील व शनि शिंगणापूरमधील काही महाभागांनी प तयार करून देश व परदेशातील भक्तांना गंडा घातल्याचा प्रकार उघड झाला आहे.याबाबत माजी विश्वस्त वैभव शेटे, संभाजी माळवदे, शनि भक्त विशाल सुरपुरिया यांनी पोलिस अधीक्षकांना निवेदन देऊन कोट्यवधी रुपयांचा घोटाळा झाल्याचा आरोप केला होता. नेमकादेवस्थानची फसवणूक करणाऱ्या सर्वांवर कायदेशीर कारवाई केली जाईल. प्रकार काय झाला या करिता घार्गे यांनी शनि शिंगणापूरला भेट देऊन माहिती घेतली.

यामध्ये निवेदन व सोशल मिडियावर झालेल्या घोटाळ्याबाबत फक्त दिशाभूल व देवस्थानची बदनामी न करता संबंधितांनी पुरावे दिल्यास कुणाचीही गय करणार नाही.प्रकार काय झाला या करिता जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी शनि शिंगणापूर देवस्थानला भेट देवून माहिती घेतली.

**-भागवत बानकर, अध्यक्ष,**
शनैश्वर देवस्थान ट्रस्ट शनिशिंगणापूर.

जवळपास पंधरवड्यात पासून शनिशिंगणापूर बनावट प ,देणगी पावती घोटळ्यात कोट्यवधी रुपयांची शनि भक्तांनी दिलेल्या दान देवस्थानची फसवणूक झाल्याची माहिती मिडिया तसेच काही शनि भक्तांनी चौकशी व्हावी यासाठी निवेदन आलेली असून त्या संदर्भात तपास सायबर सेल माध्यमातून सुरू आहे. लवकरच संबंधित दोषींवर कारवाई करण्यात येईल.

**-सोमनाथ घार्गे,**जिल्हा पोलिस अधीक्षक